

# माणूस

शनिवार । ३ जुलै १९७६ । साठ पैसे

बाजारपेठेत मंदी आहे का ?
अर्थशास्त्रज्ञ
उद्योगधंद्यातले लोक
मंदी आहे असे म्हणतात.
सरकार म्हणते
परिस्थिती सुधारत आहे,
आपली अर्थव्यवस्था बळकट होत आहे.
असेलही.
पण माणूससारख्या स्वतंत्र
साप्ताहिकाला मात्र मंदीचा
तडाखा चांगलाच जाणवत आहे.
यावर उपाय ?

आपल्या हाती असलेला
असा एकच....
किंमतकपात !
म्हणून
या अंकापासून
साप्ताहिक माणूस
दर अंकाची किंमत
साठ पैसे फक्त.
एक रुपया होती त्याऐवजी
साठ पैसे फक्त.
चाळीस टक्के किंमतकपात !
पाहू या हा उपाय
लागू पडतो का ते !

# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक चवथा

३ जुलै १९७६

मूल्य : साठ पैसे



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये

सहामाही वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤


## ॲडव्होकेट माधव कानिटकर यांचे शोचनीय निधन

माणूसचे एक तरुण लेखक, ॲडव्होकेट माधव कानिटकर यांचे मंगळवार दिनांक १६ जूनला खानदेशातील 'नेरी' या गावी यकृताच्या आजाराने आकस्मिकपणे शोचनीय निधन झाले.

त्यांची एखादी खूनखटल्यावरील लेखमाला माणूसमधून यावी अशी कितीतरी वाचकांची पत्रे येत असत. त्यांचाही आपल्या लेखणीच्या लोकप्रियतेवर ठाम विश्वास असायचा. पण लिहिणे फारसे कधी त्यांनी मनावर घेतले नाही. लहर लागली तर, डोक्यात घोळत असलेल्या एखाद्या सत्य-घटनेवर किंवा वाचलेल्या एखाद्या पुस्तकावर आधारित, अशी एखादी प्रदीर्घ कथा ते सपाट्याने लिहून काढत व माणूसकडे पाठवून देत. वाचकांना ती आवडली नाही असे कधीच झाले नाही. त्यांनी लिहावे म्हणून एकदा तर, मुंबईचे माणूसचे विक्रेते बागवेशेठ यांचे चिरंजीव जातीने कानिटकरांना हुडकून काढण्याच्या खटपटीत सामील झाले होते. पण कानिटकर कोणालाच कुठे आहेत हे माहीत नसायचे. राहणे एकीकडे, फिरणे दुसरीकडे, व्यवसाय तिसराच असा सगळा त्यांचा विचित्र कारभार होता. त्यांचे थोरले भाऊ, 'नाझी भस्मासुराचा उदयास्त'चे लेखक श्री. वि. ग. कानिटकर सांगतात की, एकदा माधवने सपाट्यात एक कादंबरी लिहून काढली आणि गरज भागवण्यासाठी अवघ्या पन्नास–साठ रुपयांना ती कुणाला तरी विकूनही टाकली. माणूसमधून आलेल्या त्यांच्या खूनखटल्यांचे एक पुस्तक काढायचे ठरत होते. पण त्यासाठी भेट तर व्हायला हवी होती ना? पण गेली दोन–तीन वर्षे माधवराव इकडे फिरकलेसुद्धा नाहीत. त्यांच्या मुक्कामाच्या जागाही कुणाला माहीत नसायच्या. एखादवेळी त्यांचे पत्र अचानक यायचे–'एक फर्मास लेखमाला लिहून तयार आहे. घेऊन येतो. वाचकांच्या उड्या पडतील.' आपण वाट पाहवी. पण माधवरावांचा येण्याचा दिवस उगवायचाच नाही.

कथा लिहायला मात्र त्यांना बिलकूल वेळ लागत नसे. एकदा लिहिलेली कथा ते पुन्हा वाचूनही पाहत असत की नाही शंका आहे. कथा फुलवण्याचे त्यांचे कसब विलक्षण होते. मूळ घटनेत नसलेला तपशील ते आपल्या कल्पनाशक्तीने किंवा कोर्ट-कचेरीतल्या दैनंदिन कामाच्या अनुभवाने भरून काढत व लघुकथेची लांबलचक दीर्घकथा एका बैठकीत सपाटून करून टाकीत. दीर्घकथेचे तुकडे बरोबर असे पाडीत की, पुढच्या अंकासाठी वाचकांचा जीव टांगणीवर लागलाच पाहिजे. कित्येकदा यात मनसोक्त भरकटणेही खूप असे. ते कमी करायला त्यांची हरकत नसे. विशेषत: खटल्यातील वकिलांची भाषणे वगैरे रंगवण्यात माधवरावांचा अगदी हातखंडा. वाचक यात अगदी वाहून जायचा. उत्कंठा हळूहळू वाढवत न्यायची कलाही त्यांनी चांगली आत्मसात केली होती. या क्षेत्रात या गुणांच्या जोरावर त्यांना खूप लौकिक, प्रतिष्ठा सहज प्राप्त करून घेता आली असती. पण ही शक्यता आता काळाने नाहीशी केली आहे. त्यांना इतक्या तरुण वयात मृत्यू यावा, तोही, कोर्टाच्या कामानिमित्त खानदेशात गेले असता एका आडगावी, कुणीही बरोबर नसताना यावा, हे एक दुर्दैव आहे. त्यांचा मित्रपरिवार खूप होता. नातेवाईकही पुष्कळ. पण शेवटी कुणालाही पत्ता लागू न देता माधवराव अचानक निघून गेले. माणूस कचेरीत जसे ते न कळवता-सांगता अचानक धूमकेतूसारखे उगवायचे तसे बहुतेक ते यमाच्या दरबारातही अचानक उगवले असतील आणि त्याला म्हणत असतील, 'बघ, एक सनसनाटी कथा घेऊन आलो आहे... माझ्या जीवनाची आणि मृत्यूचीही. छापतोस तुझ्या 'चित्रगुप्त' मासिकात? मोबदला सध्या नको. कारण गरज वगैरे भागलेली आहे.'

खरोखरच एखादी चटका लावणारी छोटी कादंबरी व्हावी असे माधव कानिटकरांचे जीवन होते. कुठल्याच रूढ संकेतांना न जुमानणारे. चाकोरी बाहेरचे. भन्नाट. अशा जीवनाचा शेवट जसा बहुधा होतो तसाच तो माधवरावांचाही झाला हे खरे मानले तरी, दुःखाचा चटका लागून राहतोच. त्यांच्या मित्रांना, नातेवाईकांना, भावांना तर हा चटका विशेषच जाणवणार. त्यांच्या या दुःखात माणूसचे वाचक, सगळा माणूसपरिवार सहभागी आहे हे वाचून त्यांना थोडे बरे वाटेल, इतकेच. दुसरा नाहीतरी अशा प्रसंगी काय उपाय आहे? ¤

# सप्रेम नमस्कार

◻ श्री. पु. ल. इनामदार यांच्या कहाणी-बाबत त्यांचे आणि आपलेही मनःपूर्वक अभिनंदन. ह्या अभियोगाचा त्रोटक वृत्तान्त वाचतानासुद्धा 'थ्रिल 'चा अनुभव येतो. मग या वादळी युक्तिवादाच्या लाटांना तोंड देताना श्री. दफ्तरी व न्या. आत्मचरण यांना केवढे प्रचंड थ्रिल अनुभवायला मिळाले असेल हे कळू शकते. न्यां. खोसला यांचेपुढे केलेली सर्व आर्ग्युमेंट्स् सांगितल्याशिवाय ॲड. इनामदारांना ह्या अभियोगाचा वृत्तान्त संपवू देऊ नये ही विनंती. कारण त्यानंतरच डॉ. परचुरे यांची मुक्तता झाली होती असे मला स्मरते.

या अभियोगाच्या कहाणीचे पुस्तक झाले तर, हे सर्व अंक सांभाळत बसण्याचा (त्यातही एक अंक गहाळ झालाच) त्रास वाचेल.

'माणूस' जसे चालविता येईल तसे चालविले तरी ते हवेच आहे.

२२–६–७६ **वि. शि. शेणवाई**
नागपूर

◻ श्री. पु. ल. इनामदारांची 'लाल किल्ल्या-तील अभियोगाची कहाणी' खरोखर अप्रतीम आहे. २५ वर्षांनंतर, पूर्वीच्या भावनेचा बहर ओसरल्यावर आज या विषयावर पुन्हा वाचत असताना भावना व वस्तुस्थिती किती भिन्न होती याची प्रचीती येत आहे. असो.

आज श्री. अरुण रंगनाथ देशपांडे यांचा लेख वाचून अगदी अस्वस्थ झालो आहे व म्हणून हे पत्र लिहितो आहे. माझी व देशपांडे यांची ओळख नाही पण त्यांचे मेघराज फवारणी यंत्र घेऊन ते फलटणला निंबकर यांचेकडे आले होते (४–५ वर्षांपूर्वी) तेव्हा थोडावेळ जेमतेम तोंडओळख झाली होती. नंतर काहीच संबंध आले नाहीत. त्यामुळे संशोधन वगैरे बाबतही मला फारशी माहिती नाही. परंतु त्यांनी जी आपली व्यथा कथन केली आहे त्यात बरेच तथ्य असावे असे मला वाटते. व त्यामुळे या व्यवहारी जगात एक संशोधक नाउमेद होऊन हमाली करायला लागावा याचे खरोखर वाईट वाटते. कारण आपल्याकडे मुळात यंत्रशाखेत संशोधक फार कमी आहेत. आपले सर्व यंत्रज्ञान पाश्चात्यांची उसनवारी. तर अशात आपले यंत्र संशोधक नाराज होऊन यंत्र विज्ञानाकडे पाठ फिरवू लागले तर ते चांगले खचीत नाही.

१४–६–७६ **ज. वि. धायगुडे**
भादे (सातारा)

◻ माणूस दि. १२ जून ७६ मधील अरुण देशपांडे यांचा लेख वाचला. त्यांना आलेल्या अडचणी अनेकांना आलेल्या आहेत. पण त्याचा अर्थ तंत्रज्ञांनी धंद्यात पडू नये असा होऊ नये म्हणून मला लिहावेसे वाटले. मीही एक तंत्रज्ञ आहे. सुमारे दहा वर्षांपूर्वी मी स्वतःकडे पैसे नसताना धंदा सुरू केला. प्रथम शेड न बांधता अक्षरशः झाडाखाली उत्पादन सुरू केले. प्रथम एक विश्वासू एस. एस. सी. पास व खेड्यातील १९–२० वर्षांचा मुलगा मदतीस घेतला. सुरुवातीचे काही महिने पत्रे स्वतःच दोन बोटांनी टाइप करत असे. चांगली नोकरी (एअरकंडिशण्ड केबिन, गाडी, ड्रायव्हर इ.) सोडून तिसऱ्या वर्गाने किंवा मोटारसायकलने प्रवास सुरू केला. पहिल्या चार वर्षांत मोटारसायकलवर निदान १ लाख मैल प्रवास विक्रीसाठी केला.

विक्रीकडे तंत्रज्ञ किंवा इतर अनेकजण लक्ष देत नाहीत. डेव्हलपमेंट केल्यानंतर त्याचे पुरेपूर उत्पादन व विक्री न करताच दुसऱ्या प्रॉडक्टच्या मागे अनेक तंत्रज्ञ लागतात, त्यामुळे भांडवल अपुरे पडते. डेव्हलपमेंट हातात घेताना विक्रीसंबंधी प्रथम विचार करावयास हवा. उदा. एका दिवसात २०–२५ एकर औषध मारणारे यंत्र उत्तम असले तरी, त्याला मर्यादित गिऱ्हाईक राहणार. जेथे १८ एकरांचे बागायती शेतीचे सिलींग आहे, तेथे एकाच दिवसाच्या कामासाठी हे यंत्र उपयुक्त व फायदेशीर असले तरी, शेतकऱ्यास काही हजार रुपये जड वाटणार. आपला देश प्रचंड आहे. बहुसंख्य शेतकरीवर्ग दरिद्री आहे, अडाणी आहे. शेते लहान आहेत, अशा परिस्थितीत शेतीअवजारांची विक्री अवघड वाटणार, महाग पडणार व मोठ्या उद्योगधंद्याच्या इंटरेस्टचा येथे काही संबंध असेलसे वाटत नाही. उदा. या देशातील दारिद्र्यास ज्याप्रमाणे आपण भारतीय जबाबदार आहोत, परकीय सत्ता नाहीत– त्यांना जाऊन आता २९ वर्षे होत आली– त्याचप्रमाणे हा प्रकार आहे.

याचा अर्थ असा नाही की, दलालवर्ग किंवा मोठे कारखानदार सबकॉन्ट्रॅक्टर्सची कोठेच पिळवणूक करत नाहीत, परंतु आपली पिळवणूक न होऊ देणे हे लघुउद्योजकांच्या हातात असते. शेतकरीवर्ग–ज्यांचा माल नाशवंत असतो, ज्यांना एका दिवसात प्रॉडक्शन बंद करता येत नाही त्यांच्यापेक्षा लघुउद्योजक कितीतरी पटीने अधिक मजबूत आहे.

बहुसंख्य तंत्रज्ञांचे एखादे अंग, उदा. विक्री, अर्थ, कच्चे असते. एक म्हण आहे, साखळी तिच्या सर्वांत कच्च्या दुव्याइतकी मजबूत असते. त्याप्रमाणे जरी एखादा तंत्रज्ञ अत्यंत कसबी असला तरी, तो एखाद्या बाबतीत कच्चा असेल तर, त्याचे यश त्याच्या कसबाच्या मानाने कमी राहील. माझ्या पाहण्यात लघुउद्योग काढलेल्या अनेक लोकांच्या बाबतीत हीच गोष्ट घडलेली आहे. त्यामुळे त्यांनी धंद्यात मार खाल्ला किंवा प्रगती कमी झाली. सहकारी उद्योग हा त्याला एक उपाय आहे. खरे म्हणजे प्रा. लि. कंपनी हा त्यातलाच एक प्रकार आहे. चार मित्र एकत्र येऊन धंदा करताना आढळतात व अनेक यशस्वी दिसतात. परंतु आकडेवारी पाहिल्याखेरीज अनुमान काढणे अवघड आहे.

थोडक्यात, काही धंदे मार खातात म्हणून धंदा न काढणे हे चूक आहे. विक्रीबद्दल प्रथम विचार करावा. एकदम पैसे गुंतवून जागा, इमारत, सर्व यंत्रांची खरेदी हे टाळावे. डेव्हलप केलेल्या वस्तूंचे उत्पादन करून भरपूर फायदा झाल्यावरच नवीन प्रॉडक्ट डेव्हलपमेंटसाठी घ्यावा किंवा प्रथम डेव्हलप केलेला प्रॉडक्टच अधिक प्रमाणात चांगला व स्वस्त करण्यासाठी प्रयत्न करावा. विक्री व विक्रीनंतरच्या सेवेसाठी उपलब्ध असलेला पैसा वापरावा. नातलग अथवा मित्र, मोठे कारखानदार किंवा मंत्री इ. आहेत म्हणून यशस्वी झालेल्या कारखान-दारांपेक्षा इतर यशस्वी लोक जास्त आहेत.

आपल्याकडील बहुसंख्य मोठे कारखानदार किंवा त्यांचे पूर्वज हे एकेकाळी छोटे कारखानदारच होते.

१२–६–७६ **माधव गो. पवार, पुणे**

# राष्ट्राला साहसाच्या भावनेचा पुनर्लाभ
# 1975-76

## वीज उत्पादनाची प्रगती

- ☐ आतापर्यंत विक्रमी म्हणजे 79,764 दशलक्ष युनिट वीजनिर्मिती झालेली आहे. दररोज 260 दशलक्ष युनिट विजेचे विक्रमी उत्पादन

- ☐ 25 नवीन वीज प्रकल्पात 1800 मेगॅवॅट वीज-निर्मिती, त्यांपैकी 20 प्रकल्पांनी सप्टेंबर, 1975 ते मार्च, 1976 या कालावधीत वीजनिर्मिती केली.

- ☐ या वर्षी 20 लाख 50 हजार हेक्टर अजिरिक्त जमिनीला ओलिताची सोय होण्याची शक्यता

- ☐ 6,356 गावांना वीज पुरविण्यात आली, त्यामुळे वीज पुरविण्यात आलेल्या गावांची एकंदर संख्या आता 1,74,079 झाली आहे. 1,40,000 पंपांना वीज पुरविण्यात आली.

[ DAVP 76/89 ]

# अमेरिका
## संपन्नता आणि समस्या
### वा. दा. रानडे

अमेरिकेच्या स्वातंत्र्यास येत्या ४ जुलैला दोनशे वर्षे पुरी होत असून त्यानिमित्त गेले वर्षभर तेथे महोत्सव साजरा केला जात आहे. अमेरिका आज बहुतेक सर्वच क्षेत्रांत जगातील आघाडीवरचे राष्ट्र आहे. पण या विकासातूनच काही समस्या निर्माण झाल्या आहेत. द्विशताब्दीच्या निमित्ताने नुसत्याच विकासाचा विचार न करता या समस्यांचाही विचार केला पाहिजे. या समस्या एकट्या अमेरिकेपुरत्याच मर्यादित नाहीत. इतर विकसित राष्ट्रांनाही अशाच प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे.

अमेरिकेने जगाला काय दिले ? युरोपातील निरनिराळ्या देशांतील लोक वसाहतीसाठी या अज्ञात खंडात आले आणि आपल्या परिश्रमांनी त्यांनी तेथे नव्या संपन्न राष्ट्राची उभारणी केली. राष्ट्र पुढे येण्यासाठी परिश्रम तर हवेच, पण एकराष्ट्रीयत्वाची भावना लागते. निरनिराळ्या देशांतून आलेले हे लोक, पण अमेरिका हाच आपला देश असे मानून ते एकत्र आले आणि सहकार्याने त्यांनी राष्ट्राची उभारणी केली. नैसर्गिक साधनसंपत्तीचीही अनुकूलता त्यांना मिळाली. पण या नैसर्गिक साधनांचा जास्तीत जास्त उपयोग करून राष्ट्राचा विकास साधण्याची योजकता त्यांनी दाखविली.

संघराज्यपद्धतीची राज्यघटना आणि अध्यक्षीय लोकशाही हे अमेरिकेचे ब्रिटनपेक्षा निराळे असे विशेष आहेत. कानडा, ऑस्ट्रेलिया या ब्रिटिश वसाहतींनी अमेरिकेच्याच धर्तीवर संघराज्याची घटना स्वीकारली. भारताची घटनाही संघराज्याच्या पद्धतीचीच आहे. विस्ताराने मोठा असलेल्या, अनेक जमाती व राष्ट्रगट एकत्र नांदणाऱ्या देशास संघराज्यपद्धतीच सोयीची ठरते. संरक्षण, परराष्ट्र धोरण, दळणवळण, नियोजन यांसारखे सबंध देशाशी संबंधित असे विषय संघराज्य सरकारकडे सोपवून बाकी बाबतीत घटकांना स्वायत्तता द्यावयाची हे संघराज्याचे मुख्य तत्त्व. केंद्रसत्ता बलिष्ट असावी, की तिचे अधिकार मर्यादित असावेत. हा संघराज्य कल्पनेतील एक वादग्रस्त मुद्दा आहे. बहुतेक संघराज्याचा कल केंद्रसत्ता बलिष्ट करण्याकडे आहे, पण त्यामुळे घटकांच्या स्वायत्ततेला फारसा अर्थ राहत नाही. त्यांना प्रत्यक्षात प्रांताचा दर्जा येतो, अशी टीका काही घटनातज्ज्ञांनी केलेली आहे. केंद्रसत्ता बळकट ठेवण्याच्या पुरस्कर्त्यांचे म्हणणे असे की, केंद्र कमकुवत असेल तर फुटीर प्रवृत्ती बळावून एकसंधतेला धोका निर्माण होईल. संघराज्य सरकार आणि घटक सरकारे यांच्या अधिकारात योग्य तोल व समन्वय राखणे हाच त्यावर मार्ग आहे. आपल्या घटनेचा फेरविचार करताना या मुद्याचाही विचार होणे आवश्यक आहे.

अध्यक्षीय लोकशाही अमेरिकेत कितपत यशस्वी झाली ? संसदीय लोकशाहीपेक्षा ही पद्धती चांगली आहे का ? १९६७ च्या निवडणुकांनंतर आपल्याकडे अस्थिर सरकारे निर्माण झाली. कॉंग्रेसमध्ये फूट पडून केंद्रातही सत्तारूढ पक्षाचे हुकमी बहुमत गेले, आयाराम-गयारामांची साथ आली तेव्हा स्थिर कारभारासाठी अध्यक्षीय लोकशाही आपल्याकडे स्वीकारावी असा विचार काही विचारवंतांनी मांडला होता. आणीबाणीनंतर घटना दुरुस्तीचा विचार होताना ही कल्पनाही पुढे आलेली होती. पण फारसा पाठिंबा न मिळाल्याने ती मागे पडली. मी स्वतःही एका काळी या पद्धतीच्या बाजूचा होतो पण अमेरिकेचा अलीकडचा अनुभव लक्षात घेता अध्यक्षीय पद्धतीतही अध्यक्ष आणि कॉंग्रेस यांच्यात संघर्ष होतात हे निक्सन व फोर्ड यांच्या काही निर्णयांच्या बाबतीत दिसून आलेले आहे. निक्सन यांनी सत्तेचा दुरुपयोग केल्यानेच 'वॉटरगेट' घडले. स्वतंत्र धोरणाची वृत्तपत्रे, जागरूक लोकप्रतिनिधी आणि निर्भय न्यायसंस्था यांच्यामुळे – 'वॉटरगेट' मुळे – अमेरिकन लोकशाहीला आलेला धोका टळला. तेव्हा लोकशाहीचे यश विशिष्ट पद्धतीपेक्षा ती पद्धती राबविणाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून आहे. सत्तेच्या अनियंत्रित केंद्रीकरणाने निर्माण होणारे धोके टाळण्यासाठी वृत्तपत्रे, लोकप्रतिनिधी आणि न्यायालये यांनी आपली कर्तव्ये जागरूकपणे बजावली पाहिजेत. भारतातील लोकशाहीवाद्यांनीही या दृष्टीने कार्य करायला हवे.

अमेरिका संपन्न झाली पण सामान्य अमेरिकन माणूस सुखी झाला आहे का ? द्विशताब्दीच्या निमित्ताने हा प्रश्न मनात आल्याशिवाय राहत नाही. अमेरिकन माणसाला सुखोपभोगाची साधने उदंड उपलब्ध आहेत पण तो सुखी का नाही ? मनोरुग्णांची संख्या तेथे वाढत आहे. गुन्हेगारीचे प्रमाण विशेषतः बालगुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. दर दोन विवाहांमागे एक घटस्फोट तेथे घेतला जातो. वॉटरगेट प्रकरणाने भ्रष्टाचाराची मुळे वरिष्ठ पातळीपर्यंत कशी पसरली आहेत हे दाखवून दिले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अमेरिकेने अभिमानास्पद प्रगती केली. चंद्रावर माणूस उतरविण्याचे स्वप्न साकार केले. असे असले तरी, केवळ भौतिक प्रगतीने माणसाला सुख व समाधान मिळत नाही. अमेरिकन माणसे शांतीसाठी योगाकडे वळत आहेत, तर काही नेहमीच्या यांत्रिक जीवनाचा वीट येऊन हिप्पी बनत आहेत. व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजहित यांचा योग्य मेळ राखला न गेल्याने या समस्या निर्माण झाल्या आहेत. भौतिक विकास झाला पण मनाचा योग्य विकास झाला नाही. व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिसुख यांवरच अधिक लक्ष केंद्रित केले गेले. सारी सुखोपभोगाची साधने हाताशी सहज उपलब्ध असल्याने जीवनात काही मिळविण्यासाठी झगडाच करावा लागत नाही. ज्यांच्या कर्तृत्वशक्तीला योग्य दिशा मिळते, ती माणसे संशोधनाकडे वळतात. सृष्टीची न उलगडलेली कोडी उलगडण्याच्या प्रयत्नात स्वतःला विसरून जातात. पण ज्यांच्यापुढे असा काही ध्येयवाद नसतो ते अधिक पैसा, अधिक सुखोपभोग यांच्यामागे लागतात. संघर्षाशिवाय, झगड्याशिवाय माणसाचा विकास नाही. पण हा संघर्ष समाजाला पुढे नेण्यासाठी हवा. असा काही ध्येयवाद नसेल, तर संघर्षाला गुन्हेगारीचे विकृत वळण मिळते. विकास आणि अधःपतन ही दोन्ही टोके आजच्या जीवनात दिसतात ती यामुळेच. □

# सॅपोटेक्स-१००% विशुद्ध सोप पावडर




**आता कमी केलेल्या किंमतीत**

2½ किलो रु. २५.७५
१ किलो रु. १०.५१
½ किलो रु. ५.३४

स्थानिक कर वेगळे

आपल्या कपड्यांची धुलाई अत्यंत स्वच्छ आणि सफेद होण्यासाठी सॅपोटेक्स वापरा. त्यात सफेदीसाठी ऑप्टिकल व्हाइटनर मिसळलेले असते. सॅपोटेक्सने धुलाई केल्याने नाजूक कपडे सुद्धा सुरक्षित राहतात.

## सॅपोटेक्स-भारतातील सर्वांत अधिक खपाची सोप पावडर

स्वस्तिक हाऊसहोल्ड ॲण्ड इंडस्ट्रिअल प्रॉडक्ट्स लि.

Shilpi dm 10A/76 mar

# तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या एका जगन्मान्य भारतीय कामसूत्रकाराच्या जीवनावर आधारलेली एक ललितरम्य कादंबरी

# वा त्स्या य न

## दि. बा. मोकाशी

। नमन ।

- धर्म, अर्थ, काम यांना नमस्कार असो.
- कामशास्त्राला नमस्कार असो.
- कामशास्त्रावर ग्रंथ रचणाऱ्या पूर्वाचार्यांना नमस्कार असो.
- (विशेषतः) वात्स्यायनाला.
- – या कथेचा विषय वात्स्यायन आहे म्हणून.

। पूर्वजन्मवृत्त ।

एके समयी शंकर-पार्वती विमानातून जात असता पार्वती शंकराच्या मांडीवर बसून मनोविनोद करू लागली. पण शंकराचे मन त्यात रमेना. हे पाहून पार्वतीने विचारले,

'महाराज ! आज आपण असे उदास का ? काही चिंता असेल तर सांगावी. असे म्हणतात की, चिंता आप्तस्वकीयांस सांगून दूर होते.'

शंकर म्हणाले, 'पार्वती ! तुझ्या प्रिय भाषणाने मी प्रसन्न झालो आहे. तरी माझ्या चिंतेचे कारण ऐक. तुला स्मरत असेल की पूर्वी एकदा दिव्य अशा दहा हजार वर्षेपर्यंत आपण दोघे सुरतसुखांत रममाण असता, आपली सुरतक्रीडा, दाराशी असलेल्या नंदीने चोरून पाहिली. आपल्या सुरतक्रीडेवरून त्याने हजार अध्याय असलेला कामशास्त्रावरचा ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथाचे कानावर येताच, क्रोधाविष्ट होऊन तू नंदीला शाप दिलास की – 'हे नंदी ! ज्येष्ठांची कामक्रीडा पाहून लिहिलेला तुझा उद्धट ग्रंथ पृथ्वीतलावरून नष्ट होईल. एवढेच नव्हे तर, तू मानवजन्म घेशील आणि कामसंतापाची दुःखे भोगीत पृथ्वीतलावर वणवण हिंडशील.'

शंकर पुढे म्हणाले, 'देवी ! त्यावेळी तुझ्या शापाने अतिशय कष्टी झालेला नंदी तुला म्हणाला, – 'माते पार्वती ! मनुष्याचा जन्म घेण्यास आणि पृथ्वीतलावर कामसंतापात वणवण हिंडण्यास मी सिद्ध आहे. पण माझा ग्रंथ नष्ट झालेला मला पाहवणार नाही. तरी हे जगत्जननी ! माझा ग्रंथ मी मानवाच्या कल्याणासाठी लिहिला हे जाणून मला उःशाप दे की, नष्ट झालेला हा ग्रंथ मी माझ्या शापित मनुष्यजन्मात पुन्हा लिहीन व लोककल्याण साधीन.'

'नंदीच्या डोळ्यांतील अश्रू पाहून पार्वती ! तुझे मन द्रवले. त्यावेळी त्याला उःशाप देत तू काय म्हणालीस आठव ! तू म्हणालीस, 'नंदी ! ऐक ! तुझा कामशास्त्राचा ग्रंथ नष्ट होईल, पण उद्दालकपुत्र श्वेतकेतू तो पाचशे अध्यायांत नंतर लिहून काढील. त्यामुळे त्याकाळी लोकात फार प्रचलित असलेले परदारागमन थांबेल. श्वेतकेतूचा हा ग्रंथही पुढे विस्मरणात जाईल. तो असा विस्मरणात गेल्यावर बाभ्रव्य तो दीडशे अध्यायांत लिहून काढील. कालांतराने हा बाभ्रव्याचा ग्रंथही, त्यातील प्रकरणे निरनिराळ्या आचार्यांनी वेगवेगळी केल्यामुळे प्रचारातून जाईल. तेव्हा योग्य कामसेवन कसे करावे हे न कळून लोकात अज्ञान पसरून दुःख वाढेल. अशा वेळी हे नंदी ! तू अवंती नगरीत, वात्स्यायन कुलात, मल्लनाग या नावाने जन्म घेशील. त्या जन्मात कामसंतापाची दुःखे भोगीत तुला वणवण हिंडावे लागेल. पण तुझा नष्ट झालेला ग्रंथ तू पुन्हा लिहिशील. 'वात्स्यायनाची कामसूत्रे' या नावाने तो ग्रंथ लोक ओळखतील आणि त्याला अक्षय कीर्ती लाभेल.'

'पार्वती ! नंदीच्या शापाचे तुझ्या स्मरणातून गेले म्हणून सांगितले. आता मी कष्टी का आहे ते सांगतो. तुझ्या शापाप्रमाणे आपल्या लाडक्या नंदीने 'मल्लनाग वात्स्यायन' असे नाव धारण करून अवंतीत जन्म घेतला आहे. आतापर्यंतच्या आयुष्यात कामसंतापाची अनेक दुःखे त्याने भोगली आहेत. तुझ्या उःशापाप्रमाणे अंती त्याचे कल्याणच होणार असले तरी, हे पार्वती ! देवांनाही संचित न कळल्याने उर्वरित आयुष्यात त्याला भोगावे लागणारे कामक्लेश मनात येऊन मी कष्टी आहे.'

'पहा ! पार्वती ! पहा ! आपला प्रिय नंदी – मनुष्यजन्मीचा मल्लनाग वात्स्यायन – पत्नी माहेरी गेल्यामुळे विव्हल होऊन आपल्या घराबाहेर बकुल वृक्षाखाली उभा आहे.'

। पूर्ववृत्त ।

पत्नी माहेरी गेली होती आणि बकुल वृक्षाच्या छायेत उभा असता मल्लनाग वात्स्यायन अस्वस्थ होता.

समोर फांदीला टांगलेला झोपाळा गाठ मारून वर करून ठवला होता. झोक्याआड येणाऱ्या तोडलेल्या फांद्यांच्या जागी वासंतिक पालवी उगवली होती. पालवीचे कोवळे जीव वाऱ्याने थरथरत होते. ते थरथरणेही वात्स्यायनाला अस्वस्थ करीत होते. त्याला आज

काहीही अस्वस्थ करीत होते. आणि भोवतालो वृक्षलता वसंताने फुलल्या होत्या – वसंतही मनावर असतो – वात्स्यायनाच्या मनात आले.

अस्वस्थ वाटू नये म्हणून त्याचा यत्न चालू होता. अधूनमधून आवेगानं ओरडणाऱ्या कोकिळेकडे तो लक्ष देऊन ऐकत होता. एखाद्या कुंजाशी जाऊन वेलीचे बाहेर आलेले टोक नीट मार्गी लावीत होता. –असे एवढे काय झालंय? –तो स्वतःला समजावीत होता – आपण एवढे अस्वस्थ का व्हावे? पत्नी माहेरपणासाठी गेली आहे एवढेच ना?

पण पत्नीचे माहेरी जाणे आपल्याला एवढेसे नाही हे त्याला कळत होते. गेल्या दहा वर्षांत केवळ दोन वेळा आपण पत्नीला माहेरी धाडले. ही वेळ तिसरी. त्या दोन वेळी झालेल्या यातना अजूनही स्मरणात आहेत. हसणारे हसोत. त्या यातनाच. दासदासी तेव्हा खाली माना घालून हसल्या. पण ज्या मनःस्थितीत आपला विवाह झाला तो त्यांना ठाऊक नाही. एकटचा मित्र महेश्वरदत्ताला सगळं ठाऊक आहे. तो आपला खरा मित्र आहे. बारा वर्षे एकाच गुरुगृही आपण-आणि तो विद्या घेत होतो. आपला विवाह त्याच्यामुळेच झाला.

'प्रिये! या घरी तुझा 'गृहप्रवेश' महेश्वरदत्तामुळे कसा झाला हे तुला ठाऊक नाही. विवाहापूर्वीचे ते मी तुला कधी सांगितले नाही.' आणि जणू आपली प्रिय पत्नी आपल्यासमोरच आहे या भ्रमाने वात्स्यायन ओठातल्या ओठात पुटपुटत बोलू लागला, 'प्रिये! तू येण्यापूर्वी हा उद्यान शुष्क होता, सर्वत्र पालापाचोळा पडला होता, आणि माकडांची कुटुंबे वृक्षांवरून आणि घरावरून चित्कार करीत उड्या मारीत स्वच्छंद धावत होती. कौलांवर गवत वाढले होते. भिंतींचा रंग विटला होता. उद, धूप, चंदन यांच्या धुरांचा स्पर्शही काही वर्षांत या वास्तूनं अनुभवला नव्हता. माझी अवस्था तर घराहूनही वाईट होती. किती किती दिवस मी स्नानावाचून राहत होतो. वस्त्रे मलीन झाली होती. अस्ताव्यस्त वाढलेले केस शुष्क पडले होते. कधी मी मुढासारखा बसून राहत होतो. कधी युवतींशी रममाण झाल्याची दिवास्वप्ने पाहत होतो. कधी भिंतीवर, कधी फलकावर त्यांचीचित्रे काढीत होतो. घरभर कोळिष्टके झाली होती आणि माझ्या भयंकर मनाशी मी भयंकर एकटा होतो.'

स्वतःशी असे बोलत राहिल्याने वात्स्यायनाला जरा बरे वाटले. महेश्वरदत्त अवंतीहून भेटायला आला तेव्हाचा तो प्रसंग त्याच्यापुढे उभा राहिला. आपण चित्रफलक घेऊन दाराशी बसलो होतो. दाराच्या फटीतून चोरून पाहत बाहेरच्या मार्गावरून जाणाऱ्या युवतींची चित्रे चितारीत होतो. ती चित्रे विपरीत होती. कुठे स्तनच चितारले होते, कुठे नितंब, तर कुठे संभोगासने चितारली होती. ती चित्रे पाहताच महेश्वरदत्ताने चित्रफलक आपल्या हातून ओढून घेतला होता. मग आपणास आपादमस्तक निरखून पाहत तो म्हणाला होता,

'मल्लनागा! ही काय अवस्था करून घेतली आहेस स्वतःची? काय हे तुझे घर? काय तुझी वस्त्रे? गोठ्यातील बैलसुद्धा तुझ्याहून स्वच्छ असेल, किती नीटनेटका होतास तू! अरे! गुरुगृही आपण होतो तेव्हा आसनाची एक दर्भाची काडी तुटलेली तुला चालत नसे. तुझी ही अवस्था पाहून मला किती दुःख होते म्हणून सांगू? बाबा! फलकावर युवतींची अशी विपरीत कामचित्रे चितारून काय साधणार? तुझे लग्न केले पाहिजे. नाहीतर त्या विजयमालीसारखे तुझे आयुष्य व्यर्थ जाईल. ती कथा ऐक.'

'प्रिये!' वात्सायन स्वतःशी म्हणाला, 'महेश्वरदत्त ती कथा सांगत असता तू ऐकायला हवी होतीस. आधीच अवंतीतील श्रीमान श्रेष्ठीचा तो पुत्र! सोनेरी काठाचे रेशमी उत्तरीय त्याने परिधान केले होते. झटकूनही प्रवासातील धुळीच्या रेषा त्यावर कळत होत्या. कानावर पडणारे केस मागे सारीत, मुखावर माझ्याबद्दल कणव आणीत, आविर्भावासह त्याने ती सांगितली, पण एकदाही त्याच्या कानांतील कर्णफुले हलली नव्हती. माझी अवस्था पाहून त्यांचीही हृदये जड झाली असावीत. कर्नाटकातील विजयमाली नामक वैश्यपुत्राची कथा त्यानं सांगितली. वाराणसीच्या इंदुकेसरी राजाच्या इंदुयशा नावाच्या कन्येवर विजयमालीचे प्रेम बसले. तिच्या दर्शनाने व्याकूळ होऊन तो झुरणीस लागला. तेव्हा त्याच्या एका चित्रकार. मित्राने त्याची व्यथा जाणून, त्याचे दुःख कमी व्हावे आणि त्याचा काल बरा जावा यासाठी, राजकन्या इंदुयशेचे चित्र त्याला काढून दिले.–'

'राजकन्येचे दर्शन दुर्लभ असल्याने ते चित्र काढल्यापासून विजयमाली त्या चित्रासमोर बसून राहिला. चित्रातील राजकन्येला स्पर्श करू लागला. तिच्याशी बोलू लागला. तिला अलंकारांनी नटवू लागला. हळू हळू ती खरीच राजकन्या आहे असे त्याला वाटू लागले, आणि क्रमाने तो तिच्यासमवेत आलिंगन-चुंबनादी सर्व क्रिया करू लागला. पुढे पुढे तर तीही आपल्याशी भाषण करते, आपल्याला चुंबने देते असे त्याला वाटू लागले आणि या भावनेनेच प्राप्त झालेल्या स्त्रीसंभोगादिकांनी सुख पावून, आपण भार्येशीच संसार करीत आहोत या मायेत तो राहू लागला आणि कृश होत चालला.'

प्रिये! विजयमालीची अशी कथा सांगून महेश्वरदत्त मला म्हणाला,

'मल्लनाग! तुझी आणि या कथेतील विजयमालीची अवस्था मला एकच वाटते. पुढे विजयमालीच्या मित्राने युक्ती करून, चित्राला सर्पदंश करवून, चित्रातील राजकन्या मेली असे भासवून, चित्राच्या मायेतून विजयमालीची सुटका केली. तसे आता मला तुझ्यासाठी काहीतरी करावे लागणार.'

'प्रिये! महेश्वरदत्त येऊन तेव्हा जे म्हणाला ते सत्यच होते. त्यावेळची माझी अवस्था विजयमालीहूनही करुण होती. विकार, विकार वाटू नयेत या स्थितीला मी पोहोचलो होतो. मी विवाह करावा यासाठी अनेक यत्न करून, थकून, माता निवर्तली होती. विवाह का करावासा वाटत नाही हे मला मातेला सांगता येत नव्हते. मला स्त्री जातीचा तिटकारा आहे हे तिला कसे सांगणार? एकीकडे मनात तिटकारा असता कामज्वर मला होरपळून टाकीत होता, हेही तिला कसे सांगणार?'

वेलीचे टोक हातात धरून बोटाभोवती गुंडाळीत स्वतःशी पुटपुटत आपण उभे आहोत याचे वात्स्यायनाला भान नव्हते. म्हणूनच

एकाएकी 'अहो मल्लनाग !' अशी हाक आली, तेव्हा दचकून त्याने वेलीचा हात सोडला. अंगणाच्या कुंपणाबाहेरून आपल्या दचकण्याला हसत उभ्या असलेल्या गणिका आनंदिकेकडे त्याने पाहिले. हसत ती म्हणत होती,

'एकटेसे ? पत्नी माहेरी गेली वाटते ?'

गोंधळून मानेनेच वात्स्यायनाने 'हो' म्हटले. ही आपणास चिडवते आहे– त्याच्या मनात आले. गणिका चतुर खऱ्याच. कसे चटकन ओळखले हिने ! घर शांत दिसले म्हणून म्हणाली असेल. आपल्या तोंडावरही दिसले असेल. तरी गणिका चतुरच.

'देवळात जाऊन येते.' गणिका आनंदिका म्हणाली आणि चालू लागली. देवळात जावयाचे म्हणून तिने खांद्यावरून झिरझिरीत उत्तरीय घेतले होते. कशी चालते तरी ! वात्स्यायनाच्या मनात आले. नुपुरांचे ध्वनी एकमेकात मिसळून देत नाही. प्रत्येक पावलाचा ऐकणारावर आघात व्हावा. लय सुंदर आहे. पुरुषाशी बोलायला तिला पाठ फिरवावी लागत नाही.

जातीची कलावंत आहे ती. लहानशी हालचालही वाया जाऊ देत नाही. दुर्मुखलेला देवानंदही तिच्यापुढे खुलतो. मुले घराघरांतून हिला हाका मारतात.

'आनंदिके ! आनंदिके !' कुणा मुलाच्या ठराविक हाका आल्या आणि वात्स्यायन स्वतःशी हसला. आता एखाद्या गोंडस बालकाला घेऊन ती हसत-खेळत पुढे जाईल. स्त्रिया मत्सराने पाहत असतात तिच्याकडे. लोक म्हणतात–गावाचे भूषण आहे आनंदिका.

वात्स्यायन एकदम विचारात थांबला. पत्नीचे नव्याने स्मरण येऊन त्याचा गळा दाटून आला. प्रिये ! तूच मला आनंदिकेकडे धाडलेस. मनाविरुद्ध मी तिच्याकडे गेलो. तुझा हेतू तेव्हा कळला नाही. आपल्या नगर-गावातला प्रत्येक सुसंस्कृत नागरिक तिच्याकडे जातो आणि आपला पती जात नाही, याचे तुला आश्चर्य वाटत होते ! होय ना ? प्रिये ! तेव्हा मी कधी घराबाहेर पडत नसे. तू दृष्टीआड होताच माझे प्राण कासावीस होत. तुलाही मी कधी कुठे जाऊ दिले नाही. मी मागे मागे असण्याचा तुला किती त्रास होत असेल हे मला कळतंय. फारच त्रास दिला तुला मी.

वात्स्यायनापुढे ते सगळे पूर्वीचे प्रसंग आले आणि त्यांच्या धावत्या स्मृतींनीही त्याचे तोंड लाजेने लाल पडले. दासदासी जरा आड होताच पत्नीला दिलेली विपरीत आलिंगने त्याला आठवली. पहाटे ती दूध काढायला गेल्यावर, आपण अनेकदा मागोमाग बेडचात जाऊन, संभोग मागून, तिला गाई पिळणे अशक्य केले. तिथे खाली माती होती, खडे होते, मूत्रशेण आणि गवताच्या धारदार काड्या होत्या, हेही आपण पाहिले नाही.

प्रिये ! त्यावेळी तुला संभोग हवाय की नको आहे, तुला सुख होते का दुःख, तुला प्रिय वाटतंय की अप्रिय हे मी विचारले नाही. तूही शब्द काढला नाहीस. तू तेव्हा किती गप्प गप्प असायचीस. माझ्या पशुतुल्य वर्तनाचे त्यावेळी तुला काय वाटत असेल ? त्यासाठीच तू मला आनंदिकेकडे धाडलेस ना ? आनंदिकेकडे रसिक नागरिक येत. तिथे नृत्य, वीणावादन, चित्रकला, गोष्टी, गायन, नाटक सर्व होत असते. नागरिकात चर्चा होत. त्यातून मी योग्यायोग्य शिकावे असे तुला वाटत होते ! बाभ्रव्याचा कामशास्त्राचा ग्रंथ पाठ असलेल्या मला, तू कामशास्त्रातला पहिला धडा देत होतीस !

पण गणिकांबद्दलचा आपला तिटकारा तिला ठाऊक नव्हता. आपला पिता अवंतीत, वेश्या आणि नागरिक यांचे जुळवून देण्याचा विटाचा व्यवसाय करीत होता हे तिला ठाऊक होते का ? लग्न ठरवण्याच्या वेळेस महेश्वरदत्ताने सर्व सांगितले असेल का ? मग विटाच्या पुत्राला अनेक कामलीला पाहाव्या लागतात हे ती जाणतही असेल. सूज्ञपणाने ती बोलली नाही इतकेच. पण आनंदिकेकडे पाठवून गणिकांबद्दलचा आपला तिरस्कार तिने कमी केला हे निश्चित. आनंदिका ! आनंदिका ! का आपण एवढा विचार करीत आहोत तिच्याबद्दल ? नागरिकात प्रिय अशी ती एक गणिका आहे. संपले. देवळातून ती आत्ता परत येईल. बागेचे दार उघडून सहज तिच्याबरोबर बोलत तिच्या घरी जाता येईल. तिथे एखादे नवे नृत्य, नवी चाल, नवी चर्चा कानांवर येईल.

त्याने भोवताली पाहिले. कारंजाच्या तुषारात जीव आलाय का ? पानांचा डुलण्याचा डौल वाढलाय काय ? क्षणभर, वाढलाय असे त्याला वाटले. त्याने घराच्या मोकळ्या दाराकडे पाहिले. ते तसेच भकास उघडे होते.

उभ्या उभ्या वात्स्यायनाने झाडाला पाठ टेकली. आनंदिका परत यावयाच्या आत इथून जावे ! ती तशी नुपुरे कणकणवीत येईल. तिच्याबरोबर जाऊ अशी त्याला भीती वाटू लागली. मग मनातील भीतीला तो पोकळ हसला. हिच्यापायी गावातली दोन घरे बसली. त्यात तिचा काय दोष ? दोष नादी लागणाऱ्याचा. बाभ्रव्याने आपल्या ग्रंथात वेश्यांबद्दलच्या अधिकरणात गणिकेने सोंगे करून नागरिकांकडून द्रव्य कसे काढावे हे दिले आहे. नागरिकालाही त्यावरून कसे फसू नये हे कळेल–जो कळून घेईल त्याला. तो पोकळ हसला. फसणे सोपे. त्याहून तिरस्कार करणे सोपे.

प्रिये ! अशा रीतीने एकीकडे स्त्रियांबद्दलची अभिलाषा आणि दुसरीकडे तिटकारा यात माझे मन दग्ध होत असता, महेश्वरदत्ताने मला नगराहून अवंतीस नेले. मग तुला पाहायला आलो. पण पाहिल्याचेही आठवत नाही. मला भानच नव्हते. महेश्वरदत्तानेच माझी संमती दिली. मग विवाहाआधी त्याने मला गुरूकडे आशीर्वाद घेण्यासाठी नेले. बहुधा महेश्वरदत्ताने आधी माझी अवस्था गुरूस सांगितलेली असावी. गुरू तेव्हा म्हणाले, –

'मल्लनाग ! मन आवर, विवाह कर आणि पत्नीला सुख दे. पुत्रपौत्र यांनी तुझे घर भरू दे. धनधान्यादिकांनी समृद्ध राहू दे. धर्म, अर्थ, काम यांचे यथायोग्य पालन तुझ्याकडून होऊ दे.'

प्रिये ! मी तेव्हा गुरूला म्हणालो,

'गुरुवर्य ! माझे चित्त विवाहास घेत नाही.'

आपली माता 'विवाह कर – विवाह कर' असे म्हणत असता त्यावेळी जे तिला सांगता आले नाही ते यावेळी बोललो. गुरूच्या शांत, स्निग्ध दृष्टीचा तो प्रभाव होता. मी म्हटले,

'गुरुवर्य ! विवाहाने काहीतरी विपरीत होईल असे भय मला वाटते. मी विटाचा मुलगा आहे. बालपणापासून मी असंख्य स्त्रीचरित्रे पाहिली आहेत. मला स्त्रीची भीती वाटते – विवाहाची वाटते. तारुण्यसुलभ अशा कामेच्छेने मी क्षणाक्षणाला जळतो आहे. तरीही

मला विवाह नको आहे. मग त्या जळण्यात देहान्त झाला तरी चालेल.'

मी एकदम दोन्ही हातांत तोंड झाकून रडू लागलो. तेव्हा गुरूंनी पाठीवरून हात फिरवीत म्हटले,

'वत्सा मल्लनाग ! शांत हो. ऐक. स्त्री ही तिटकारा वाटेल अशी वाटली तरी, तिच्याशी प्रेमाने राहावे. कारण तिच्यापासून संतती होते व मानववंश राहतो. तसेच तिटकारा वाटेल अशा स्त्रिया असतात तशाच आनंद देणाऱ्या स्त्रियाही असतात.'

गुरुगृहींच्या त्या आठवणीने आपल्या डोळ्यांत पाणी तरारल्याचे वात्स्यायनाच्या लक्षात आले. इतक्यात दुरून परतणारी नुपुरे ऐकू येऊ लागली. वात्स्यायनाने झटकन उत्तरियाला डोळे पुसले. जाग्यावरून उठत, उठता उठताच आसन उचलून त्याची गुंडाळी करीत असता, त्याने पाठ रस्त्याकडे केली. नुपुरांच्या वाढत्या ध्वनीबरोबर त्याची छाती धडधडू लागली. आपल्या सर्वांगावरून घाम निथळतोय हे त्याच्या ध्यानात आले. मनगटावरचा निथळता घाम झटकून उत्तरियाने तोंड पुशीत तो झरझर अंगण ओलांडून घरात शिरला.

शयनगृहात येऊन हातातले थरथरते आसन हातातच ठेवून तो फेऱ्या घालू लागला. गेल्या रात्री लावलेली उदबत्ती शेवटपर्यंत जळून तिच्या राखेच्या गुंडाळ्याने मान टाकली होती. रात्रीच्या हारांचे आणि फुलांचे निर्माल्य तसेच विस्कारून पडले होते. पुष्पशय्या कुस्करली – कोमेजली होती आणि तेथून उटी आणि निर्माल्य यांचा उग्र वास नाकात दरवळत होता. पत्नीच्या तळपायांच्या आळत्याच्या लाल खुणा शय्येवरच्या वस्त्रावर ठिकठिकाणी होत्या.

शेजारीच देवांच्या कोनाड्याकडे त्याने पाहिले. मग वरच्या फळीकडे त्याची नजर गेली. तिथे रंगीत वस्त्रांत पोथ्या गुंडाळून ठेवलेल्या होत्या. वात्स्यायनाच्या मनात आले, एवढे ग्रंथ आहेत, कुठे पत्नीच्या विरहकालातील पतीची अवस्था दिली असेल का ? दिलीही असेल. पण तो पती विटपुत्र नसेल आणि गणिकेला घाबरून घरात पळाला नसेल. त्या अवस्थेवर काही मंत्र, काही उपाय दिलेही असतील. फक्त ते आपल्याला लागू पडणार नाहीत.

ती पहिली पोथी अर्थशास्त्राची. चाणक्याचे अर्थशास्त्र. आपला सर्वांत प्रिय ग्रंथ. त्यात लिहिल्याप्रमाणे राज्ये चालली तर ? पण तो विषय निराळाच. तरी हा एक ग्रंथ खरा शास्त्रीय आहे. ग्रंथारंभी नमस्कारही शास्त्रांना आहे. – धर्म, अर्थ आणि काम यांना नमस्कार असो.

आपण आपल्या ग्रंथाची अशीच सुरुवात करू. कोणता कुणास ठाऊक, पण एखादा ग्रंथ हातून लिहून व्हावा. खालच्या पोथ्या गृह्यसूत्रांच्या. तसाही ग्रंथ हातून लिहिला जावा. गुरुगृही असताना सारखे वाटायचे. गृह्यसूत्रातला तो बांधीवपणा. प्रत्येक हालचालीला तेव्हा नियम होते. अज्ञानी लोकांनाही त्यातले संस्कार पाळून नकळत धर्माचे पालन करता येत होते. पण धर्म तसा कळणं चांगलं का ?

हे सगळे ग्रंथ आपण पाठ केले. पण त्यांतले काहीच मनावर बिंबले आहे. पातंजली महाभाष्यातील ती उपमा – ज्याप्रमाणे हरीण येऊन धान्य खाऊन जाईल म्हणून धान्य पेरण्याचे आपण सोडीत नाही– ही उपमा इतकी मनात ठसली ! ही कुठेतरी आपल्या ग्रंथात यावी असे तेव्हा वाटायचे. पण कसला ग्रंथ ? त्या वयातले ते वेड होते. प्रिये ! नंतर पिता गेला. गुरुगृहीचे शिक्षणही तेव्हाच संपले. मी स्नातक म्हणून बाहेर पडलो.

स्नातक ! ! – आपण हे सारे का आठवीत आहोत. 'तो ध्रुव पाहा ! प्रिये ! ध्रुवासारखे आपले वैवाहिक जीवन राहो.' वात्स्यायन स्वतःशी हसला. शेवटी आपण त्याच आठवणीवर येणार. पत्नीच्या. विवाहाच्या पहिल्या रात्री, रात्रभर कथा सांगून जागरण केल्यावर, पहाटे आपण तिला ध्रुवतारा दाखविला.

आणि त्या दिवशी जेवण तयार झाल्यावर बायको म्हणाली,

'जेवण तयार आहे.'

आपण म्हटलं,

'ओम्.'

नंतर अग्नीला आहुती देत आपण म्हणालो,

'या अन्नाला मी पूज्य मानतो. ते कधी कमी पडू नये.'

स्नातकाने म्हणावयाचे तेच आपण म्हणत होतो. पत्नीही गंभीर मुद्रा करून बाजूला उभी होती. आपण म्हटलं,

'ये. तू पण बस जेवायला.'

ती म्हणाली,

'नाही.'

आपण म्हटलं,

'आपण दोघेच आहोत.'

तरीही ती नाही म्हणाली.

ती पत्नीचे व्रत पाळत होती. त्या आठवणीने वात्स्यायन अधिकच अस्वस्थ होऊन उठला. दिवस जाईल– मग रात्र येईल. डोळ्यांच्या कोपऱ्यातून त्याला दिसले की, दासी दारात येऊन गेली. तिने आपल्या अस्वस्थ वागण्याकडे कोणत्या नजरेने पाहिले असेल हे त्याच्यापुढे आले. बाहेर शेतीवरचा माणूस आला असेल. ती त्याला आता परतवून लावील. आपण खोलीत कशा खेपा घालीत आहोत ते ती त्याला हसत सांगेल.

मन आवरले पाहिजे, त्याच्या मनात आले. तो मोठ्याने दासीला ओरडला,

'वासू ! स्नानाला पाणी काढ.'

उत्तरीय पलंगावर फेकून तो स्नानगृहाकडे निघाला. आज स्नानाला फार विलंब झाला. सगळेच बिघडले आहे आज ! एकदम वैताग वाटून तो स्वतःशी म्हणाला, प्रिये ! तू का माहेरपणाला गेलीस ? का ?

स्नानगृहात येऊन कलश हातात घेऊन, दगडीवर, अंगावर पाणी न घेता, घंगाळातील पाण्याकडे पाहत निश्चल बसून राहिला. 'प्रिये ! माझी अवस्था तुला कळो, आणि अर्ध्या मार्गातून तू माघारी फिरोस. हवं तर माहेरी जाऊन परत ये ! काहीतरी निमित्त सांगून ये.' तो स्वतःशी म्हणत राहिला आणि मागील दोन वेळेस गुरूकडील ग्रंथ उतरवून काढावयाचा आहे या निमित्ताने पत्नीच्या मागोमाग अवंतीला जाता आले. तेही निमित्त आता नाही हे मनात येऊन तो कष्टी झाला.

हातातील कलशाने त्याने भडाभडा डोक्यावर पाणी ओतले. मग

अंग पुसून धूतवस्त्र नेसून तो बाहेर आला. देवघरासमोर जाऊन त्याने गंध लावले. नेहमीसारखी देवपूजा हातून व्हावयाची नाही हे त्याच्या लक्षात आले. त्याने दासीला हाक मारली,

'वासू.'

दासी येताच तो म्हणाला,

'आज पूजेचं कुणाला तरी सांग.'

दासी जाताच तो उठून ओटीवर आला. ओटीच्या रंगीत खुंट्यांवर मुलांची खेळणी टांगलेली होती. त्याने त्यांतली एक दोन हेलकावली. डोके उडालेला मातीचा बैल कोपऱ्यात लोळत होता. त्याची ओढण्याची रंगीत दोरी पीळ सुटून विस्कटली होती. खाली बसून दोरीची सुटलेली सुते तो मांडीवर वळू लागला.

मुलांचे खेळ फुटू लागले. आता लौकरच त्यांचे गुरुगृही जाण्याचे वय येईल. गुरुगृही जाण्यास आपल्या पित्याचा आपल्याला विरोध होता. वात्स्यायनाचे मनात आले. आपल्या मुलांना आपला विरोध असणार नाही. पित्याला आपण विट-व्यवसाय शिकून त्याच्याजागी विटप्रमुख व्हावे असे वाटत होते. आईला ते मान्य नव्हते. पित्याच्या विटव्यवसायाचा तिला आत्यंतिक तिटकारा होता. पिता विट झाल्यापासून ती घराबाहेर पडली नाही. तिने नातलग तोडले. तिला लाज वाटत असावी. तिने आपणास गुरुगृही धाडण्याचा हट्ट घेतला. इतर ग्रंथांबरोबर बाभ्रव्याची कामसूत्रे शिकावीत या एका अटीवर पित्याने तिचा हट्ट मानला. आपल्याजवळच्या या ग्रंथात बाभ्रव्याचे कामसूत्र नाही. ते आपण उतरवून घेतले होते. केवळ मातेला आवडणार नाही म्हणून ते आपण तिथेच ठेवले.

वात्स्यायनाला आठवले की, आईने आपणास गणिकांच्या वेशवस्तीत जाण्यास बंदी केली होती. पित्याचा लज्जास्पद व्यवसाय तिथे चाले म्हणून. एकदा महेश्वरदत्ताबरोबर आईची दृष्टी चुकवून आपण तिकडे गेलो. नको ती आठवण, नको! चार राकट क्रूर दासांनी आणि एका गणिकेने, मारीत–पिटीत एका पुरुषाला रस्त्यावर आणून फेकले. त्याचे ते करुण विव्हळणे, रडणे– अरे, मला नागवलं! अरे, मला ठार मारलं–तो ओरडत होता. गणिका हसत होती. घाबरून आपण तेथून पळत सुटलो असता एका दासीने चेष्टा करीत स्तनांनी आपणास धक्का देऊन पाडले! – नको नको, ती आठवण नको.

पण आनंदिकेने असले काही केले का? त्याने स्वतःला विचारले. पुढे करील. आपण तिच्या आधीन झालो की करील.

दोरी टाकून, उठून तो शयनगृहाकडे आला. आनंदिकेच्या आधीन होण्याचा प्रश्नच येणार नाही, त्याच्या मनात आलं. त्या आधीच आपल्याला तिचा तिटकारा वाटू लागेल. मग पूर्वीप्रमाणे सर्वच स्त्रियांच्या तिटकाऱ्याने मन भरून जाईल आणि पूर्वीप्रमाणे त्या हव्याशा वाटत राहून, आपण स्तनादी अवयवांची वेडीवाकडी चित्रे काढू. सगळा अंधार भरेल.

शयनगृहात आल्यावर वात्स्यायनाची दृष्टी पुन्हा रात्रीच्या निर्माल्यावरून फिरली. सुकलेल्या, काळपटलेल्या पुष्पशय्येकडे पाहत असता तो स्वतःशी ओरडला–हे सारे असत्य आहे. ही शैय्या असत्य. ही माला असत्य, कालची रात्र असत्य, पत्नीची आलिंगने असत्य, ती सत्य असती तर, आपल्याला अशी तगमगत एकटा टाकून ती गेलीच नसती. पत्नी असत्य–आनंदिका असत्य! बायांनो! असा असत्य वागू नका. माझ्या मनात पुन्हा तिटकारा उत्पन्न करू नका. आनंदिके! छुन्छुन् करीत तू तरी अवेळी का गेलीस? का–सांग. चार दासांना बोलावून तुझ्या घरातून मला फेकून द्यावयाला? आणि प्रिये! तू माहेरी का गेलीस? परत आल्यावर मला भ्रमिष्ट झालेला पाहण्याचा आनंद घ्यावयाला?

संतापाने उठून तो ओटीवर आला. तेथे आढचाला टांगलेल्या पक्ष्यांच्या पिंजऱ्यांच्या बाजूने जात असता, पिंजऱ्यातला शुक आपल्याकडे पाहत वेडावतो आहे असे त्याला वाटले. हात उगारून त्याने पिंजऱ्यावर बुक्का मारला. आतील शुक ओरडू लागला. त्याच्या ओरडण्याने पलीकडील पिंजऱ्यातील मैना उड्या मारीत चिवचिवू लागली. तिच्या शेजारच्या सारिकेने किंकाळा आवाज काढला. आत काहीतरी गोंधळ आहे हे जाणून कट्ट्यावरचा मोर पंख झाडून माऊ–माऊ करीत कर्कश ओरडला.

त्या कोलाहलाने वात्स्यायनाचे मन अधिकच पेटले. त्याने दोन्ही हात कानावर दाबले. शांत हो–शांत हो, मल्लनाग! त्याला गुरुजींचे शब्द आठवले. शांत हो! तो स्वतःला म्हणाला, तुला हवे असेल तर उज्जयनीला पत्नीच्या मागे जा. पण शांत हो.

एकदम कानांवरचे हात काढून आत वळत तो ओरडला–

'वासू.'

दासी धावत आली. तिच्याकडे न पाहता वात्स्यायन म्हणाला–

'भोजन लौकर होऊ दे.'

'होय महाराज!'

असे म्हणून ती वळू लागली. वात्स्यायन म्हणाला,

'मी अवंतीला जातोय.'

दासीनें खाली मान घालीत म्हटले,

'कुणी लमाण निघालाय का?'

खालच्या मानेने ती हसली का? वात्स्यायनाचे मनात आले, हसू दे. तो म्हणाला,

'स्त्रियांना सोबत लागते. पुरुषांना नाही.'

दासी झटकन वळून आत गेली.

वात्स्यायनाने पुन्हा तिला हाक मारीत जोराने म्हटले,

'वासू! शेतावरच्या माणसांना बोलाव. मला त्यांना कामे सांगून जावयाचे आहे.'

हसू द्या. दासी गेल्यावर वात्स्यायन स्वतःशी म्हणाला, अवंतीला जाणे म्हणजे बायकोच्या मागे जाणे असेच नाही. अवंतीस आपले पुष्कळ गुरुबंधू आहेत. महेश्वरदत्त आहेच. आपण सासुरवाडीस जाणारही नाही.

□

## अवंतीकडे

अवंतीस, सासुरवाडीला निघालेल्या वात्स्यायनाने, गावातून बाहेर पडताना आनंदिकेचे घर टाळले होते. पुन्हा तिने (तिच्या घराच्या गच्चीवरून) 'अवंतीला वाटते?' असे छद्मी हसून विचारलेले त्याला ऐकायला नको होते.

एकदा गावाबाहेर पडल्यावर पत्नीच्या मागे जाण्याचा आपला हट्ट

आपण पुरा केल्याने त्याचे मन मोकळे झाले. आणि आधी खोडी काढून मग समजावीत बसावे तसे त्याचे मन त्याला इतर नाना गोष्टींनी रिझवू लागले. काही अंतरावर आल्यावर मान वळवून गावाकडे पाहत असता वात्स्यायनाच्या मनात आले— ज्या नगर, पत्तन, खर्वट किंवा महृत अशा चार तऱ्हेच्या गावांत नागरिकाने वस्ती करावी असे बाभ्रव्य म्हणतो. त्यांतले खर्वट या जातीचे आपले गाव आहे. गंमत म्हणजे गावाचे नाव मात्र नगर आहे. केव्हातरी प्राचीन काली ते यापेक्षा मोठे असावे. अवंतीचे महत्त्व वाढल्यावर ही भोवतालची गावे आक्रसली असावीत. पित्याच्या मृत्यूनंतर आपल्या मातेने अवंती सोडल्यावर हे गाव निवडले त्यात पित्याचा विटव्यवसाय तिला संपूर्ण स्मृतिशेष करावयाचा होता. या झाडाजवळूनच प्रथम आपल्याला या गावाचे दर्शन झाले. तेव्हा ते आपणास ग्राम्य आणि उदास वाटले. अवंतीचे मित्र आणि परिचित घर सोडावे लागण्याचा तो परिणाम होता. या गावी येताना जशी आपणास उदास भावना आली तशी गुरुगृही जाताना आली होती. गुरुगृह तसे दूर नव्हते. क्षिप्रेच्या पलीकडच्या तीरावरच गुरूचा आश्रम होता. गुरुगृही धाडणाऱ्या मातेचा आपल्याला भयंकर संताप आला होता. रोजचीं खेळण्याची ठिकाणे, मित्र, खेळ आणि बालसाहसे आता मुकणार होती. त्या दिवशीचे दुःख आठवून वात्स्यायनाला वाटले—गुरुगृहीच्या पहिल्या दिवसाइतके अतीव दुःख पृथ्वीवर नसेल.

तो दिवस आपल्या सतत स्मरणात राहील. आपण गुरूच्या आश्रमात माध्यान्ह होण्याआधी पोहोचलो. आपल्याला गुरुपाशी सोडून पिता परत निघाला. आपल्या डोळ्यांत पाणी तरंगू लागले. वाटले, पित्यामागे धावावे. पण गुरुबंधू पाहत उभे होते आणि गुरूचा हात आपल्या खांद्यावर होता. जड, अनोळखी.

मग आश्रमप्रवेशाचा विधी सुरू झाला. गुरूने मंत्र म्हणत हातावर पाणी सोडले. केवढा मोठा ध्वनी वाटला त्यांचा. गुरूने विचारले,

'तुझे नाव काय ?'

आपण खालच्या मानेनेच म्हटले,

'मल्लनाग.'

गुरूने विचारले,

'त्याच वात्स्यायन गोत्राचा ?'

आपण म्हटले,

'त्याच वात्स्यायन गोत्राचा.'

गुरू म्हणाले,

'म्हण—' आता मी विद्यार्थी आहे.''

आपण म्हणालो,

'आता मी विद्यार्थी आहे.'

मग गुरूने हातावर पाणी सोडून विद्यार्थी होण्याचा विधी संपविला. आपल्यानंतर महेश्वरदत्तालाही गुरूने विधी दिला. आपण अतिशय उदास होतो. पण महेश्वरदत्त वसंतोत्सवाला जावयास मिळावे तसा हर्षित होता. त्याला औदासीन्याचे इंद्रियच नव्हते.

त्याला आठवले की, गुरुगृही पहिले पंधरा दिवस आपल्याला उदास वाटले तसे अवंती सोडून नगरला राहायला आल्यावर वाटले होते. पित्याचा मृत्यू होताच मातेने तातडीने अवंतीतले घर विकून सारी धनसंपत्ती एकत्र करून नगरला घर व शेती घेतली. गुरुगृहीची बारा वर्षे संपायला दोन मास राहिले होते, तरी तिने गुरुगृहाहून आपल्याला बोलावून घेतले आणि नगरला आणून ठेवले. या लहान अपरिचित गावी माता व आपण एवढेच होतो.

मग गावातील विवाह जुळवणाऱ्या मध्यस्थी वृद्ध स्त्रिया आपल्यासाठी मुली सांगून आणू लागल्या. वाकलेल्या, शुभ्र केसांच्या, सुरकुतलेल्या, लोभी, धूर्त डोळ्यांच्या या वृद्धांची घरी वर्दळ सुरू झाली. वरणविधी होऊ लागले. आपल्या विवाहासाठी वेडी झालेली आपली माता आणि विवाहाचे भय घेतलेले आपण. गोंधळास आरंभ झाला—

नाना दिशांनी अवंतीकडे येणाऱ्या एका मोठ्या मार्गास त्याचा मार्ग येऊन मिळाला. आता अवंती दोन योजने राहिली. त्याला आठवले. मोठ्या मार्गावरून एक शेतकरी कुटुंब बैलगाडीतून चालले होते. स्त्रिया गाणे म्हणत होत्या. अधूनमधून वाऱ्याबरोबर त्या गाण्याचा सूर ऐकू येत होता. लग्नकार्य असावे—वात्स्यायनाच्या मनात आले. मातेने आपला तेव्हा विवाह केला असता तर आता आपण अवंतीच्या वाटेवर नसतोच. ही बैलगाडी आपणास दिसली नसती. कारण मग अवंतीत आपली सासुरवाडी नसती. पत्नीची आठवण येऊन त्याला वाटले—माता अवचित निवर्तल्यामुळे तेव्हा विवाह झाला नाही. पण ते चांगलेच झाले. विवाह करावासा वाटेल तेव्हाच विवाह करावा.

छे छे ! आपण फार फार किचकट विचार करतो. फारच विचार करीत असतो आणि काही काही बोलत असतो. पत्नी म्हणते, तुम्हाला सर्व कळते, पण एक कळत नाही. आणि काय कळत नाही हे एकदा तिला विचारले तेव्हा तिने मान खाली घातली. माता निवर्तल्यावर आपण काही वर्षे मूढावस्थेत गेलो. त्या मूढावस्थेआधी आपल्याला किती कळत होते ? आणि मूढावस्थेत असता किती कळले ? किती कळले ते ठाऊक नाही. पण मूढावस्थेतून बाहेर आल्यावर, याचे असे का आणि त्याचे असे का ? आणि हिला काय वाटते आणि त्याला काय वाटते ? आणि हे असे असावे आणि ते तसे नसावे आणि हे योग्य आणि ते अयोग्य असे विचार मनात येऊ लागले.

'असो !' दीर्घ श्वास सोडून तो स्वतःशी म्हणाला, 'विवाहाच्या दहा वर्षांत मनावर पुष्कळ नियंत्रण आपण आणले. दहा वर्षांपूर्वी विजयमालीच्या कथेशी महेश्वरदत्ताने आपली तुलना केली. आता करणार नाही. दुसऱ्या कथानायकाशी करील. आणि ती कथा इतकी विपरीत असणार नाही. विवाहाच्या दहा वर्षांनी आपल्याला पुष्कळच सावरले. फक्त अधून मधून पडणारे ते भयंकर स्वप्न पुन्हा पडले नाही तर उरलासुरला दोषही जाईल.'

खरे बोल ! वात्स्यायन आपल्या मनाला म्हणाला, खरे सांग, त्या भयंकर स्वप्नाच्या भीतीनेच पत्नीच्या मागोमाग तू निघालास की नाही ? रिकाम्या घरात, स्वप्नाच्या भीतीनेच तू रात्र काढायला भ्यालास.

आपण भ्यालोच. विवाहानंतरच्या आरंभीच्या काळात ते स्वप्न फार वेळा पडे. वात्स्यायनाला आठवले. पुढे पुढे ते अंतराअंतराने पडू लागले. त्या स्वप्नातला तो महाकाय, राजबिंडा तेजस्वी पुरुष ! त्याने खांद्यावर टांगलेले प्रचंड धनुष्य. पाठीमागून डोक्याच्या वर मुकुटाकारली वाटणारी त्याच्या भात्यांतील बाणांची पिसे. काळ्या

घोड्यावरून दौडत येत आपल्या दारासमोर तो एकदम घोडा उभा करतो. जमिनीवरून धुळीचा लोट उडतो, झाडावरून पक्षी उडतात. उसळीसरशी घोड्यावरून उतरून तो घोड्याच्या आयाळीवर एक हात ठेवून, दुसऱ्या हाताने मिशांना पीळ देत, काळ्याभोर डोळ्यांनी आपल्या दाराकडे तो रोखून पाहत असता दार उघडते आणि आपली पत्नी धावत बाहेर येते. हात पुढे करून धावत जाऊन, ती स्वारापाशी जाऊन त्याच्या गळ्यात पडते. तो एका हाताने तिला घट्ट आलिंगन देऊन एक दीर्घ चुंबन घेतो. त्या चुंबनाने विकलांग झालेल्या आपल्या पत्नीला तो आलिंगनाच्या हाताने उचलून उडीसरशी घोड्यावर स्वार होतो. कुठल्या तरी अंधाऱ्या गवाक्षाच्या फटीतून आपण सारं पाहत असतो. आपले हातपाय मृतवत होतात. अंगाला दरदरून घाम सुटतो आणि दुःखाचे हुंदके येत असता रडतच आपण जागे होतो.

हे स्वप्न बालपणी पाहिलेल्या एका प्रसंगामुळे असेल. आपण असा कधी विचारच केला नाही. आपण उत्सवानिमित्त गुरूकडून घरी आलो असता तो प्रसंग घडला. पिता भोजनास बसत होता इतक्यात दाराशी एक पुरुष आला. त्याने दोन मुले दोही बाजूला कमरेवर घेतली होती. मोठमोठ्याने रडत तो दाराशी टेकला. 'अहो विटमहाराज ! माझी पत्नी मला परत द्या. अहो, तिला वेशेतून परत आणा. या अर्भकांकडे पाहा.'

जेवायला बसत असलेला माझा पिता संतापाने पानावरून उठला. दाराशी जाऊन त्याने दार उघडताच बाहेरच्या पुरुषाने दोन्ही अर्भके माझ्या पित्याच्या पायावर लोटून आक्रोश करीत म्हटले,

'विटमहाराज ! मी आपल्या पाया पडतो. या मुलांच्या आईला गणिका करू नका. माझा संसार उद्ध्वस्त करू नका. या अर्भकांकडे पाहा.'

माझ्या पित्याने क्रुद्ध नजरेनं पाहत, अर्भकांना पायावरून ढकलून म्हटले, 'जा जा मूर्खा ! तुझी पत्नी स्वेच्छेने माझ्याकडे गणिका होण्यासाठी आली. निर्बुद्धा ! तुझ्या पत्नीने अर्भकांना आणि तुला सोडले यात माझा दोष नाही. निघ येथून.'

पण तो पुरुष आणखी रडून आर्जवे करू लागताच माझ्या पित्याने हातातल्या काठीने त्याला मारीत घराच्या आवाराबाहेर घालवून दिले.

निश्चितच या प्रसंगाचे मनात राहून आपल्याला काळ्या घोड्यावरील वीराचे स्वप्न पडत असावे. पण गेल्या सबंध वर्षात ते आपल्याला पडलेले नाही. शापातून मुक्तता व्हावी तशी आपली त्या स्वप्नातून मुक्तता झाली असेल. त्या स्वप्नात जे भोगावे लागते त्याहून मरण बरे. किंवा त्यापेक्षा मन आवरणे बरे. पत्नीच्या मागे येण्याची ही शेवटची वेळ ठरो. सर्व बाजूने विचार करून मगच वर्तन करावे असे गुरू सांगे. आपली पत्नी आप्तांना भेटायला गेली आहे, त्यात त्रास करून घेण्याजोगे काय आहे ? आपल्याला आप्त नाहीत. पण तिला जर आप्तांचे सुख मिळत असेल तर घेऊ द्यावे.

इतक्यात अवंतीच्या दिशेकडून वळणावरून एक स्त्रीपुरुषांचा जथा आला. स्त्रियांच्या डोकीवर बोचकी होती. काही पुरुषांनी मुलांना खांद्यावर बसवले होते. अवंतीत हाट आटोपून खेडूत येत आहेत. काही पुरुषांनी वेगवेगळ्या आकाराचे रांजण डोक्यावर घेतले होते. स्त्रियांच्या गाठोड्यांतून पळ्या, कालथ्यांची लाकडी टोके डोकावत होती. स्त्रियांच्या गळ्यांत हाटात घेतलेले मण्यांचे हार होते. त्या जथ्याच्या मागेच झोळण्याची डोली करून चार पुरुष आळीपाळीने खांदेपालट करीत होते. डोलीत एक आजारी तरुण स्त्री होती.

वात्स्यायनाच्या छातीत एकदम चर्रर झाले. सगळ्या तऱ्हेच्या शंकांनी त्याच्या डोक्यात थैमान घातले. आपली पत्नी सुखरूप पोहोचली असेल ना ? तिला कुठे दुखापत झाली नसेल ना ? सर्प, चोर यांपासून भय प्राप्त झाले नसेल ना ? मार्गात उन्हाच्या तडाख्याने ती मूर्च्छा येऊन पडली नसेल ना ?

अवंती येईपर्यंत वात्स्यायनाच्या मनाचे हे असे खेळ चालले होते.

[ क्रमशः ]


# पॅपिलॉन
# पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तके

# आवडलेली माणसे

## नवं काही न-तांत्रिक देण्याचा प्रयोग

सुवर्ण प्रकाशनातर्फे अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या 'आवडलेली माणसे' या पुस्तकात डॉ. विद्याधर पुंडलीक यांनी रेखाटलेल्या दहा व्यक्तिचित्रांचा संग्रह आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर, ना. ग. नारळकर, चिं. वि. जोशी, श्री. पु. भागवत, पु. ग. सहस्रबुद्धे, इरावती कर्वे, त्र्यं. शं. शेजवलकर, पु. ल. देशपांडे, अनंत काणेकर आणि साने गुरुजी हे या संग्रहातले दहा मानकरी म्हणजे राजकारण-समाजकारण, शिक्षण, संशोधन आणि साहित्य या प्रांतातले महाराष्ट्राच्या अभिमानाचे विषय आहेत. हजारो मराठी माणसांनी त्या सर्वांवर पुंडलिकांइतकेच प्रेम केलेलं आहे. तरीही या संग्रहाची अनुक्रमणिका पाहून मला पहिली दाद द्यावीशी वाटली ती, पुंडलिकांच्या रोचक निवडीची, 'सिलेक्शन'ची. मराठी माणसानं आणि पुंडलिकांनीही या दहांखेरीज इतरही अनेकांसाठी जीव टाकला असेल, पण हा संग्रह वाचल्यानंतर असं जरूर वाटतं की, या दहाजणांचं इथलं अस्तित्व हे अपरिहार्य आणि अपरिवर्तनीय होतं. या दहा 'फ्रेम्स'मध्ये हीच दहा चित्रं हवी होती.

या निवडीनंतर दुसरा उल्लेख करायला हवा तो या व्यक्तिचित्रांच्या वैविध्यपूर्ण लेखनपद्धतींचा. या दहा व्यक्तिरेखाटनांसाठी पुंडलिकांनी (बहुधा) जाणूनबुजूनच चार-पाच वेगवेगळ्या लेखनपद्धती स्वीकारल्या आहेत. एरवी व्यक्तिचित्रलेखन हा मराठीतला शैलीच्या दृष्टीनं एक साचेबंद प्रकार होऊन राहिला आहे असं कधी कधी वाटायला लागतं. तसा हा प्रकार उदंड पसरला आहे, त्याचा धागा अगदी सध्याच्या व्यक्तिचित्रणात्मक – व्यक्तिकेंद्रित नाटकं-कादंबऱ्यांपर्यंत थेट नेऊन जोडता येईल. पण सामान्य वाचकांच्या दृष्टीतून व्यक्तिचित्र हा साहित्यप्रकार म्हणून वाढायचा-फुलायचा-विस्तारायचा थांबला आहे की काय, अशी शंका कधी कधी येते. 'माणदेशी माणसं' आणि 'व्यक्ती आणि वल्ली' हे व्यंकटेश माडगूळकर आणि पु. ल. देशपांड्यांचे व्यक्तिचित्रसंग्रह हे मराठी व्यक्तिचित्रणात्मक साहित्यातले दोन मैलाचे दगड आहेत हे निश्चित, पण मराठी वाचक ती शेवटाची-मुक्कामाची स्थानके मानून तिथे थांबणार असेल तर, ती खेदाची गोष्ट तर आहेच, पण त्याचं एक कारण 'व्यक्तिचित्रात नवं-आगळं असं लिहिण्या-करण्यासारखं काही उरलं नाही' ही समजूत हे आहे असं वाटतं. सुदैवानं 'आवडलेली माणसे'चं लेखन हे अशा प्रकारच्या समजुतींना थारा देणारे नाही. या दहा व्यक्तिरेखाटनांपैकी सहा ही काहीशी रुळल्या वाटेनं जाणारी पारंपरिक व्यक्तिचित्रं आहेत, तर एक (चिं. वि. जोशी) बहुशः वाङ्मयीन समीक्षेचा एक व्यक्तिनिष्ठ नमुना आहे. पु. ल. देशपांडे यांची व्यक्तिरेखा ही संपूर्णपणे, पुंडलिकांनी घेतलेल्या त्यांच्या प्रदीर्घ मुलाखतीमधून साकारली आहे, मुख्यतः आठवणींच्या स्वरूपाचं एक व्यक्तिचित्र आहे आणि सानेगुरुजींचं व्यक्तिरेखन हे लेखकानं 'शाम'ला लिहिलेल्या जाहीर पत्रातूनच उभं करण्याचा प्रयत्न पुंडलिकांनी केलेला आहे. तेव्हा 'व्यक्तिचित्रांच्या विविध लेखनशैलींचं एक एकत्रित आणि प्रायोगिक दर्शन' हीमुद्धा या व्यक्तिचित्रसंग्रहाकडं बघण्याची एक महत्त्वाची दृष्टी होईल. विशेषतः पु. ल. देशपांड्यांच्या व्यक्तिचित्रणाविषयी केला गेलेला मुलाखतरूप प्रयत्न मला स्वतःला अत्यधिक वेधक वाटला. 'विनोद' हा केंद्रबिंदू धरून रंगवलेल्या या खुल्या गप्पा, एरवी एक दिलखुलास मुलाखत म्हणून खपून गेल्या असत्या, पण त्यातून 'विनोदी पु. लं.'चं एक एकसंध आणि भक्कम शब्दचित्र कसं उभं राहतं आणि विनोदाशिवाय पु. लं.च्या व्यक्तिमत्त्वाच्या नाना कळांना-कडांना ते कसं अलगद आपल्यात सामावून घेतं, ती उपजत कारागिरी पाहण्यासारखी आहे. तेव्हा व्यक्तिचित्रणाच्या सांकेतिक चौकटी-चाकोरी भेदून नवं काही न-तांत्रिक देण्याचा प्रयोग म्हणून तरी 'आवडलेली माणसे' निश्चितच आवडण्यासारखं आहे.

या संग्रहातली दहाही व्यक्तिचित्रं एकाच पातळीची-दर्जाची आहेत असा आग्रह कुणीच धरू शकणारं नाही. कमी-जास्त शरीरव्याप्तीबरोबरच ती कमी-जास्त उत्कटतेनं रंगवली गेलेली आहेत, हे त्यांच्या दर्जातल्या तफावतीचं एक कारण आहे. म्हणजे असं की, ना. ग. नारळकरांचं व्यक्तिचित्रण जितक्या आत्मीयतेनं झालं आहे तितक्या आत्मीयतेनं त्र्यं. शं. शेजवलकरांचं होईलच असं नाही, आणि ते स्वाभाविकही आहे. दुसरं असं: या प्रत्येक व्यक्तिचित्रामागे एखादं भावचित्र आहे. म्हणजे प्रत्येक चित्रणामागे एक किंवा दोन मध्यवर्ती भावनांचं रिंगण असतं, आणि व्यक्तिचित्र हा व्यक्तिनिष्ठ लेखनप्रकार म्हणून मान्य झालेला असल्यामुळे या बदलत्या भावच्छटांबरोबरच व्यक्तिचित्रातली उत्कटता, आपुलकी बदलत जाते. या बदलत्या भावभावनांच्या संदर्भात या दहा व्यक्तिचित्रांचा आलेख घेतला तर असं दिसतं की, आदर या एका भावनेच्या अनेक नाजूक छटा निरनिराळ्या व्यक्तिचित्रात प्रतिबिंबित झालेल्या आहेत. उदाहरणार्थ स्वा. सावरकरांविषयीचा आदर हा भावकल्लोळात बुडून वाहवत जाणाऱ्या अनुयायाचा आहे, तर त्र्यंबक शंकर शेजवलकरांविषयीचा आदर हा दूरस्थ आणि डोळस आहे. नानासाहेब नारळकर आणि डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे या शिक्षकद्वयांविषयीचा त्यांचा आदर विद्यार्थीसुलभ, नम्र असला तरी, त्यात तत्कालीन स्नेह आणि उत्तरकालीन चिकित्सा यांचे प्रवाहही मिसळलेले दिसतात. असाच चिकित्सकपणा पुंडलिकांनी केलेल्या चिं. वि. जोशांच्या चिमणरावच्या विशुद्ध वाङ्मयीन समीक्षेतही उठून दिसतो, तो अर्थातच स्वागतार्ह आहे. कारण त्याचा रसिकतेचा पाया कधी सुटला-ढळलेला नाही. श्री. श्री. पु. भागवत, कै. डॉ. इरावती कर्वे, पु. ल. देशपांडे आणि अनंत काणेकर या चार व्यक्तिचित्रांचं समान महासूत्र मात्र आदराऐवजी स्नेह हे आहे. हा स्नेहमुद्धा पुन्हा अनेकरंगी-अनेकपदरी आहे. मौजेच्या श्री. पु. विषयीचा स्नेह हा लेखक – प्रकाशकाच्या मैत्रीतून निर्माण झाला आहे तर कै. इरावतीबाईंसंबंधीचा स्नेह हा ज्येष्ठ सहकाऱ्याविषयीच्या जिव्हाळ्याच्या स्वरू-

पाचा आहे. अनंत काणेकर व पु. ल. देशपांडे यांच्याविषयीचा स्नेह हा 'समानशीले व्यसनेषु सख्यम्' अशा जातीचा आहे हे उघडच आहे. मात्र हा स्नेह किंवा आदर अमिश्र, Pure कधीच नसतो. त्यातही परस्पर छेद जातात, अनंत काणेकरांच्या अपयशाची परखड मीमांसा होते, इरावतीबाईंमधले अंतर्विरोध मोकळेपणाने उलगडले जातात, डॉ. सहस्रबुद्धे यांच्यातल्या नव्या जाणिवांच्या उणिवेविषयी संयमी पण मार्मिक चर्चा होते. सानेगुरुजींच्या आत्महत्येमागील कोमलतेमागे पुरेसा दडू न शकणारा हळवा भित्रेपणा उल्लेखिला जातो आणि मग प्रकर्षानं जाणवतं की, पुंडलीक ज्यांची चित्रं रेखाटताहेत, तीही माणसंच आहेत, चालतीबोलती हाडामांसाची मानवरूपं आहेत. कुणी देवलोकातले अतर्क्य यक्षकिन्नरगंधर्व नव्हेत. प्रमाणशील विवेकाचं भान न सोडणाऱ्या त्यांच्या पहिल्या नऊ व्यक्तिचित्रांतही दोष नाहीत असं नाही, पण त्यातही, तरीही डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे रेखाटलेले व्यक्तिचित्र कलात्मकता आणि भावात्मकता या दोन्ही दृष्टिकोनातून मला सर्वाधिक आवडलं आणि निर्दोष वाटलं. आदराला आपलेपणाची जोड सर्वांत जास्त मिळाली आहे ती इथंच आणि त्या खालोखाल प्रा. नारळकरांच्या व्यक्तिचित्रणात. लेखक म्हणून सदैव सावध असतानाही माणूस म्हणून पुंडलीक सर्वांत अधिक खुलले आहेत, मोकळे झाले आहेत ते या दोन व्यक्तिचित्रांत. कमीत कमी 'क्राफ्ट' आणि कृत्रिमता असणारी ही दोन व्यक्तिचित्रं या संग्रहातली अनुक्रमे पहिल्या दोन क्रमांकांची व्यक्तिचित्र आहेत असं माझं मत आहे.


स्वा. सावरकर आणि सानेगुरुजी यांच्या व्यक्तिचित्रांचे क्रमांक या संग्रहात मी शेवटचे लावीन. एक तर सावरकरांचे व्यक्तिचित्र हे चक्क 'old wives tales'च्या चालीवर गेलं आहे. सावरकरांच्या वक्तृत्वाचे फुटकळ नमुने आणि अनेकवार इतरत्रही उद्धृत केली जाणारी त्यांची वाक्ये एवढ्याच परिघात रेंगाळलेल्या या चित्रणाची भट्टी साफ फसली आहे. सानेगुरुजींचे व्यक्तिचित्र तर पुंडलिकांच्याच शब्दात म्हणजे 'घरगुती हळवेपणात पाकवलेले' आहे. मुळात हे व्यक्तिचित्र 'शाम'ला पुंडलिकांनी लिहिलेल्या जाहीर पत्राच्याच स्वरूपात आहे आणि छापण्यासाठी वेगळी लिहिली गेलेली पत्रं जितकी कृत्रिम असावीत त्यापेक्षा ते काकणभर अधिकच कृत्रिम आहे. सानेगुरुजींच्या अंतिम योग्यतेचं मोजमाप महाराष्ट्रानं थोड्या सढळ हातानंच घेतलं आहे आणि त्यात उत्सवाचाच भाव पुष्कळ आहे अशी माझी प्रामाणिक शंका आहे, तिला पुरावा मिळवून देणारं असंच पुंडलिकांचं लेखन आहे. सानेगुरुजींचं हळवेपण, त्यांचं रडणं, त्यांची आत्महत्या या सगळ्याभोवती त्यांच्या भगतगणानं जे एक नाटकी कौतुकाचं तेजोवलय बहुधा अकारण उभं केलेलं आहे त्याचं प्रतिबिंब पुंडलिकांच्या चित्रणात वारंवार येतं. सानेगुरुजींच्या दोषांचाही उल्लेख ते करतात, पण इतर भाग वाचून संशयी बनलेल्या माझ्या मनाला त्या दोषदिग्दर्शनालाही हळव्या सहानुभूतीची न लपणारी किनार असल्यासारखं वाटतं. आधीची आठ व्यक्तिचित्रं लिहिणाऱ्या पुंडलिकांची खूण–ओळख या व्यक्तिचित्रात पटत नाही, ते गुरुजी–पठडीतले अरण्यरुदन ठरते. 'महाराष्ट्रीय कुलवंत स्त्री'च्या ज्या तीन 'अविस्मरणीय' अश्मयुगीन प्रतिमा पुंडलिकांनी शामच्या आईच्या निमित्तानं उल्लेखिल्या आहेत, त्या वाचून तर हसण्याचेही भान राहात नाही, आणि पुंडलीक समाजशास्त्राऐवजी पुरातत्त्वशास्त्राचे–आर्किऑलॉजीचे-प्राध्यापक असावेत अशी शंका येते.

पुंडलिकांनी या संग्रहाला 'आवडलेली माणसे' असं नाव दिलं आहे. या नावामुळं विशेषत: त्यातल्या 'आवडलेली' या विशेषणामुळं त्यांच्या कलात्मक व व्यावहारिक सत्याच्या परिघाला कुंपण पडण्याची वेळ तर आली नसेल ना, अशी शंका पुस्तक वाचताना मला आली. तथापि यासंबधीचा निर्णयिक खुलासा स्वत: श्री. पुंडलिकच करू शकतील. पण 'आवडलेली' हे विशेषण मला जरुरीपेक्षा जास्त ढोबळ, जास्त प्रदर्शक वाटलं, आणि असंही निश्चितपणे वाटलं, की 'आवलेली माणसे' पेक्षा 'जाणवलेली माणसे' जर पुंडलिकांनी वाचकांसमोर उभी केली असती तर माणूस म्हणून आणि त्याहीपेक्षा लेखक म्हणून ते अधिक प्रामाणिक वाटलं असतं. 'आवडी'च्या अपेक्षेमुळे काही व्यक्तींना आणि निवडलेल्या व्यक्तींच्या काही गुण–गुणधर्म–पैलूंना 'प्रवेश बंद' करण्याची वेळ आली असण्याची शक्यता आहे का? कदाचित याच संदर्भात, या संग्रहाला 'गोड गोड व्यक्तिचित्रे' असं शीर्षक देण्याचा काहीसा आततायी विचारही माझ्या मनात येऊन गेला.

पुंडलिकांनी वेळोवेळी लिहिलेल्या या व्यक्तिचित्रांचा कालदृष्ट्या पल्ला (range) खूपच मोठा, म्हणजे जुलै १९५७ पासून जानेवारी १९७५ पर्यंत आहे. (त्यांच्या दर्जात विषमता असण्याचं हेही एक महत्त्वाचं कारण असू शकेल काय?) अनंत काणेकरांचे व्यक्तिचित्रण यातलं सर्वांत जुनं, तर पु. ल. देशपांडेचांचं सर्वांत अलिकडचं ताजं. या सर्व व्यक्तिचित्रांना त्यांनी कथांसारखी शीर्षकं दिली आहेत, आणि त्यातली पाच तरी अतिशय आकर्षक आहेत. 'शाळेची अद्‌भुत दंतकथा करणारा मुख्याध्यापक' आणि 'दूर कोपऱ्यातला बैरागी चाफा' ही दोन आवडण्यासारखी original touch असलेली शीर्षकं; तर तुमचा आमचा राजा लेखक हे पु. लं. चं शीर्षक सर्वांत जास्त भंपक, निरर्थक आणि बटबटीत. पुस्तकाचं अंतरंग देखणं आणि प्रुफरीडिंग काटेकोर असल्याचं प्रास्ताविकात पुंडलीक सांगत असले, तरी प्रत्यक्षात आत त्याचा प्रत्यय कमीच येतो; विशेषत: मुद्रितशोधनाच्या विषयात. सुभाष अवचट यांनी या दहा व्यक्तींची काढलेली प्रतीकात्मक रेखाचित्रं मात्र लाजवाब आहेत. ही दहा चित्रं आणि तिरंगी मुखपृष्ठ यांची वेधक, सुबक, नेटकी आणि मोजकी सजावट करणाऱ्या अवचटांनी दृष्ट टाळायला गालबोट हवंच म्हणून की काय, मुखपृष्ठावरच्या 'पुंडलीक' शब्दात पु ऐवजी ड वर अनुस्वार ठेवून दिला आहे!

—शिरीष सहस्रबुद्धे

**आवडलेली माणसे**
विद्याधर पुंडलीक
सुपर्ण प्रकाशन, पुणे
किंमत १४ रुपये.



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

पु. ल. इनामदार

## प्रकरण पंधरा : सिमला येथील वरिष्ठ न्यायालयात

सिमल्याला जायला म्हणून मी दिनांक २५ एप्रिल १९४९ ला रात्री ग्वाल्हेर सोडले व दि. २६ ला सकाळी दिल्लीला पोचलो. दिनांक २६ चा दिवस मी दिल्लीत कामे केली व रात्री तेथून रवाना होऊन दिनांक २७ ला पहाटेच अंबाला कँटोनमेंट येथे उतरलो. तेथे मी, नथूराम आणि इतर चौघे–करकरे, मदनलाल, गोपाळ गोडसे व डॉ. परचुरे–यांना अंबाल्याच्या केंद्रीय बंदीगृहात सकाळी भेटलो. त्याच दिवशी रात्रीच्या गाडीने अंबाला सोडून मी दिनांक २८ एप्रिल ४९ ला सकाळी ८ वाजण्याचे सुमारास सिमल्याला पोचलो.

सिमला येथे तेथल्या सेसिल हॉटेलमध्ये दोन खोल्यांचे एक कोष्ठ माझ्यासाठी मी पसंत न करण्याच्या विकल्पासहित राखून ठेविले होते. तेथील व्यवस्था व हवेशीरपणा बघून मला ती जागा आवडली. ही जागा सेसिल हॉटेलच्या मुख्य मोठ्या इमारतीत नव्हती. त्या इमारतीच्या उत्तरेच्या बाजूला लागूनच एका दुमजली बंगलेवजा इमारतीत होती. आणि त्या जागेला 'कूपरेज क्वार्टर्स' असे नाव होते. माझ्याच शेजारच्या जागेत एक युरोपिअन महिला आपल्या तीन वर्षांच्या लहान मुलांला घेऊन राहत होती. उन्हाळ्याची सुटी घालवायला सिमल्याला पुढे येऊन आपल्या ऑफिसर यजमानांची वाट पाहत असावी. मी गेलो त्या दिवशी माझ्या सहयोगी मंडळींपैकी कोणीच आले नव्हते. येणार होते दोघेच: श्री. बॅनर्जी व डांगे. दुपारी मी हायकोर्टात गेलो. पूर्व पंजाब हायकोर्टाची ही इमारत म्हणजे ब्रिटिश अमदानीतील हिज एक्सलन्सी व्हाइस रॉयसाहेबांचे उन्हाळ्यात राहण्याचे राजगृह होते. नाव पीटररॉफ. हे नाव बहुतेक रशियाच्या झार राजांच्या ह्याच नावाच्या राजवाड्यावरून ठेविले असावे. भले विस्तीर्ण, कुंपणाच्या भिंतीने वेढिलेले आवार, त्यामध्ये इंग्लिश धाटणीची दुमजली उंच भव्य इमारत, आजूबाजूला बरीचशी बंगलीवजा घरे, बागबगीचा सर्व काही व्यवस्थित होते. एका बंगलीमध्ये हायकोर्टाच्या रजिस्ट्रार महोदयांचे ऑफिस होते व त्या शेजारीच दुसऱ्या बंगलीमध्ये बाररूम व लायब्ररी होती. मी रजिस्ट्रार महोदयांना भेटलो व स्वतःची ओळख सांगून तेथील माहिती विचारली. अपिलंट शंकर किस्तय्यासाठी शासनातर्फे एक वकील श्री. देवेंद्रनाथ अवस्थी या नावाचे नियुक्त झाल्याचे कळले. त्यांना वेळ असल्यास येऊन भेटून जाण्याबद्दल निरोप पाठविला. मी रजिस्ट्रार महोदयांना पुष्कळशा गोष्टी विचारल्या त्यांत प्रथमच हे विचारले की, माझ्या खादीचे धोतर, टोपी, वहाण घालून येण्यावर काही आक्षेप तर हायकोर्टात घेतला जाणार नाही ! अर्थात मी काळा कोट, झगा वगैरे सर्व घालून येईनच, असा खुलासा केला. त्यावर रजिस्ट्रार महोदयांनी पुन्हा माझ्या खादी वेशाकडे बघितले नि किंचित हसून म्हणाले, 'अहो मुळीच नाही ! या पोशाखावर कोणीही आक्षेप घेणार नाही.' त्यांनी पुढे सांगितले की, अपीले हायकोर्टाच्या फुलबेंचपुढे चालणार–ऐकली जाणार आहेत. फुलबेंच मुख्य न्यायमूर्तींसहित तिघा न्यायमूर्तींचे आहे. पूर्व पंजाब हायकोर्टाचे स्थायी मुख्य न्यायमूर्ती माननीय सुधीर रंजनदास हे आजारी असून रजेवर आहेत म्हणून त्यांचे जागी माननीय जस्टिस श्री. भंडारी आय. सी. एस. अस्थाई मुख्य न्यायमूर्ती अध्यक्ष असतील व त्यांचेबरोबर जस्टिस श्री. अछरूरामजी व जस्टिस श्री. गोपालदास खोसला आय. सी. एस. हे काम पाहतील. फुलबेंचवर दोघेजण आय. सी. एस. बसणार हे ऐकून मी दचकलोच. मला वाटले तिघांच्या बेंचमध्ये दोघा आय. सी. एस. न्यायमूर्तींचे बहुमत ! एकाच आय. सी. एस. न्यायाधीशांचा अनुभव घेऊन आलो. तो येथे एकाच्या ठिकाणी दोन ! कसे होणार माझे नि माझ्या पक्षकारांचे ?' माझ्या मनातल्या विचारांची गिरकी संपायच्या

आधी रजिस्ट्रार महोदयांनी मला तेथील ॲडव्होकेट जनरलांचे नाव सांगितले व म्हणाले, 'अर्थात या महात्मा गांधी खून खटल्याच्या अपीलांसाठी मुंबईचे ॲडव्होकेट जनरल श्री. दप्तरी येणार आहेत व तेच अपीलांचे काम बघतील. श्री. दप्तरी अजून आले नाहीत का? तुम्ही उतरला आहात त्या सेसिल हॉटेलातच त्यांची व्यवस्था झाली आहे! त्यांनी मला पुढे सांगितले की, बंदी अपिलंट नथूरामही येथे हायकोर्टात हजर राहणार आहे. नथूराम कोणत्या बंदीगृहात ठेवला जाणार आहे त्याचा पत्ता व टेलिफोन नंबर वगैरे त्यांनी मला सांगितला. आमचे बोलणे चालले असताच श्री. अवस्थी तेथे आले. रजिस्ट्रार महोदयांनी आमची ओळख करून दिली व मला प्रकरणांचे छापील पुस्तक सर्व व्यवस्थित मिळाले आहेतना याची चौकशी केली. श्री. अवस्थीजींनी आणि मी रजिस्ट्रार महोदयांचा निरोप घेतला नि हायकोर्टातून बाहेर निघून चालतच सेसिल हॉटेलवर माझ्या खोलीमध्ये परत आलो.

मी श्री. अवस्थींनाही बरेचसे प्रश्न–हायकोर्टाबद्दल, न्यायाधीशांबद्दल, कोर्टातल्या एकंदर वातावरणाबद्दल विचारले. हायकोर्टात व सेसिल हॉटेलभोवती वातावरण पूर्णतया 'विलायती' होते. चपरासी, बेरा (वेअरर्स), आया, इकडे तिकडे हिंडताना दिसत. सगळ्या सभ्य जनतेचा पोशाख इंग्रजी सूटबुटांतला. बोलणे, वागणे सारे साहेबासारखे. ते बघून माझ्यासारखा देशी संस्थानामधला धोतऱ्या वकील अगदी संकोचल्यासारखा झाला होता. परंतु अवस्थींनी मला एक एक जे काही सांगितले त्याने मला पुष्कळच हायसे, मोकळे वाटले. मी फुलबेंचच्या दोन आय. सी. एस. न्यायाधीशांच्या नावाने मुळीच काळजी करू नये, असे त्यांनी मला विश्वासून सांगितले. माझ्या मते यापेक्षा चांगले बेंच आपल्याला येथे दुसरे कोणतेच मिळणार नाही! श्री. अवस्थी मला सांगत होते! त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, जस्टिस भंडारी फारच कनवाळू मनुष्य अगदी साधु पुरुषच? आणि जस्टिस खोसला? अगदी मस्त आनंदी मनुष्य! पण भारीच हुशार है!' जस्टिस अछरूरामजींबद्दल श्री. अवस्थींनी सांगितले की, ते–अछरूरामजी, स्वतःच एक निर्वासित आहेत आणि त्यात पक्के आर्यसमाजी आहेत. 'कसे सांगू इनामदारजी तुम्हांला? आपल्याला येथे यापेक्षा चांगल्या न्यायाधीशांचे बेंच दुसरे मिळणार नाही. तुम्ही मुळीच काळजी करू नये!' सिमला येथे माझ्या पहिल्याच दिवशी पहिल्यादांच भेटलेल्या आपल्या माणसाचे, श्री. अवस्थींचे सारे बोलणे ऐकून मला किती सांत्वना–किती धीर वाटला होता म्हणून सांगू?

आम्ही दोघांनी महात्मा गांधी खून खटल्यामधल्या सगळ्या अपिलांबद्दलही चर्चा केली. मी अवस्थींना त्यांनी प्रकरणाची पुस्तके–विशेषतः सगळा पुरावा–वाचला आहे की नाही याबद्दल विचारले. त्यांनी तो सगळा एकदा साद्यंत वाचून काढला आहे व आता पुन्हा वाचत असून त्यांतल्या मुद्द्यांची टाचणेही लिहीत असल्याचे सांगितले. ते मला म्हणाले, 'इनामदारजी! मी ऐकिले की, तुम्ही या अपिलांमध्ये तिघा अपिलंटकडून वकील आहात म्हणून. नथूराम गोडसे, गोपाळ गोडसे नि डॉक्टर परचुरे! खरे आहे का हे? असे असेल तर फारच मोठे काम आहे ते!' मी त्यांना थोडक्यात माझ्या कामाच्या व्याप्तीबद्दल सांगितले व नथूरामने स्वतःच स्वतःचे काम चालवायचे ठरविल्यामुळे माझे काम किती कमी होणार आहे याची कल्पना दिली. प्रकरणाचे कागद वाचताना त्यांना काही नीट समजले नाही, कोणती बाब कुठे आहे हे लक्षात आले नाही, तर मला विचारायला संकोच करू नका. मी आनंदाने तुम्हाला मदत करीन वगैरे सांगितले. त्यांचे पक्षकार शंकर किस्तय्या याच्या बचावाबद्दल मला काय वाटते ते मी आपणहून त्यांना सांगितले. ते माझे म्हणणे लक्षपूर्वक ऐकत होते व मधून मधून काही टिपणेही घेत होते. त्या पहिल्याच दिवशी त्या तरुण वकिलाने मला काही एकदोन प्रश्न विचारले, ते मला माझ्या स्वतःच्या उत्तरांच्या उत्स्फूर्त शब्दांमुळे अजून लक्षात आहेत. आपण आपल्या मनात पुष्कळ गोष्टींचा विचार करीत असतो. पण त्या कुणाजवळ बोलून दाखवाव्या अशी वेळ येत नाही, आली तर बोलावेसे वाटत नाही. कारण प्रश्नाचे उत्तर द्यायचे किंवा नाही हे प्रश्न विचारणाऱ्या माणसाकडे बघून आपल्याला चटदिशी उमगते. त्या दिवशी असेच होऊन माझ्या मनातले विचार मी बोलताना किंवा दुसऱ्याने बोलताना प्रथम ऐकिले! श्री. अवस्थी मला म्हणाले होते, 'हे पहा इनामदारजी! मी आपल्यापुढे जे बोलतो ते माझ्या मर्यादेबाहेरचे आहे असे आपल्याला वाटले तर मला क्षमा करा. आपण वयाने, अनुभवाने व ज्येष्ठ आहात. पुराव्यांतले आपले कूटपरीक्षण मी काळजीपूर्वक वाचले. पण पुष्कळदा आपण एखाद्या मुद्द्यावर प्रश्न विचारताना मध्येच थांबलात असे मला वाटले. आपण हे असे का करता असा मला प्रश्न पडला आहे. आणखी पुढे आपण प्रश्न का विचारले नाहीत? आपल्या पक्षकाराने जे काही सांगितले होते त्याची भीती वाटून तुम्ही पुढे प्रश्न विचारण्याचे धैर्य केले नाही–धैर्य झाले नाही असे होते का? का आपणास वाटले की, जास्त प्रश्न विचारले तर, साक्षीदार जास्ती अक्कलहुशारीने उत्तर देऊन पूर्वी केलेल्या चुका सांभाळून घेईल?' मला त्या तरुण वकिलाच्या स्वच्छ मनाचे आणि निश्चयी ध्येयवादाचे कौतुक वाटले व त्याच्या बुद्धीचेही आश्चर्य वाटले. मी त्यांना सरळ उत्तर न देता, 'माझ्या पक्षकारांच्या प्रकरणाबद्दल तुम्ही सध्या जास्ती खोलात जाऊ नका. मी हळूहळू तुम्हाला सर्व समजावून सांगेन' असे म्हणून माझी सुटका करून घेतली. त्यांचा दुसरा प्रश्न असाच, मला स्वतःला बघायला लावणारा. ते मला म्हणाले, 'आपण खादीचे कपडे घालता हे मी पाहिले! मी विचारू का? आपण काँग्रेसवाले आहात का?' मी पटकन उत्तर दिले, 'मी कुणाचाही, कशाचाही 'वाला' नाही. मी नुसता पु. ल. इनामदार आहे. हा पु. ल. इनामदार अजून एखाद्या गुरूच्या शोधात आहे!' माझे हे उत्तर ऐकून श्री. अवस्थींचा मला 'आपण' म्हणण्याचा सगळा 'पुरावा' आपसूकच नाहीसा झाला व ते मोकळ्या मनाने तेव्हापासून माझ्याशी बोलायला लागले. आम्ही आणखीही पुष्कळ बोललो. शेवटी संध्याकाळ झाली म्हणून ते उठले. पण जायच्या अगोदर त्यांनी मी त्यांना दाखवलेल्या मुद्द्यांबद्दल माझे आभार मानले व जाताना मी हस्तांदोलना-

## मी कुणाचाही, कशाचाही 'वाला' नाही....

साठी पुढे केलेला हात आपल्या दोन्ही हातांनी अदबीने पण प्रेमळपणाने दाबला व मीही माझ्या दुसऱ्या हाताने तेच केले. आम्ही जुनेच ओळखीचे पुन्हा आज भेटलो आहोत अशा आनंदात आम्ही एकमेकांचा निरोप घेतला, कारण सहा वाजून गेले होते !

श्री. देवेंद्रनाथ अवस्थी अॅडव्होकेट हे दुहेरी हाडापेराचे, हृष्टपुष्ट शरीराचे, गोऱ्या वर्णाचे, तजेलदार डोळ्यांचे, ३०–३२ वर्षांचे तरुण होते. त्यांचे शिक्षण गुरुकुल कांगडी येथे झाले होते, ते आर्यसमाजी होते, लाहोरचे निर्वासित होते. माझ्या सिमल्याच्या वास्तव्यात मला लाभलेल्या त्यांच्या सुशील, सौहार्दशील व स्वच्छ मनाच्या व्यक्तित्वाची ओळख व सहवास यांची आठवण मला अजूनही सुखविते. ते मला पुष्कळदा त्यांच्या 'रेन-क्वो-म्हार्ट' नावाच्या कुटीमध्ये संध्याकाळी, फराळाला, जेवायला घेऊन जात. ही त्यांची कुटी सिमल्याच्या मॉल टेकडीच्या उत्तरेकडील उतारावर, हिमालयीन वृक्षराजीत होती व तेथून खालच्या अंगाला दरीमध्ये रेसकोर्सचे हिरवेगार विस्तीर्ण मैदान पहायला मिळायचे. त्यांच्या घरी पत्नी व एक सात आठ वर्षांची कन्या, एवढेच कुटुंब होते. त्यांच्या पत्नीही सुविद्य होत्या व त्यांच्यासारख्या मोकळ्या नि स्वच्छ वृत्तीच्या. सौ. अवस्थींनी मला निरनिराळे नवीन नवीन पदार्थ करून खायला घातले. माझ्या एका उपवासाच्या दिवशी त्यांनी लक्षात ठेवून मला खायला दिलेल्या 'पनीर–दहिवड्यांची' चव अजून माझ्या तोंडात आहे ! तोवर पनीर हे उपवासाला खातात हे मला माहीतच नव्हते ! कामाच्या दिवसांत कोर्टामध्ये अवस्थी माझ्या जवळच बसायचे ! दररोज संध्याकाळी आम्ही सिमल्याच्या चढउतारांच्या रस्त्यांवरून हिंडत असू. अवस्थींनी मला चढाव चढताना रस्त्यांवर कसे नागमोडी वाटेने सावकाश चढायचे व उतरताना सरळ, पण पाय दाबीत चालायचे ते शिकविले ! सिमल्याच्या रस्त्यांवरून केलेल्या अशा भ्रमंती आणि श्री. अवस्थींसारखी प्रसन्न सोबत यामुळे मला फार बरे वाटायचे. विशेषतः चांदण्याच्या दिवसात तर मन कसे मोहरून जायचे.

अवस्थी आपल्या वकिली व्यवसायात हुशार होते. ते न्यायमूर्ती अछरूरामजींचे निकट सहवासी असल्यासारखे परंतु गुरुशिष्य भावाने त्यांच्याविषयी बोलत. तशीच त्यांची ओळख त्यावेळचे सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश जस्टिस मेहरचंद महाजन यांच्याशीही होती असे मला दिसले. अवस्थींच्या घरी एके दिवशी संध्याकाळी माझ्या पंक्तीला त्यावेळचे तरुण श्री. दयाकिशन महाजन अॅडव्होकेट, पण आताचे जस्टिस डी. के. महाजन पंजाब हायकोर्ट हेही होय. अवस्थींच्यामुळेच सिमला येथे माझी त्यावेळचे जस्टिस हरनामसिंग यांची 'मुलाखत' झाली. त्यावेळचे जस्टिस महोदयांचे जावई श्री.स्वर्णसिंग अॅडव्होकेटही भेटले. हे नंतरचे भारतीय सुरक्षामंत्री स्वर्णसिंगजीच.

रविवार १ मे ला सकाळीच बॅनर्जी अॅडव्होकेट, आपटे व मदनलालचे वकील म्हणून सेसिल हॉटेलमध्ये येऊन हजर झाले. ते दोघे माझ्याच कूपरेज क्वार्टर्समध्ये शेजारी म्हणून राहिले, वेगवेगळ्या दोन खोल्यांच्या बिऱ्हाडात. दप्तरी अॅडव्होकेट जनरल, पेटीगारा चीफ प्रॉसिक्यूटर व त्यांची कार्यकारी मंडळीही आली होती नि सेसिल हॉटेलमधल्या मुख्य इमारतीत वरच्या मजल्यावर राहत होती.

सिमला येथे दोन 'कूली' माणसांनी सिमल्याच्या चढउतारी रस्त्यांवरून ओढीत नेण्याचे रिक्षा वाहन मी प्रथमच पाहिले. हे वाहन माणसांच्या व सामानासुमानाच्या वाहतुकीस सारखे वापरले जाई. माझ्याने सिमला येथील वास्तव्यात हे वाहन वापरणे कधीच शक्य झाले नाही. इतके आत्मग्लानीकारक दृश्य होते ते ! पुष्कळ रीतीने, बद्रीकेदारच्या, गंगोत्री जमनोत्रींच्या वाटेवर जर डोली हे प्रवाससाधन आहे तर हे सिमला येथे का नसावे अशा युक्तिवादाने माझी ग्लानी दूर करण्याचा प्रयत्न करूनही मी ते 'दोन मानवांच्या दमछाकी शक्तीवर जुताचे घुंगरू वाजवीत धावणारे दोन चाकांचे वाहन' वापरण्यास कधीच तयार झालो नाही–होऊ शकलो नाही. कामाच्या वेळी काय किंवा फुरसतीच्या वेळी काय स्वतःच्या पायानेच पायपीट करणे मला जास्ती सुखावह झाले !

माझे सिमला येथील बिऱ्हाड दोन खोल्यांचे, एक १२′ × १२′ ची चौरस जागा व दुसरी ८′ × ६′ ची विश्रांतीची जागा व ४′ × ६′ चे स्नान–शौचगृह अशी होती. कूपरेज क्वार्टर्सचा दर्शनी भाग पूर्वाभिमुख होता व माझ्या जागेतल्या पश्चिमेकडच्या खिडकीतून जवळजवळ आठ मैल दूर असलेले टेकडीवरचे तारादेवी मंदिर व त्या टेकडीच्या उतारावरचे एक दुग्ध-प्रकल्पाचे आवार यांचा देखावा दिसायचा. सकाळी सहा वाजता वक्तशीरपणे गरम चहाच्या टोपीवेष्टित किटलीचे तबक व एक मोसमी फळ घेऊन बेरा हजर होई. आम्ही सकाळच्या न्याहरीला मुख्य इमारतीतल्या मोठ्या जेवणघरामध्ये जात असू. हेच घर रात्रीच्या जेवणानंतर नृत्यगृह म्हणून वापरले जाई. आम्हाला आमचे दुपारचे जेवण हॉटेलमध्ये परत येऊन घेणे शक्य होत नसे. म्हणून सकाळची न्याहरीच पोटभर घेऊन, दुपारी कोर्टातच चहा व 'जलपान'–हिंदी अर्थाचे घेत असू. कोर्टातून परत येताच माझ्या खोलीमध्ये चहा मागवून घेत असे. रात्री ८ ते ९ च्या दरम्यान जेवण घेत असू. आमच्या अनुपस्थितीत बेरा बिऱ्हाडाची साफसफाई करायचा नि संध्याकाळी बिछाना स्वच्छ कपड्यांनी व मऊशार ब्लँकेटने, आतमध्ये गरम पाण्याची पिशवी ठेवून, तयार करून ठेवी.

रोज सकाळी पुष्कळ दिवस माझ्या पश्चिमेकडच्या खिडकीतून २० फूट खाली असणाऱ्या हिरव्यागार अंगणात एक सहा-सात वर्षांचा युरोपीय मुलगा, चांगल्यापैकी चापाची बंदूक, निशाण मारायचा लाकडी तक्ता, छऱ्यांची बाटली नि बंदुकीला आधार म्हणून लाकडी भुश्याची पिशवी घेऊन यायचा व जमिनीवर पालथे निजून एक डोळा मिटीत दुसऱ्या डोळ्याने नेम धरीत निशाण मारण्याचा अभ्यास सैनिकी शिस्तीने व आविर्भावाने करायचा. ते बघून माझे मन हरखून जायचे. रोज सकाळी त्याच्याकडे ५–१० मिनिटे बघत राहण्याचे माझे 'नित्य कर्म' म्हणून मी करी ! सिमल्याची हवा दुपारीही सुखकारक वाटू देणारी थंड होती व रात्री मऊशार गरम अंथरुणामध्ये गुरफटून निजण्याने साऱ्या दिवसाच्या श्रमाचा परिहार होऊन जायचा.

सिमल्याला येताच पहिल्या दिवसापासूनच माझा दैनिक कार्यक्रम 'हस्ब मामूल' नित्य नेमाने चालू झाला. माझी झोप रात्री दहा ते सकाळी तीन वाजेपर्यंतची तेथेही चालूच होती. माझ्या बिऱ्हाडाच्या खालीच हॉटेलची व्यवस्था बघणारी युरोपीय 'गृहिणी' राहत होती. तिने मला एके दिवशी हटकले नि म्हटले, 'काय भुत्यासारखा दिनक्रम हो तुमचा ! माझी निजायची वेळ होते नि तुम्ही त्यावेळी

उठून बसता! तुमच्या वरच्या मजल्यावरच्या पायपिटीने मला खालच्या बिऱ्हाडात झोप येत नाही! जसे काही माझ्या डोक्यावरच चालत राहता असे वाटते!' 'मला क्षमा करा हं बाई! मी उद्यापासून मऊ पावलांनी आवाज न करता तुमच्या डोक्यावर चालण्याची काळजी घेईन हं!' असे हसत म्हणून मी सुटका करून घेतली.

पूर्व पंजाबच्या सिमला येथील उच्च न्यायालयात अपीलाची सुनावणी शाहीइतमामाने पण घरगुती सौहार्दाने चाले. सुनावणीच्या सुरुवातीस चंदेरी राजदंड हातात उभा धरलेला एक भालदार व अपने पहियोंकी फाईल इत्यादी साहित्य लिये हुवे दोन चोपदार जरीच्या पट्टी-किनारीचे किरमिजी अंगरखे, हस्तिदंती मुठीची बरची खोवलेले, जरीचे कमरबंद व जरीच्या काठाची पगडी घातलेले अग्रभागी व त्यांच्या मागून काळा कोट, श्वेतबंद घातलेले व आपले काळे झगे सावरीत मुख्य न्यायमूर्ती व त्यांच्या पाठोपाठ सहकारी न्यायमूर्तीद्वय असे मिरवणुकीने न्यायालयात ठीक दहाच्या ठोक्याला प्रवेश करीत व आपापल्या आसनांवर, उपस्थित वकीलसमूह, पक्षकारसमूह व कर्मचारी समूह इत्यादिकांचे अभिवादन स्मितचेहऱ्याने स्वीकारीत पीठासीन होत. लालकिल्ल्यातील खास न्यायालयासारखी येथे 'बा-अदब बा-मुलाहिजा हुश्शार' थाटाची आरोळी नसे. प्रत्येक न्यायमूर्तींच्या समोर टेबलावर एक लठ्ठ भारती टिपणवही असे व त्यांच्या बाजूला प्रकरणाच्या छापील पुस्तकांची चळत असे. न्यायालयात स्थिरस्थावर होताच शिस्तीने पण हसतमुखाने कामकाजाचा आरंभ होई.

दोन मे १९४९ रोजी सकाळी न्यायालयात ठीक दहा वाजता वर सांगितलेल्या वातावरणातच महात्मा गांधी खून खटल्यातील अपीलांची सुनावणी सुरू झाली. कोर्टातल्या दोन्ही बाजूंच्या वकिलांची उपस्थिती, बंदी अपीलंट नथूरामची उपस्थिती 'मुलाहिजा' करण्याचे आन्हिक आटोपताच अपीलंट आपटे व मदनलाल यांच्यावतीने श्री. बॅनर्जी आपले तर्कनिवेदन आरंभ करण्यास उभे राहिले. त्यांनी आपल्या भाषणाचा आरंभ रीतसर खटल्याचे सामान्य स्वरूप सांगून, नंतर बचावपक्षाचे सामान्य स्वरूप व त्यांच्या पक्षकारांच्या बचावाचे विशेष स्वरूप-वर्णन सांगितले. ह्या नमनालाच दोन तास खर्च झाले. त्यानंतर श्री. बॅनर्जींनी प्रारंभिक कोर्टाने कोणकोणत्या आरोपांन्वये किती व कशा शिक्षा अपिलंट पक्षकारांना दिल्या याचे तपशीलवार विवरण करून हा निर्णय प्रारंभिक कोर्टाने कोणत्या आधारांवर दिला हे दाखवायला म्हणून प्रारंभिक कोर्टाचे न्यायाधीश श्री. आत्मचरणजींच्या निर्णयाचे पुस्तक हातात घेऊन, त्यांचा निर्णय वाचावयास सुरुवात केली. हे पाहताच माननीय मुख्य न्यायाधीश जस्टिस भंडारी आपल्या बाजूच्या दोन्ही न्यायमूर्तींकडे बघून नंतर श्री. बॅनर्जींना म्हणाले, 'हे पाहा, कृपा करून तो निर्णय बाजूला ठेवून द्या. आम्ही त्या निर्णयाकडे बघणारसुद्धा नाही आहो. आम्ही ह्या खटल्याची सगळी सुनावणी स्वतःच पुन्हा करणार आहोत!' यावर श्री. बॅनर्जी, 'माननीय महोदय, आपली जशी इच्छा!' असे म्हणत होते, तेव्हाच मी चटकन नथूरामकडे बघितले. तोही माझ्याकडेच बघत होता. आम्ही दोघांनी नेत्रपल्लवी भाषेत एकमेकांना 'बरी सुटका झाली, देव पावला!' असे म्हटले. आम्हा दोघांनाही श्री. आत्मचरणजींच्या निर्णयाचे सारखेच वावडे वाटले होते नि आम्ही दोघे काळजीतच होतो. त्यानंतर बॅनर्जींनी खटल्यातला एक एक पुरावा जरूर तेथे साद्यंत व जरूर तेथे संक्षिप्त असा वाचायला आरंभ केला. माझ्या लवकरच लक्षात आले की, पीठासनावरच्या तीन न्यायमूर्तींमध्ये न्यायमूर्ती अछरूराम हेच एकटे खटल्याच्या कागदपत्रांना बारकाईने वाचून–त्यांचे पद्धतशीरपणे टाचण करून बसलेले आहेत. श्री. बॅनर्जींनी एखाद्या साक्षीदाराच्या पुराव्यावर काही आक्षेपमूलक टीका करताच न्यायमूर्तिमजकूर तात्काळ त्याचे खंडण दुसरा पुरावा दाखवून करू लागले होते. बॅनर्जी महोदयांनी स्वतःला सावरले नि काही आक्षेपमूलक टीका न करता समजावणीच्या मिषाने विवरण सांगत पुरावा-वाचन-प्रवचन पुराणिकाच्या संथगतीने व शांत स्वराने चालू केले. बॅनर्जींच्या या पुरावा-प्रवचनातच सुनावणीच्या पहिल्या सप्ताहाचे सोमवार–मंगळवार व बुधवारच्या मे महिन्याच्या २, ३ व ४ तारखा उलटल्या.

मी स्वतः पहिल्या दिवसापासूनच या पुरावा-वाचनाने अगदी कंटाळून गेलो होतो. कानांवर पडणाऱ्या प्रवचनात एखादा नवीन मुद्दा सुचला तर तो टाचण करून घेत होतो, पण ते काम पुरेसे लक्ष गुंतविणारे नव्हते. इकडे बघ, तिकडे बघ, नव्या परिसराचे, नव्या चेहऱ्यांचे निरीक्षण करीत स्वतःची करमणूक करीत होतो. मंगळवारी तिसऱ्या प्रहरी एकाएकी दूरवर मेघगर्जनेचा गडगडाट झाल्याचे ऐकू आले. ऐन उन्हाळ्याच्या मोसमात हे काय, असा मी स्वतःशीच विचार करीत होतो, तोच पाठीमागून वादळी वारा, मृद्‌गंधाचा झोत नि वर्षावाची तडतड ऐकायला, अनुभवायला मिळाली. वारा पावसाला पूर्वेकडून पश्चिमेकडे लोटीत नेत होता. अशा रीतीने सुमारे वीस मिनिटे जोराचा पाऊस पडून कोर्टात अंधारल्यासारखे होऊन विजेचे दिवे लागले. थोड्या वेळात–कसे सांगू? पूर्वेच्या बाजूने आकाशाच्या घरात प्रकाशाची दारे उघडली नि रंगभूमीवरचे दृश्य उखळीच्या बारासहित झट्‌दिशी बदलावे तसे पूर्वेकडली पर्वताची हिमाच्छादित शिखरे व कपाऱ्या-दऱ्या तिसऱ्या प्रहराच्या सोनेरी उन्हाने तळपत, पांढऱ्या, निळ्या, सोनेरी रंगांचे नयनरम्य नर्तन आम्हाला दाखवू लागली!

कोर्टात चाललेल्या कामकाजाला विसरून पूर्वेकडल्या हिमाच्छादित पर्वतराजी रंगीत उन्हात रंगलेल्या बघत असताना माझ्यातला बालचित्रकार जागा झाला नि मी एक कोरा कागद घेऊन व तो एका छापील पुस्तकात लपवून मांडीवर टेबलाच्या आड ठेवला व त्यावर पेन्सिलीने पर्वतांची शिखरे, कपाऱ्यादऱ्यांच्या ओळी रेखाटायला सुरवात केली. भावी चित्राची बैठक म्हणून खालच्या बाजूस गच्चीवरचा कठडा काढून तेथून पर्वत शिखरांची दूरी दाखविणारे मोजमापाचे प्रमाणही साधले. हातांच्या हालचाली जणू काय चाललेल्या कामाची टिपणे लिहीत असल्यासारख्या पण मनातले विचार मला या कागदावर निसर्गातले हे दैवी रंगकाम कसे करता येईल यावर केंद्रित

## ते दृश्य पाहून माझ्यातला बालचित्रकार जागा झाला

झालेले. हे कितीवेळ चालले होते कोणजाणे. पण एकदाचा माझ्या भावी चित्राचा समाधानकारक आराखडा तयार झाला. तोवर बाहेरच्या रंगभूमीवरचे दृश्यही बदलले होते. मी कोर्ट कामाकडे लक्ष द्यायला मान वर करून आजूबाजूला बघितले, तो अवस्थी माझ्याकडे बघत होते. ते स्मितमुखाने म्हणाले, 'तुम्ही हेही करता अं!' मी क्षणभर लाजलो. पण बाहेर येताच त्यांना म्हटले, 'तुम्ही किती हो भाग्यवान! किती स्वर्गीय परिसरात तुम्हाला रहायला-काम करायला मिळते!'

हे भरकटणे आवरायचे अगोदर हेही सांगतो की, पुढल्याच सुटीचे दिवशी संध्याकाळच्या सहलीत बाजारात जाऊन मी एक चित्रकलेची वही, 'बी' 'बी' च्या पेन्सिली, रबर नि रंगकांड्या विकत घेतल्या व सिमल्यातल्या रोज पाहत असलेल्या निसर्गदृश्यांची दोन चार चित्रे तेथे मिळालेल्या अल्प फुरसतीत माझ्या अल्पकलेने रेखाटलेली होती.

बुधवारी ४ मेला मधल्या विश्रांतीच्या वेळी माझे व नथूरामचे चाललेल्या कामकाजाबद्दल बोलणे झाले. तोसुद्धा सुतावणीतल्या पुरावा वाचनाने 'बोअर' होऊन गेला होता. एवढेच नव्हे तर, हा पुरावा मीमांसेविना ऐकताना न्यायमूर्तीगण आपआपली मते बनवीत आहेत असे वाटून थोडा घाबरा झाला होता. त्याच्याकडे बघून एकाएकी माझ्या तोंडून प्रश्न निघाला, 'उद्या तुम्हीच का नाही आपले भाषण करीत?'

'हो! करीन की!' तो म्हणाला. पण, मी उद्या करू शकेन का? श्री. बॅनर्जी ज्या गतीने जात आहेत त्याप्रमाणे त्यांचे भाषण संपायला अजून एक आठवडा हवा!' मी पुन्हा विचारले, 'तुम्ही तयार आहात का?' हो! माझी तर आतासुद्धा तात्काळ उभे राहायची तयारी आहे. खरं म्हणजे अपीलांच्या क्रमाने माझाच अग्रक्रम आहे ना? त्याचे म्हणणे श्री. बॅनर्जीचे काही तरी बिघडले आहे. ते नेहमीसारखे बोलत नाहीत. 'तुम्ही उद्याकरता तयार रहा.' असे मी नथूरामला तेव्हाच सुचवून ठेवले.

संध्याकाळी हॉटेलमध्ये आल्यावर मी श्री. बॅनर्जीकडे जाऊन त्यांना भीतभीतच म्हटले, 'का? तुम्हाला काही होत आहे का?'

'अहो, माझे मलाच कळत नाही की, मला असे काय होत आहे. माझे कशातच लक्ष लागत नाही. तुम्ही उद्या आपले भाषण सुरू कराल का? करू शकाल का? बॅनर्जींनी मला विचारले. हो. मी करीन. नथूराम सुद्धाकरील! माझे बोलणे ऐकून श्री. बॅनर्जीना फार बरे वाटले. त्यांच्या संमतीने मी नथूराम राहत असलेल्या बंदीगृहाच्या बंदीपालांना दूरध्वनीवर बोलावून, थोडक्यात भूमिका सांगून नथूराम उद्या तयार राहील ना हे त्याला विचारून मला आताच सांगा. मी दूरध्वनीवर थांबलो आहे असे सांगितले. बंदीपालांनीही दोन एक मिनिटांतच परत येऊन 'नथूराम तयार आहे' असे कळविले. हे मी श्री. बॅनर्जीना सांगितले. ते ऐकून त्यांनी सुटकेचा श्वास सोडला नि माझे आभार मानले. श्री. बॅनर्जीचे शरीर खरोखरीच गरम होते.

दुसरे दिवशी सकाळी श्री. बॅनर्जी कोर्टात आले ते गळ्याला मफलर बांधून व मधून मधून खोकतच. त्यांनी कोर्टाला नम्रतेने आपली अपरिहार्यता सांगून क्षमा मागितली व न्यायमूर्तींनी ती लगेच मान्यही केली आणि आम्हा वकिलांकडे बघून काही विचारणार तोच नथूराम पिंजऱ्यात उभा राहून, श्रीमान महोदय! मी आरंभ करू शकतो का? मी तयार आहे. असे न्यायमूर्तींना म्हणाला आणि दिनांक ५ मे १९४९ ला गुरुवारी सकाळी १० वाजून १५ मिनिटे होत आहेत तो त्याने आपले अपीलामधले तर्कनिवेदनाचे भाषण पूर्व पंजाब उच्च न्यायालयासमोर सुरू केले होते! न्यायपीठावरचे तिघेही माननीय न्यायमूर्ती विस्मयाने नथूरामकडे बघतच राहिले!

नथूरामने आपले भाषण नेहमीप्रमाणे शांत व स्थिर आवाजात, चेहऱ्यावर काळजीचे नाव न दिसू देता आरंभ केले होते. त्याला इंग्रजी नीट, चांगले बोलता येत नाही याबद्दल त्याने न्यायमूर्तींची क्षमा मागून त्याला समजून घ्यावे असे विनविले! मी वकील नाही. हायकोर्टामधल्या रीतीभातीची मला माहिती व संवय नाही. पण मला थोडे तर्कशास्त्र येते नि मला या अभियोग घटनेतले सत्य काय तेही सर्व माहीत आहे. नथूरामचा स्वर निश्चयी झाला होता. तो पुढे म्हणाला, मला कोणत्याही प्रकारची दुविधा माझ्या कमतरतेमुळे वाटत नाही. कारण मी जे काही म्हणणार आहे ते मला चांगले स्पष्ट माहीत आहे. माझे मन स्वच्छ आहे. मला वकिलीविद्येची मुळीच आवश्यकता नाही. अशा शब्दांत त्याच्या पद्धतीने तो मी खरे बोलत आहे असे सांगत होता! त्याने अभियोगपक्षाचा पुरावा पद्धतशीरपणे घटनाक्रमांच्या अनुषंगाने हाताळायला सुरुवात केली. त्याने आपले व आपल्या कुटुंबियांचे संबंध, पुण्याहून प्रकाशित होणाऱ्या 'हिंदुराष्ट्र' या दैनिक वर्तमानपत्राशी असलेले संबंध, त्याचे व अपिलंट आपटेचे संबंध याबद्दल आरंभीच सांगितले. कोर्टाचा दिवस संपण्याचे अगोदरच नथूरामच्या तर्कनिवेदनाच्या भाषणाचा हवा तो स्वर लागला होता व तो निःशंक मनाने व खणखणीत स्वरात बोलायला लागला होता.

नथूराम हायकोर्टात कोर्टापुढे स्वतःच भाषण करीत आहे ही बातमी ५ मेला जेव्हा बाहेर पसरायला लागली तेव्हा त्याच दिवशी कोर्टाच्या श्रोतृवर्गात लोकांची, कोर्टातले वकील, बॅरिस्टर, पक्षकार मंडळी व कारकूनवर्ग यांची गर्दी झाली होती.

दुसरे दिवशी शुक्रवारी सकाळी ६ मे १९४९ ला आम्ही व्हाइस रीगल लॉजमधल्या हायकोर्टाजवळ पोचलो तो तेथे लोक झुंडीझुंडीने तिकडेच जात आहेत हे लक्षात आले. कोर्टाजवळ पोचलो तर, तेथे दाराशी मंडळींची रांग लागलेली. भद्र गृहस्थ आणि महिला. चांगले पोशाख घातलेली त्या रांगेत अधीर चेहऱ्याने उभी होती! आम्हाला कळले की, 'जागा भरलेल्या' असा फलक बाहेर टांगण्याची वेळ आली होती आणि शक्य तितक्या जास्त लोकांना कोर्टात जाऊन बसायला मिळावे म्हणून प्रेक्षक श्रोते मंडळींना विश्रांतिपूर्वीच्या वेळेचीच म्हणून बोलीवर प्रवेशपत्रे देण्यात येत होती. कारण कोर्टात एकावेळी प्रेक्षकांना अगदी कोनाकोपऱ्यात बसवूनसुद्धा ६०–७० मंडळींचीच बसण्याची सोय होती. आम्ही कोर्ट हॉलमध्ये गेलो तो साऱ्या खुर्च्या भरलेल्या. आम्हा वकिलांच्या उजव्या बाजूला सरकारी वकिलांच्या पलीकडे थोडयाशा जागेत आठ दहा खुर्च्या बडया मंडळींसाठी मांडलेल्या होत्या नि त्यावरही बडीबडी स्त्रीपुरुष मंडळी बसली होती. प्रेक्षकांत वृद्ध, तरुण, बायका, पुरुष, वकील, पक्षकार, अधिकारी, कारकून साऱ्या स्तरांची मंडळी दाटीदाटीने बसली होती. बडया मंडळींत मला वाटते त्याच दिवशी तेथील, त्यावेळचे रेव्हेन्यू कमिशनर श्री. एम. आर. भिडे, आय. सी. एस.

व बहुतेक रीजनल कमिशनर असलेले श्री. मेहता नावाचे अधिकारीही आले होते ! पीठासीन न्यायमूर्तींच्या 'घरची मंडळीही' बडया मंडळींत बसली होती !

नथूरामने सुरवातीस त्या दिवशी पुन्हा कालच्या भाषणाचे सूत्र सांगण्याच्या निमित्ताने, थोडक्यात पण शांत नि धिम्या स्वरात आपल्या तर्कनिवेदनाची व अपिलातील आक्षेपांची व्याप्ती व सीमाही पुन्हा सांगितली व एकेक आक्षेपाची चर्चा संगतवार, कोर्टाच्या छापील पुस्तकांमधून शिस्तीत संदर्भ सांगून व वाचून दाखवून करण्यास आरंभ केला. त्याचे लक्ष सर्वस्वी पीठासीन न्यायमूर्तींकडे अथवा आपल्या समोरच्या कागदपत्रांकडे बघण्यात लागलेले होते. कोर्टात इतर कोणी बसलेले ऐकत आहेत याची त्याला शुद्धच नव्हती जणू ! तेथे कोर्टाच्या दिवाणखान्यात दिल्लीसारखी ध्वनिग्राहक–ध्वनिविस्तारक यंत्रे नव्हती. पण दिवाणखान्याच्या बांधणीमुळे की संकीर्णपणामुळे, नथूरामचा बारीक पोरगेला आवाज – खरे म्हणजे शुद्ध स्वराचा आवाज सगळीकडे स्पष्टपणे निनादत होता नि प्रेक्षक श्रोत्यांचे कान नि डोळे नथूरामकडे लागलेले – खिळलेले, दिसत होते. नथूरामची संदर्भासहीत पुराव्याची मल्लिनाथी, माननीय न्यायमूर्ती अच्छरूरामजींना कशी स्वस्थ बसू देणार ? त्यांनीही नथूरामला प्रतिसंदर्भ सांगून त्याबद्दल त्याचे काय म्हणणे आहे हे तेथल्यातेथेच विचारायला सुरवात केली. हे सारे कोर्टासमोर चाललेल्या वादविवादाच्या पद्धतीनुसार आम्हांला काही नवीन नव्हते. पण प्रेक्षक श्रोत्यांना ते वक्त्याला अडवून वक्त्याची भंबेरी उडविण्यासारखे वाटले असावे बहुतेक. श्रोतृवर्गात नाराजीची कुजबुज चाललेली आम्हांला ऐकायला येऊ लागली. एके वेळी तर बडया मंडळींच्या पहिल्या रांगेत बसलेल्या एका भद्र महिलेने आपल्या शेजारणीस कुजबुजीनेच पण आमच्या बाजूपर्यंत ऐकायला आले इतक्या मोठ्या आवाजात म्हटले, त्याला बोलू का देत नाहीत ? पंजाबी भाषेत बोलत होती ती. 'उसिक्यूं न बोलत देन दां' असेच काही शब्द मी ऐकलेले आठवतात. आम्ही क्षणभर स्तिमितच झालो. पण बरे झाले. कारण लवकरच 'विश्रांती मध्यंतर' आल्याने पुढला प्रसंग टळला असे मला वाटले. विश्रांती मध्यंतरात मी नथूरामला पुन्हा, माननीय न्यायमूर्तींना अशा वेळी मी त्याबद्दल मान्यवर महोदयांना लवकरच त्या प्रसिसंदर्भाबद्दलही विस्ताराने सांगणार आहे. ते सांगणे टाळणार नाही असे सांगून आपला मुद्दा सोडू नये वगैरे सांगितले. पण त्याची दृष्टी वेगळीच – विचारीत ना ! मी देईन त्यांना तेथेच उत्तर. माझे तर्कनिवेदन त्यामुळे अडखळणार नाही. मला काय वादविवाद स्पर्धेचा फड स्वत:साठी जिंकायचा आहे ! अशी निरहंकारी निश्चयी वृत्तीची. विश्रांती मध्यंतरानंतर नथूरामच्या या वृत्तीचे प्रात्यक्षिक पहायची वेळच आली नाही. कारण कोण जाणे कशामुळे माननीय न्यायमूर्ती स्वत:च प्रतिसंदर्भ धुंडाळीत आपल्या टिपणवहीत काही लिहून घेताना मी पाहिले. कोर्टात निवेदकाला तेथल्यातेथे प्रश्न विचारणे बंदच झाले होते. अर्थात योग्य जागा पाहून नथूरामच्या भाषणाचा ओघ आपण अडवीत नाही हे बघूनच बहुतेक, पण प्रश्न विचारणे चालू राहिले व नथूराम त्याला उत्तरेही उत्साहाने नि स्पष्टपणे देत होता. आपल्या भाषणाच्या ओघवती प्रवाहाने कोण वाहून जात आहे, कुणाकुणाच्या वृत्ती हेलावत आहेत याकडे त्याचे लक्षच नव्हते. नदीचा प्रवाह संथगतीने, अखंडपणे, अचूक दिशेने वाहत होता !

श्री. डांगे आणि मी शनिवार रविवारच्या सुटीत जेलमध्ये जाऊन नथूरामला भेटलो. तेथे जाण्याचे आमचे प्रयोजन नथूरामला वकिली परामर्श देण्याचे. पण तेथे जाऊन प्रकरणाच्या प्रगतीबद्दल बोलताना आम्हाला नथूरामला एवढेच सांगणे पुरले की, त्याने आपल्या मनात कशाचा हीनगंड ठेऊ नये. त्याला आपल्या मनातले सारे काही स्वत:च्या भाषेत सांगू देण्याला कोणीही काहीही त्याच्या आड येणार नाही. तू स्वत: अशिक्षित म्हणून अवघडून जाऊ नकोस – कायद्यानियमांची काळजी करू नकोस. तुला जे वाटते आहे ते सारे बोलून टाक – एवढेच त्याला सांगणे पुरेसे होते. कारण आम्हाला खात्री होती की, नथूराम उच्च न्यायालयाच्या न्यायपीठासमोर काहीही अनुचित, अचरटपणाचे, अतिरेकाचे बोलणार नाही. त्याने आपल्या तर्कनिवेदनाच्या टिपणांची एक वहीच हाताने शिवून बनवली होती. त्यामध्ये, घटनाक्रमाने मुद्दे व प्रतिउत्तरे, ठिकठिकाणी शब्दप्रयोग, वाक्येही लिहून ठेवली होती ! एखाद्या अनुभवी वकिलाच्या मिसलेसारखी !

साप्ताहिक सुटीनंतर नथूरामचे भाषण सोमवार, मंगळवार, बुधवार पूर्ण दिवस चालले. नेहमीप्रमाणे स्त्रीपुरुषांचा ओघ येत होता, जात होता. काही काही चेहरे नित्यनेमाने पहायला मिळत होते. नथूरामचे भाषण दिनांक १२ मे १९४९ ला दुपारी विश्रांती मध्यंतरापूर्वी संपले. ह्या विषयींचा वृत्तान्त मी दिनांक १३ मे शुक्रवारी सेसिल हॉटेलच्या कोष्ठ नंबर ६९ मधून घरी पाठवलेल्या पत्रांतूनच उद्धृत करून येथे लिहितो. पत्र मराठीमध्ये लिहिलेले आहे.

६९, सेसिल हॉटेल, सिमला. १३–५–४९.

गेले सहा दिवस (कामाचे– शनिवार, रविवार सोडून) नथूरामचे आर्ग्युमेंट चालले होते ते काल दुपारी संपले. शेवटचा भाग फारच छान झाला. सहाही दिवस बायकापुरुषांची तोबा गर्दी होती नि शेवटच्या दिवशी कित्येक बायका व काही पुरुष मंडळीही डोळ्यांतून ढळढळा अश्रू ढाळत होते. असले ऐतिहासिक प्रसंग पाहण्याचे भाग्य मला मिळाले आहे हा विचार वारंवार येतो. नथूरामचे भाषण वर्तमानपत्रात काहीच आले नाही व जागोजागी बदलून आले आहे. तो भाग येथे लिहिण्यासारखा नाही, प्रत्यक्ष सांगायला हवा. एरवी हे पत्रच तुझ्या हाती पडणे कठीण होईल ! असो.

कालपासून बॅनर्जी यांचे भाषण सुरू झाले आहे... कोर्टातल्या पुष्कळ गोष्टी सांगण्यासारख्या आहेत, पण पत्रांतून लिहिण्यास वेळ नाही नि बरे नाही... सिमल्याची हवा, सेसिलचे राहणे व उत्तम सोबत रा. अवस्थी यांची–या सर्वांमुळे माझे आयुष्य मजेत जात आहे. वारंवार तुमची सर्वांची आठवण होऊन येथला कार्यक्रम एकदम नीरस होतो नि बरे वाटत नाही... येथे दोन दिवसांकरिता रा. रामभाऊ मंडलीक येऊन गेले. नथूरामचा भाऊही आज परत गेला आहे.

आपल्या पत्रात जास्ती काही लिहायचे नाही अशी काळजी मी माझ्या पूर्वीच्या अनुभवावरून घेत असे. तरीपण मी सिमला येथे माझ्या, लाल किल्ल्यात ओळख झालेल्या एका वर्तमानपत्राच्या बातमीदाराच्या ओळखीचा फायदा घेऊन दिनांक १२ मे १९४९ ला गुरुवारी सकाळी नथूरामने जे समारोपाचे भाषण केले– जे प्रत्यक्ष त्या मुखां-

तून शब्दन् शब्द बाहेर पडले त्याचा प्रतिलेख, टेलीप्रिंटर यंत्रामधला, मिळविण्यात यशस्वी झालो होतो. त्या बातमीदाराच्या सौजन्याचीच कृपा.

नथूरामने आपले भाषण संपविताना पीठासनावरच्या तिन्ही न्यायमूर्तींना यथोचित अनुक्रमाने अभिवादन केले. दोन्ही बाजूंच्या वकिलांना अभिवादन केले, एवढेच नव्हे तर, कोर्टातल्या प्रेक्षक श्रोतृवर्गाकडेही आपली मान वळवून त्यांना अभिवादन केले नि आपल्या आसनावर तो नतमस्तक बसला. श्रोतृवर्गातले पुरुष गालावरचे ओघळलेले अश्रू हाताने किंवा रुमालाने पुसत बूत चेहऱ्याने, नितळ समाधानाने एकमेकांकडे नि नथूरामकडे बघत होते नि महिला पदरांची किंवा दुपट्ट्यांची टोके तोंडात कोंबून नथूरामकडे बघत भिजलेल्या रूमालानीच वाहणारे ओघळ पुसत होत्या ! आम्हीसुद्धा जामे झाल्यासारखे कोर्टाच्या कामकाजाचे सूत्र पुन्हा आपल्या हाती घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या माननीय मुख्य न्यायमूर्तींचे बोलणे ऐकायला लागलो. ते म्हणत होते, 'आता कोण पक्षसमर्थन करणार? काय, मिस्टर बॅनर्जी'

विश्रांती मध्यंतर सुरू झाल्यावर नथूरामला विश्रांतीकक्षाकडे नेले जात असता वाटेत दोन्ही बाजूला लोकांनी गर्दी केली होती. पुष्कळांनी तर हात लांब करून नथूरामला स्पर्श करण्याचा प्रयत्नही केला. त्याच वेळी श्रोतृवर्गातल्या एक तरुण मुलीने पुढे होऊन नथूरामसाठी विणलेला स्वेटर देण्याबद्दलचा प्रसंग घडला होता. सिमला येथील अपीलपर्वाच्या पुढील सुनावणीच्या प्रत्येक दिवशी नथूराम तो स्वेटर अंगात घालून कोर्टात येत असे !

दि. १२ मे रोजी विश्रांती मध्यानंतर श्री. बॅनर्जींनी आपल्या अर्धवट राहिलेल्या तर्कनिवेदनाचे भाषण पुढे सुरू केले. आता तेही फॉर्मात आले होते. त्यांनी आपले भाषण एखाद्या कसलेल्या अनुभवी वकिलासारखे शिस्तीने चालू केले होते. खालच्या कोर्टात केलेल्या भाषणाची पुनरावृत्तीच होती ती. पण त्यामध्ये आपटेची बाजू त्याचे वकील म्हणून बॅनर्जींनी फारच कुशलतेने मांडली होती. आपटे, मदनलाल यांविरुद्ध शासनाने, पोलिसांनीही कशा आकसाने पुरावा कोर्टापुढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे हे फारच प्रत्ययकारी भाषेत बॅनर्जींनी न्यायपीठापुढे मांडले होते. बॅनर्जींच्या बुद्धिचातुर्याचे ते उत्कृष्ट उदाहरण म्हणून माझ्या लक्षात आहे. बॅनर्जींनी गुरुवारचा अर्धा दिवस, त्यानंतर शुक्रवार व शनिवारही– कारण कोर्टाचे काम लवकर आटोपण्याच्या हेतूने एकच दिवसाची साप्ताहिक सुट्टी पाळावी असे न्यायपीठाने ठरवले होते व सुट्टीनंतर सोमवार व मंगळवारी दिनांक १७ मे रोजी तिसऱ्या प्रहरी मध्येच आपले भाषण संपविले होते.

१७ मे चा उरलेला दिवस श्री. डांगे यांनी आपल्या तर्कनिवेदनास आरंभ करून घेतला व नंतरचे दि. १८ व १९ मे हे दिवसही त्यांनी भाषण केले. त्यांनी हायकोर्टाच्या न्यायपीठापुढे आपले भाषण त्यांच्या विनोदाची धार विशेष न पाजळता एखाद्या जबाबदार वकिलाच्या शिस्तीत अक्कलहुशारीने केले. कोर्टानेसुद्धा त्यांचे भाषण फार सहृदयतेने ऐकले असे मला त्यावेळी वाटले होते. दिनांक २० मे रोजी शुक्रवारी सकाळी तासाभरातच डांगे यांनी आपले भाषण आटोपले. त्यांचे भाषण संपताच माझा क्रम म्हणून मीही उभा राहिलो नि सकाळच्या ११ वाजता आपले तर्कनिवेदनाचे कागद हातात घेऊन भाषणाला आरंभ करीत न्यायपीठासमोर अभिवादन करीत म्हटले 'श्रीमान न्यायमूर्तीगण महोदय !' –मे इट प्लीज युवर लॉर्डशिप्स् !

[ क्रमशः ]


# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २१ | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### ३।७।७६ ते ९।७।७६

**मेष : प्रगतीत भर**

आठवडा एकूण प्रगतीचा आहे. तुम्ही कुरकूर करावी किंवा विनाकारण आळस घेत बसावे असे यात नाही. पांचवा मंगळ कार्यक्षमता वाढवणार आहे. उत्साह द्विगुणीत करणार आहे. कामाचे डोंगर आले तरी ते पार करण्याची ताकद हा मंगळ देईल. तिसरा रवी सहकार्याचे क्षेत्र वाढवील. मित्र व कुटुंबांतील इतर नातेवाईक मदत करू शकतील. शनी मानसिक समाधान देणे जरा कठीण आहे. पण तुम्ही रोज गुरुचरित्र किंवा गीता वाचा. त्यामुळे तुमचे मन स्थिर राहू शकेल. शुभ दिनांक ४–५–६

**महिलांना :** शेतीविषयक उद्योगाची जबाबदारी स्वीकारावी लागेल. पैसा मात्र हवा तसा खर्च करू शकाल.

**विद्यार्थ्यांना :** डोके शांत ठेवणे आवश्यक आहे. भावनेच्या आहारी जाऊ नका.

**वृषभ : मन शंकीत नको**

गुरु बारावा असल्यामुळे तुमची मनस्थिती आधीच वाऱ्यासारखी हेलकावत असते त्यांतच आता मंगळ व्ययस्थानी आला आहे. त्यामुळे यांत भरच पडणार आहे. मात्र प्रत्यक्षात तुमचे कोणतेच नुकसान होणार नाही. ज्यांच्याकडून सहकार्य अपेक्षित आहे. त्यांच्याकडून ते मिळेल. तुम्ही थोडे आता संशोधन करणे आवश्यक आहे. नोकरीत इतरांवर दोषारोप करून तुमची सुटका होणार नाही. मात्र नोकरीत दक्ष राहणे आवश्यक आहे. व्यवसायाची स्थिती सुधारण्यासाठी योग्य पाऊले उचलू शकाल. फक्त हा आठवडा त्यादृष्टीने अनुकूल आहे. आर्थिक बाजू सुधारेल. शुभ दिनांक ४–५–६

**महिलांना :** कलेच्या क्षेत्रात अधिकारपणा दाखवू नका. लहरीपणामुळे नुकसान होऊ शकेल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षा असेल तर काळजीपूर्वक उत्तर लिहा. इंटरव्ह्यू सफल होईल.

**मिथुन : समंजसपणा हवा**

हा आठवडा तुम्हाला स्वयंकेंद्रित बनवणार आहे. तुम्ही स्वतः इतरांचे श्रेय घेण्याचा जो प्रयत्न करता त्याचे प्रतिकूल परिणाम यावेळी डोके वर काढू शकतील. म्हणून मन स्थिर ठेवा व सहकाऱ्यांवर आपले पणाचा भार ठेवून साथ द्या. नोकरीत यावेळी एखादा मतभेदाचा प्रश्न निर्माण होऊ शकेल. वरिष्ठांची मर्जी राहील. गोड बोलून तुम्हाला बरीच धावपळ करायला लावतील. वाङमय, साहित्य, कला यात प्रगतीचे नवे पाऊल पडेल. मोठ्या कलावंताचे सहकार्य मिळेल. प्रसिद्धी व प्रतिष्ठाही लाभेल. शुभ दिनांक ३–५

**महिलांना :** नोकरीत बरीच अनुकूलता राहील. आर्थिक बाजू घर सावरील. काटकसरीने खर्च करा.

**विद्यार्थ्यांना :** गणिताच्या अभ्यासाकडे जास्त लक्ष द्या. सहकार्य मिळेल.

**कर्क : आर्थिक बळ वाढेल**

बारावा रवी, दुसरा मंगळ व पहिला शनी, दहावा गुरू अशी ग्रहरचना आहे. ही संमिश्र फल देईल. हाती पैसा येईल. पैसा मिळविण्याचे नवे नवे मार्ग उपलब्ध होतील. परंतु हा पैसा कसा खर्च झाला हे समजणे कठीण होऊन बसेल. व्यापारी व्यवसाय करणारे लोक नवीन योजना आखू शकतील. नवे कायदे करू शकतील. कापूस, खते किफायतशीर होतील. बागायतदारांनी काळजी करू नये. कोणत्याही क्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांनी या आठवड्यात नियम मोडू नये. नोकरीत अगदी वेळच्या वेळी हजर राहावे. वकिलवर्गाने गुंतागुंतीची केस 'आव्हान' म्हणून स्वीकारावी. ज्यांची नोकरी कायम नसेल त्यांची ती कायम होईल. बेकारांना स्वतंत्र उद्योगाची प्रेरणा मिळेल. बँकेत काम करणाऱ्या नोकरदारांनी जास्त दक्ष रहावे. शुभ दिनांक ३–५

**महिलांना :** पैशाचे कोणतेही काम अडून राहाणार नाही. नोकरीत महत्त्वाची संधी मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** एखादा नवा कोर्स घ्यावा. मेडिकलचा कोर्स फलदायी होईल.

**सिंह : माघार थांबेल**

राशीस्वामी रवी अकरावा, तर मंगळ राशीत आला आहे. ही मोठी जमेची बाजू आहे. शनी–मंगळ युतीचा अप्रत्यक्ष परिणाम तुम्हाला जाणवत असला पाहिजे हे उघड आहे. गेले काही दिवस थोडे परागतीचे–माघारीचे राजकारण आपणास करावे लागत आहे. आपण हे 'एक दुःख' सहन केलेत यात शंकाच नाही, पण या आठवड्यापासून यात बदल होईल. आपली गरज इतरांना भासेल. विरोधकांचे डावपेच त्यांच्यावरच उलटतील. ज्यांनी गुप्त शत्रुत्व केले त्यांना पश्चाताप होईल. मोठेपणा चालत येईल. नोकरी व्यवसायाची स्थिती अडचणीतून बाहेर पडेल. पैशाची अडचण मागच्यासारखी भासणार नाही. शुभ दिनांक ४–६

**महिलांस :** अपमानाचे कढ विसरा. आता चांगले दिवस येत आहेत. त्यांची चाहूल यावेळेपासून लागेल.

**विद्यार्थ्यांना :** अडचणी संपल्या आहेत. इच्छित हेतू सफलतेच्या दृष्टीने पावले पडतील.

**कन्या : उत्पन्नात भर**

रवी दहावा, शनी अकरावा तर मंगळ बारावा असे या आठवड्यातील ग्रहमान आहे. बाराव्या मंगळामुळे तसे एकदम प्रतिकूल काही घडणार नाही, पण प्रामुख्याने तब्येतीत हळूहळू अशक्तपणा वाढणे, जेवणावरची इच्छा उठणे असे काहीतरी घडू शकेल. नोकरीच्या बाबतीत काळजीपूर्वक काम करा. हातून चुका होऊ देऊ नका. काम फार वाढणार आहे. धांदल गडबड राहाणार आहे. कार्यक्षमता राहील. वरिष्ठांबरोबरचे संबंध उत्तम राहातील. दुय्यम व्यवसायात प्राप्ती होईल. नोकरीतदेखील उत्पन्नात भर पडेल. पण खर्च मात्र जास्त राहील. शुभ दिनांक ३–६

**महिलांना :** घरगुती कामात शक्ती अधिक खर्च होईल. उरकाही चांगला राहील, परंतु तब्येतीत किरकोळ त्रास राहील.

**विद्यार्थ्यांना :** गुण दाखवण्यासाठी भरपूर नवी क्षेत्रे उपलब्ध होतील. संधीचा फायदा घ्या.

## तूळ : आशादायक सप्ताह

या आठवड्यातील ग्रहमान एकूण सर्वच बाबतीत अनुकूल आहे. दशमस्थानी झालेली शनि–मंगळ युती तुम्हाला प्रतिकूल गेली नाही. आता मंगळ अकरावा झालेला आहे. त्याचा अनेक बाबतीत फायदा होईल. रसायने, केमिकल्स या धंद्याशी संबंधित व्यक्तींना भरपूर पैसा मिळेल. रेसमध्ये अवश्य भाग घ्यावा. जमिनीच्या खरेदीची योजना असेल किंवा तुम्हाला स्वतःचे घर बांधावयाचे असेल, तर त्याला हा काळ उत्तम आहे. नोकरीत महत्त्वाकांक्षा चेतावतील व त्याला क्षेत्रही अनुकूल राहील. शुभ दिनांक ४–५–७.

**महिलांना :** घरगुती स्वरूपात कापड व्यापार कराल. नव्या उद्योगाची सुरुवात करावी.

**विद्यार्थ्यांना :** मेडिकल व इंजिनियरींग या शाखेकडे विद्यार्थ्यांना अधिक अनुकूलता आहे.

## वृश्चिक : नोकरीत बढती

राशीस्वामी मंगळ दशमस्थानी प्रविष्ट झाला आहे ही एकच गोष्ट तुमच्या यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली ठरेल. उद्योग व धंदा या दोन्ही क्षेत्रांत झपाट्याने प्रगतीच्या वाटा ओळखू शकाल. अनेक प्रकारचे कार्य दृष्टिपथांत येईल. बढतीचा किंवा प्रमोशनचा प्रयत्न करण्याची जरुरीच नाही. वरिष्ठांच्या मनात तुमचे नाव पक्के झालेले असेल व त्याचा फायदा तुम्हाला मिळू शकेल. बेकारांना आता चिंता करण्याचे कारण नाही. शेती, खते, स्टेशनरी, कापूस इत्यादी उद्योगाला अनुकूल वातावरण आहे. शुभ दिनांक ४–८.

**महिलांना :** मन स्वच्छ व मोकळे ठेवून एखादा उद्योग सुरू करा. त्यात यश येईल. चालू नोकरीत पदोन्नती.

**विद्यार्थ्यांना :** आवडता अभ्यासक्रम सहज निवडू शकाल. प्रगतीकारक वेळ आहे.


सद्यःस्थितीत सर्वांनी वाचलेच पाहिजे असे साप्ताहिक

**साधना**

**संस्थापक : साने गुरुजी**

**वार्षिक वर्गणी : रु. २५**

स्थानिक वृत्तपत्र विक्रेत्यांना वितरणार्थ मागवण्यास सांगा.

**साधना साप्ताहिक**

४३१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०


## धनू : काळजी संपली

गुरू पाचवा आहे ही एकच बाब तुमच्या बाबतीत फायद्याची समजावी लागेल. कारण तो अवेळी संकटे निभावून नेत आहे. आता मंगळ शनीच्या मगरमिठीतून सुटला असून तो तुमच्या भाग्याची रूपरेषा ठरवू पहात आहे त्याचा लाभ उठवा. तब्येतीला तशी फार मोठी काळजी नसली तरी शनि–मंगळ युती आठवी होती. त्याने तुम्हाला थोडीफार विश्रांती दिली असेलच. मन निराश व भीतीग्रस्त झालेच होते. तो काळ आता संपला आहे. आता अनेक फायदे प्रत्यक्ष तुमच्या पदरात पडणार आहेत. उत्पन्नात भर पडेल. नोकरीत प्रभाव वाढेल व तुमची गरज निर्माण होईल. शुभ दिनांक ५–६.

**महिलांना :** तब्येत सुधारून आशा–आकांक्षा सफल होतील. बचतीत वाढ होईल.

**विद्यार्थ्यांना :** महत्त्वाकांक्षा पुऱ्या होतील. उत्साह वाढेल.

## मकर : नम्रता ठेवा

मंगळ मकर राशीला तेवढा वाईट फले देत नाही. तो तुमचा मित्र आहे. तरी पण तो रवीच्या सिंह राशीत आठवा झाला आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सार्वजनिक कामांत व तुम्ही जर मोठे अधिकारपदस्थ असाल, तर स्वभाव संयमी ठेवणे आवश्यक आहे. हाताखालच्या माणसांना दुखवू नका. नवे नवे शत्रू वा विरोधक निर्माण करू नका. सामान्यतः जमवून घेण्याकडे कल राहू द्या. अशक्त व्यक्तींनी तब्येतीची काळजी घ्यावी. निराशा व थोडाफार अस्वस्थपणा जाणवणार आहे. घरगुती उत्पन्नात भर पडेल. शुभ दिनांक ४–८.

**महिलांना :** महत्त्वाकांक्षेच्या आहारी जात असताना तब्येतीकडे दुर्लक्ष होऊ देऊ नका.

**विद्यार्थ्यांना :** अनेक प्रकारे अनुकूलता आहे. तरीपण वाहन हाकताना काळजी घ्या.

## कुंभ : अचानक बढती

सध्या तुमच्या उत्कर्षाच्या सर्व किल्ल्या रवीच्या हाती आहेत. तो पाचवा झाला आहे. गेले काही दिवस तुमचे मन मधून मधून निराशेच्याभोवती घोटाळत आहे पण ती निराशा आता धूसर होत जाणार असून सार्वजनिक व राजकीय क्षितीजावर एकदम तुम्ही गाजणार आहात. नोकरीत अकल्पित व अनपेक्षित बढती मिळून तुम्ही स्वतःच आश्चर्यचकित व्हाल. तूर्त बेकारांना काम–उद्योग मिळेल. पैसा, प्रतिष्ठा व गुणवत्ता यादृष्टीने सप्ताह अनुकूल आहे. शुभ दिनांक ४–५–६.

**महिलांना :** नोकरीत एकदम बढती मिळेल. उत्पन्नात भर पडेल.

**विद्यार्थ्यांना :** शेतीच्या अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करा.

## मीन : सर्वसामान्य शुभदायक

ग्रहदशा अनुकूल निर्माण करीत आहे. कोठेही मोठे धाडस न करता चालू आहे त्याच्यात जर हळू हळू सुधारणा केलीत, तर हरकत नाही. लेखन व साहित्यात प्रतिष्ठा मिळेल. चालू लेखनाला वेग येईल. कादंबरी लेखनाला वेग येईल. मनात नव्या नव्या कल्पना उचंबळून येतील. पैसा व मानमान्यता मिळेल. नोकरी करणारे तसे भाग्यवान ठरतील. अचानक लाभ पदरी पडतील. जुने पैसे मिळतील. मागील सालापासून पगारवाढ मिळेल. वरिष्ठांना धरून राहावे. त्यांची मर्जी उपकारक ठरेल. मन उत्साही राहील. शुभ दिनांक ५–६.

**महिलांना :** शिक्षिका व प्रोफेसर यांना हा आठवडा फारच अनुकूल आहे. पगारवाढ मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** परीक्षेत चमकाल. कौतुक होईल.

□




# प्रयत्न करा

‘सामान्य गोष्टीहि असामान्यपणे चांगल्या करण्याच्या!
या मार्गानं सगळ्यांनाच राष्ट्र-उभारणीच्या कामांत
सहभागी होतां येईल.’

—इंदिरा गांधी

## राष्ट्र उभारणीच्या
कामाला लागूं या!

शहरी श्रोत्यांना न रुचणारा

# गावरान मेवा...

ऑर्केस्ट्रा किंवा तत्सम स्वरूपाच्या कार्यक्रमांमध्ये निदान शहरी श्रोत्यांना तरी फारसे नावीन्य राहिलेले नाही. ऑर्केस्ट्राच्या खऱ्या भरभराटीचा काळ आता संपला आहे असं म्हणायलाही हरकत नाही. दोन वर्षांपूर्वी परिस्थिती वेगळी होती. अशा कार्यक्रमांना त्यातल्या विविधतेमुळे लोकप्रियता लाभली होती आणि महेशकुमारच्या जोडीला मेलडी मेकर्स, म्युझिकल मेलडी, चंद्रशेखर दरबार वगैरे वाद्यवृंद जोरात चालत होते, आता यातल्या शेवटच्या दोघांची तर नावनिशाणीही शिल्लक राहिलेली नाही. या कार्यक्रमांची सद्दी का संपावी, तीही इतक्या झटपट. याचं कारण त्यांच्या विविधतेमध्ये शिरलेल्या monotony मध्ये, तोच तोचपणामध्ये होतं. बहुतेक सर्व वाद्यवृंदातले 'आयटेम्स' अगदी सारखे–समांतर असायचे. म्हणजे प्रत्येकी एक कॉमेडीकिंग, एक नृत्याप्सरा वगैरे. गाण्यांची निवडसुद्धा रसिकतेला धरून न होता लोकप्रियतेप्रमाणे व्हायची. साहजिकच अनेक गाणी सर्वच वाद्यवृंदात ऐकायला मिळत असत.

अशा सर्वसमावेशक 'जनरल ऑर्केस्ट्रा'चे दिवस भरल्यानंतर आता विशिष्ट प्रकारच्या – special purpose orchestra – वाद्यवृंदाकडे लोक वळले आहेत. विशिष्ट हेतू, कसोटी आणि प्रेक्षकवर्ग समोर ठेवूनच यातल्या गीतांची, कार्यक्रमांची निवड केली जाते. उदाहरण : सूरजहाँ या नव्यानं रंगमंचावर आलेल्या वाद्यवृंदाचं आहे. यामध्ये फक्त शास्त्रीय संगीताची बैठक असलेलीच चित्रपटांतली गीतं सादर केली गेली. गीतांची निवड अधिक चोखंदळ व अभिरुचीपूर्ण होऊ लागल्याचं हे एक उदाहरण. दुसरं मराठी वाद्यवृंदात सापडेल 'आपली आवड' या सर्वसामान्य कार्यक्रमानंतर त्याच संस्थेने 'मंतरलेल्या चैत्रबनात' हा कार्यक्रम सादर केला. यात केवळ ग. दि. माडगूळकरांचीच बहुतेक जुनी गीतं सादर केली गेली. याला समांतर म्हणूनच की काय, मराठीतले दुसरे नामवंत चित्रशाहीर जगदीश खेबूडकर यांनी 'गावरान मेवा' या कार्यक्रमात स्वतःची काही गीतं सादर केली. शहरी प्रेक्षकापेक्षा ग्रामीण प्रेक्षकाच्या रुचीला अधिक मानवणारा हा गावरान मेवा शहरातही प्रत्येक प्रयोगाला गर्दी खेचतोय हे विशेष.

या गावरान मेव्याचं नक्की स्वरूप काय आहे? सांगता येणं कठीण आहे. त्याचे लेखक, कवी, निर्माते, दिग्दर्शक – थोडक्यात, 'सबकुछ' – जगदीश खेबूडकर यांनीही ही गोष्ट मान्य केली, आणि 'आम्हालाही ते अजून नक्की कळलं नाही,' असा सूर काढला. वगनाटयाच्या पारंपरिक पद्धतीनं गण–मुजरा–गवळणीच्या क्रमानं, 'वंदन गणनायका' पासून कार्यक्रम सुरू होतो. हे विधी उरकल्यानंतर शाहीर आणि सोंगाड्ये हजर होतात. एकजण तर प्रेक्षकातूनच आरडाओरडा करीत येतो. ही आधुनिकांची नक्कल की थट्टा हे समजायला मार्ग नाही. मात्र गावरान मेव्याच्या काही अस्सल रसिकांना ती एक अद्‌भुत घटना वाटली यातच बरंच काही आलं.

शांतारामबापूंच्या 'पिंजरा' चित्रपटातल्या 'दे रे कान्हा चोळी लुगडी' या गाजलेल्या गवळणीपासून कार्यक्रमाची खरी सुरुवात झाली. हे नृत्यगीत सादर केलं हेमसुवर्णा व तिच्या सहकाऱ्यांनी. एकूणच कार्यक्रमातली बहुसंख्य नृत्यगीतं हेमसुवर्णानंच सादर केली–आणि रंगविलीसुद्धा. 'मला हो म्हणतात लवंगी मिरची' आणि 'जागे व्हा मुनिराज, वनी या' या दोन गीतांचा ह्यादृष्टीनं खास उल्लेख केला पाहिजे. तिच्या नृत्यावर–अदाकारीवर कार्यक्रमाचा बराच मोठा भार होता आणि तिनं नृत्यातून तो समर्थपणे पेललाही. तथापि अभिनयाच्या प्रांतात ती बरीच कमी पडली. किंचित कर्कश आवाज आणि loud intonation हा त्यातला एक मोठा दोष. नृत्य हे अत्यावश्यक अंग मानलं गेल्यानं कार्यक्रमातल्या गाण्याच्या निवडीला बरीच मर्यादा पडली आहे. त्यातही 'टाळ बोले चिपळीला' आणि 'एकतारीसंगे एकरूप झालो' ही दोन भक्तिगीतं, 'रुणझुणत्या पाखरा' सारखं स्त्री गीत, 'ही दुनिया हाय एक जत्रा' किंवा 'बाजीराव-नानासारखी धमाल उडविणारी गाणी, 'जागे व्हा मुनिराज' सारखं थोडंसं पौराणिक 'टच्' असलेलं गाणं, अशी थोडी विविधता ठेवायचा प्रयत्न दिसला. 'पिंजरा' मधील 'आली ठुमकत नार लचकत' या उंच पट्टीत जाणाऱ्या गाण्याचाही आवर्जून उल्लेख करायला पाहिजे. अर्थात गीतांचं 'प्रेझेंटेशन' निर्दोष होतं असा याचा अर्थ नाही. एक तर वाद्यवृंदातील पार्श्वगायनाचा दर्जा समाधानकारक नव्हता. वाद्यवृंदातील गाणी मूळ आवाजात म्हणण्याचा कटाक्ष इतरत्र ठेवला जातो, तो येथे नव्हता. बहुसंख्य गाणी मूळ पार्श्वगायकाच्या आवाजाऐवजी स्वतंत्र–स्वतःच्या आवाजात आणि शैलीत म्हटली गेली. दुसरं असं की, नृत्यगीतांमध्ये–सांघिक असली तरी–हेमसुवर्णाव्यतिरिक्त इतर सहकाऱ्यांच्या नृत्याकडे पुरेसं लक्ष दिलेलं दिसत नव्हतं, त्यामुळे त्यांच्या हालचाली बऱ्याच स्वैर आणि मनमोकळ्या चालू होत्या. शिवाय जगदीश खेबूडकरांनी लिहिलेला बराच मोठा गद्य भाग फारसा दर्जेदार व समाधानकारक नाही. शाहीर, टकूचेअण्णा व सहकारी सोंगाड्ये यांनी तो उचलून धरला एवढेच. तथापि बऱ्याचशा पात्रांनी बोलताना, बालगंधर्वातले ध्वनिक्षेपक एअरकंडिशनसारखे बंद नसतात ती गोष्ट लक्षात घ्यायला हवी. स्वतः जगदीश खेबूडकर यांनी सादर केलेला एक 'सरप्राइज अॅटम' (आयटेम याचा खास गावरान उच्चार) ठीक होता. अर्थात त्यात लांबण बरीच होती, विविधता मात्र काहीच नव्हती. चित्रपटातील गाणी चालीबरहुकूम रचली जातात हे माहीत असणाऱ्या प्रेक्षकांना त्यात काही सरप्राइजही नव्हतं.

साडेतीन तासांपेक्षा जास्त चाललेल्या या कार्यक्रमात अजून बरीच सफाई आणि सुटसुटीतपणा येणं आवश्यक आहे. आणखी चिकित्सक दृष्टीनं पाहिलं तर अधिक दोष काढणंही अशक्य नाही. पण ग्रामीण प्रेक्षकांची सरसरून दाद घेईल असा मालमसालाही त्यात कमी नाही. ढोलकीवाल्या महादेव पवारला मात्र सगळ्यांचीच टाळी पडावी, असंच त्याचं वाजवणं गाजवणारं आहे. □

हिंदी चित्रपट

# भँवर

## आशेच्या भोवऱ्यात फसणारे प्रेक्षक

ही कथा सिमल्यात घडते.

तशा बऱ्याचशा हिंदी सिनेमांच्या कथा कुठे ना कुठे वळणंवांकणं घेऊन सिमल्यात येतातच. इथल्या हिमवृष्टीचं आणि बर्फाच्या थडगार डोंगरांचं चित्रण केल्याविना दिग्दर्शकाचा आत्मा थंड आणि निर्मात्याचा खिसा गरम होत नाही. त्यामुळे सर्वसाधारण धंदेवाईक हिंदी सिनेमाचा कथाप्रवाह, असलाच तर, अगदी हट्टानंच वळवून हिमनदीत आणून सोडावा लागतो. त्यातही दिग्दर्शक, कथा, कलाकार हे सगळे बदलले तरी सिमल्यातला 'प्रोग्रॅम' हा नेहमीचा ठरलेलाच असतो. म्हणजे बर्फाच्या बुटबुटक्या चढ–उतारावरून नायक–नायिकांची पळापळ, अर्थातच एखादं गाणं; जे संपतासंपता हुकमी हिमवृष्टी सुरू व्हावी, आणि जरूर तर एखादी माफक बर्फाळ मारामारी. छायालेखक हौशी निघाला तर बर्फावरच्या सूर्यास्ताचं एक वेधक पण कोनहीन दृश्य. ही चाकोरी सोडून काहीतरी नवीन करायची शक्कल कुणाच्या डोक्यात आली, तर सगळीच कथा सिमल्याच्या पार्श्वभूमीत आणून 'सेट्' केली जाते आणि आणखी एका चाकोरीतून प्रवास सुरू होतो. 'भँवर' हा निर्माता राम बी. सी., दिग्दर्शक भप्पी सोनी आणि एव्हरशाइन पिक्चर्सचा नवा चित्रपट या दुसऱ्या जमातीतला आहे. भप्पी सोनी हे करमणूकप्रधान चित्रपरंपरेतील एक मशहूर नाव. 'भँवर' मध्ये मात्र ते कोणतीही वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करू शकलेले नाहीत. विस्कळीत आणि सर्वपरिचित कथानकाची सर्वसामान्य धंदेवाईक जुळणी–मांडणी करण्यातच त्यांचे श्रम खर्ची पडलेले दिसतात.

मूळची निसर्गरम्य पार्श्वभूमी निवडणाऱ्या चित्रपटांवर निर्दोष आणि नेत्रसुखद छायाचित्रणाची जबाबदारी येऊन पडते. 'भँवर' मध्ये ही तांत्रिक कामगिरीही फारशी समाधानकारक नाही. विशेषतः छायाप्रकाशाचा समतोल न साधल्याने काही दृश्ये प्रभावहीन वाटतात. आर. डी. बर्मनच्या साचेबंद कामचलाऊ संगीताविषयीही आणि पुरेशा सुस्पष्ट नसलेल्या ध्वनिमुद्रणासंबंधीही हेच म्हणावं लागेल.

रूपा (परवीन बाबी) या दुर्दैवी तरुणीवर कोसळलेल्या संकटपरंपरेची कथा 'भँवर' मध्ये मांडलेली आहे. ख्रिश्चन होस्टेलमध्ये राहणाऱ्या रूपानं, आपल्याला कुणाचंही पत्र येत नसल्याच्या दुःखापोटी स्वतःच डाव्या हातानं उजव्या हाताला प्रेमपत्र लिहिण्याचा प्रसंग हा चित्रातला एक बऱ्यापैकी हृदयस्पर्शी आणि 'ओरिजिनल' आहे. रूपाची मैत्रीण रत्ना (अरुणा इराणी)ला पाहण्यासाठी आलेल्या अनूप (रणधीर कपूर)चं रूपावरच इन्स्टन्ट प्रेम बसणं, रत्नाचा मत्सर आणि रूपाच्या व्यसनी–चंगीभंगी बापामुळं अनूप–रूपाच्या लग्नात विघ्न येणं, एका अपघातात रूपाचे पाय पांगळे झाल्यामुळे अनूपच्या मनात स्वतःविषयी गैरसमज निर्माण करून तिने त्याला दूर करणं, रत्नाच्या डॉक्टर वडिलांनी (अशोककुमार) ऑपरेशन करून रूपाला वाचवणं, कृतज्ञतेपोटी रूपानं अनूप–रत्नाच्या लग्नाला मान्यता देणं आणि शेवटी गुदामातील ती चिरपरिचित मारठोक पुरेशी झाल्यानंतर, रूपा ही डॉक्टरसाहेबांचीच मुलगी असल्याचं सिद्ध होऊन अनूप–रूपा मीलन इतक्या वेड्यावाकड्या गिरक्या घेऊन हा भँवर उर्फ भोवरा थांबतो तेव्हा आशेच्या भोवऱ्यावर फिरणारे प्रेक्षक निराशेच्या भोवऱ्यात बुडायला लागलेले असतात. हिंदी सिनेमातल्या प्रेमवीरांना एकमेकांच्या त्यागाचा झटका येतो तेव्हा खरी परिस्थिती परस्परविश्वासानं सांगण्याऐवजी एकमेकांच्या मनात गैरसमज निर्माण करायचा उद्योग का सुचतो आणि प्रेमासाठी घरादारावर लाथ वगैरे मारून बाहेर पडलेल्या नायकमहाशयांना, त्यांच्या इतर सर्व एक्स्ट्रॉ करिक्युलर अ‍ॅक्टिव्हिटीज् चालू ठेवता येतील इतकी सोयीची नोकरी तत्काळ कशी मिळते. (रणधीर कपूर चक्क गोल्डस्पॉटच्या फॅक्टरीत : भँवर) ही दोन कोडी मला न उलगडलेली आहेत.

या घसरत्या कथेवरच्या चित्राला कलाकारांनीच थोडंफार सावरलंय. विशेषतः परवीन बाबीनं मन लावून केलेल्या कामाचा विशेष उल्लेख करायलाच हवा. दुसरी उल्लेखनीय कामगिरी असरानीची आहे. या गुणी कॉमेडियननं नायकाचा भार उचलल्यामुळं आपला तथाकथित नायक रणधीर कपूर सुखानं कॉमेडी करायला मोकळा झाला आहे. त्यानं यात नेहमीपेक्षा थोडी जास्तच बापाची नक्कल केली आहे. अशोककुमारला साक्षात देवदूताच्या भूमिकेत वाया दवडला आहे. नादिरा–कामिनी कौशल–अरुणा इराणी नेहमीप्रमाणेच.

बाकी सर्व ठीक.

–शिरीष सहस्रबुद्धे


या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख.

आनंदाच्या दाही दिशा

रवींद्र पिंगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

किंमत : दहा रुपये

# नंदू राजेलिखित ( दादा कोंडके ) लेखमाला लेखांक १ ते ४ संबंधी वसंत सबनीस यांचा खुलासा

माणूस साप्ताहिकात ३ एप्रिलपासून एक लेखमाला प्रसिद्ध झाली आहे. ती श्री. दादा कोंडके यांच्यासंबंधी असली तरी, बऱ्याच वेळा ती चार्ली चॅपलिन व बस्टर कीटन यांच्यावरील असावी असाही भास झाला. मी ती वाचली. नाइलाज म्हणून ! लेखन-दृष्टया अत्यंत मामुली, उथळ, कंटाळवाणी आणि मुद्दाम 'पोज' घेऊन लिहिलेली अशी ती वाटली. या लेखमालेला उत्तर देऊ नये असाच प्रथम-विचार होता, परंतु लेखमालेला जरी उत्तर दिले नाही, तरी लेखमालेत अनेक ठिकाणी केलेली खोटी व अर्धसत्य विधाने, दिशाभूल करणारी व चुकीची माहिती, वस्तु-स्थितीचा विपर्यास यासंबंधी काहीतरी स्पष्ट-पणे लिहिणे आवश्यक वाटले.

कोणा एका श्री. नंदू राजे नावाच्या लेखकाने ही मुलाखतवजा लेखमाला लिहिली आहे. हे नंदू राजे कोण आहेत हे मला माहीत नाही. मागे एकदोनदा दादांच्या चित्रपटाच्या प्रेस शोच्या वेळी या माणसाला मी पाहिले होते. परंतु हा मनुष्य लेखक आहे की समीक्षक आहे, की समीक्षकाचे कातडे पांघरलेला भाट आहे याबद्दल मला काहीच माहिती नव्हती. म्हणून मी मुंबईतील एका ज्येष्ठ व जाणत्या समीक्षकाला त्यासंबंधी विचारले. त्यांनी मला चित्रपट समीक्षक या विषयावर बरेच काही ऐकविले. त्यांच्या सांगण्याचा मथितार्थ इतकाच की, आम्हा समीक्षकांमध्ये तीन प्रकारचे समीक्षक असतात : (१) कलानिष्ठ, (२) व्यक्तिनिष्ठ आणि (३) मद्यनिष्ठ. यांपैकी नंदू राजे कोणत्या निष्ठेत बसतात ते तुमचे तुम्हीं शोधून काढा. मला सर्व काही खुलासा झाला.

हा या लेखमालेचा एक भाग झाला. कारण ही लेखमाला मुलाखतवजा असल्याने दुसरा भाग आहे तो दादा कोंडके यांचा. श्री. कोंडके यांना मी तसा अनेक वर्षे ओळखतो, पण गेली १० वर्षे अगदी जवळून ओळखतो. श्री. नंदू राजे दादांना फारसे ओळखत नाहीत हे त्यांच्या लिखाणावरूनच कळून आले आहे. फार तर ते 'सोंगाड्या' पासून दादांना ओळखत असतील, आणि म्हणूनच इतके लेखांक लिहूनही दादा कोंडके म्हणजे काय आहे हे त्यांना कळलेले नाही. कारण दादांच्या मैफिलीत व बैठकीत बसून दादांना समजून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. एअरकण्डिशन्ड रूममध्ये बसून समजून घेण्यासारखा हा माणूस नाही. दादांच्या गप्पीष्टपणावरून त्यांना कोणीही ओळखू शकणार नाही. श्री. नंदू राजे यांनी 'आयला', 'साल्या' वगैरे शब्दांची खैरात करून दादांशी खूप जवळीक असल्याची 'पोज' घेतली असली तरी, त्याने काहीही साधलेले नाही. मुळात दादांच्या तोंडी जी अशुद्ध भाषा त्यांनी जाणूनबुजून घातली आहे ती दादांची भाषा नाही. दादा सर्रास अशुद्ध बोलत नाहीत. फक्त २-४ शब्दच अजून दादांच्या तोंडी अशुद्ध आहेत. श्री. राजे यांनी दादांची म्हणून लिहिलेली भाषा आहे तीच चुकीची आहे. दादांची भाषा सुद्धा ज्याला कळली नाही त्याला माणूस काय कळणार ?

तशी या लेखमालेची चिरफाड करणे फार सोपे आहे. पण मला त्यात पडायचे नाही. त्यांच्या लेखामध्ये जी चुकीची व खोटी माहिती आहे तेवढयापुरतेच मी लिहिणार आहे. श्री. राजे यांनी काही विधाने व माहिती स्वतःच्या बुद्धीने केली असतील, तर काही दादांनी पुरविलेल्या खऱ्या-खोटया माहितीच्या आधारे केली असतील. तेव्हा त्या विधानांचे मूळ काय आहे हेही मला शोधायचे नाही. त्याची गरज नाही, फक्त त्यातील खोटेपणा तेवढा दाखवून देणे एवढाच माझा उद्देश आहे.

हे मी अत्यंत व्यथित अंतःकरणाने करीत आहे. कारण दादांनी आणि मी अनेक वर्षे एकोप्याने काम केले आहे. त्या काळात दादांचे कौतुक करणारे अनेक लेख मी लिहिले. दादांचे अनेक दोष माहीत असतानाही मी त्यांचे केवळ कौतुकच केले. ह्या माणसाला उभा करण्यासाठी मी अमाप राबलो. पैशाची मदत सोडून बाकी सर्व मदत मी या माणसाला केली. त्यांच्यावर खूप प्रेमही केले. परंतु या मुलाखतीत दादांनी, त्यांच्या व माझ्या संबंधां-बद्दल ज्या पोरकटपणाने विधाने केली आहेत ती वाचल्यावर रागापेक्षा दादांची कीवच अधिक आली. पोरकट उतावीळपणा हा दादांचा एक मोठा दोष आहे व त्यामुळे ते अनेकदा अडचणीतही आले आहेत. आपली बाजू मांडताना ती प्रभावी वाटावी म्हणून भरमसाठ विधाने करणे, आपल्या दोषांचे व चुकांचे खापर दुसऱ्यांच्या डोक्यावर फोडणे, दुसऱ्याचे श्रेय स्वतःच्या नावावर जमा करणे, खोटया गोष्टी तिखटमीट लावून रंगवणे या दादांच्या सर्व सवयींचा मला पूर्ण परिचय आहे. समोरचा माणूस नुसत्या बोलण्याने खिशात कसा घालायचा याचे तंत्र दादांना फार चांगल्या प्रकारे अवगत आहे. दादांचे हे गुणविशेष त्यांच्या निकटच्या सहवासात असलेल्यांनाच फक्त पूर्णपणे माहीत आहेत. दादांसाठी मी काय काय केले हे सांगण्याची ही जागा नाही. मी 'विच्छाकाण्ड' नावाचे स्वतंत्र पुस्तक लिहीत आहे त्यात हा सर्व इतिहास येणारच आहे. दादा खाजगीत माझ्याबद्दल काय बोलतात याची मला पूर्ण कल्पना आहे. असे असूनही मी त्यांच्यावर रागावलो नव्हतो. पण 'माणूस'मध्ये दिलेल्या मुलाखतीत त्यांनी जी खोटी विधाने व प्रसंगी थापेबाजी केली आहे ती खोडून काढण्यासाठी म्हणून का होईना पण मला दादांच्या विरुद्ध लेखणी उचलावी लागत आहे याचे मला फार दुःख वाटत आहे. आपण जोपासलेल्या (लावलेल्या नव्हे) झाडाची, ते वेडेवाकडे वाढू नये म्हणून काटछाट करण्याची पाळी प्रत्येकावर येते. काटछाट करायची म्हणजे थोडी धार असलेलेच शस्त्र वापरावे लागते. तरीही हेतू मात्र झाड शोभिवंत दिसावे हाच असतो !

पण एका दृष्टीने असे स्पष्ट लिहिणे योग्यही आहे. दादा परवापर्यंत मला मोठ्या भावाच्या ठिकाणी मानीत होते. तेव्हा त्यांनीच दिलेल्या मोठ्या भावाच्या अधिकाराने त्यांना थोडे दटावणे अनुचित ठरू नये. अर्थात हे त्यांना रुचणार नाही याची मला जशी कल्पना आहे, तशीच चारचौघांत बसून ते माझी

टवाळी करतील याचीही खात्री आहे. कारण त्यांना बापाच्या ठिकाणी असलेले श्री. भालजी पेंढारकर आणि भालजींचे भाऊ म्हणून काकांच्या ठिकाणी असलेले शांतारामबापूसुद्धा यातून सुटले नाहीत तर माझी काय कथा ? तरीही सत्य घटना व वस्तुस्थिती सांगण्यासाठी हे कठोर कर्म करणे आवश्यक आहे. नाहीतर अनेक भाबड्या वाचकांना दादांनी मुलाखतीत सांगितलेले आणि नंदू राजेंनी 'आयला', 'साल्या 'मध्ये घोळून लिहिलेले सर्व काही खरे आहे असे वाटेल.

श्री. नंदू राजे यांच्या लेखमालेमध्ये पुनरुक्तीचा दोष फार मोठा आहे. त्याच त्याच गोष्टी कंटाळा येईल इतक्या वेळा पुन्हा पुन्हा सांगितल्या आहेत. तेव्हा तो दोष माझ्या हातून घडू नये म्हणून मी लेखांकनिहाय वस्तुस्थिती सांगणार असलो तरी, एकेक विषय एकदाच हाताळणार आहे. त्यांनी एक गोष्ट चार लेखांकांत लिहिली म्हणून मी चार वेळा ती खोडणार नाही. अशा रीतीने सबंध लेखमाला डोळ्यापुढे ठेवून लेखांकनिहाय समाचार घेण्याचा माझा विचार आहे. तसेच दादांच्या खाजगी आयुष्याबद्दल मला जी माहिती आहे त्या संबंधातही मी काहीही लिहिणार नाही. या लेखांकात त्यांच्याबद्दल काही चुकीची व्यक्तिगत माहिती लिहिली गेली असली, तरी त्याची दुरुस्ती मला करायची नाही. कारण आम्ही 'विच्छा 'च्या निमित्ताने एकत्र आलो आणि अन्य व्यावसायिक कारणामुळे दुरावलो. त्यात त्यांच्या वा माझ्या खाजगी जीवनाचा काहीही संबंध नाही.

### लेखांक : १

श्री. नंदू राजे यांना तमाशा ह्या कलेची कितपत माहिती आहे हे मला माहीत नाही. त्यांनी म्हटलं आहे की, 'राम नगरकरला अर्ध्यामुर्ध्या साडीचोळीच्या मावशीबाईच्या रूपात बघणं फारसं बरंही वाटत नव्हतं. मावशीबाईला हे साडीचोळीत आणणं शांतारामबापूंच्या रामजोशी चित्रपटानंतर वगाच्या बोर्डावर आलेलं- 'श्री. नंदू राजे यांनी राम नगरकरचे काम नीट पाहिलेले नसावे. राम नगरकर मावशीचं काम करताना अर्धीमुर्धी साडीचोळी नेसत नसत. फक्त एक उपरणेवजा कापड किंवा रंगीत फेटा डोक्यावरून साडीसारखा घेत असत. शिवाय मावशीचं हे रूप रामजोशी चित्रपटापासून आलेलं नाही. त्याच्याही पूर्वी गवळणीत मावशी असायची. लिहिण्यापूर्वी श्री. राजे यांनी निदान राम नगरकरला तरी विचारायचे !

'विच्छा 'चे बहुतेक सर्वच कलाकार या ना त्या कामासाठी माझ्या प्रॉडक्शनमध्येही गुंतलेले आहेत. त्यांपैकी कुणालाही पैशाची चणचण नाही हे मला ठाऊक आहे.' असे दादांच्या तोंडी घातलेले वाक्य दादांचेच आहे असे मी मानतो. हे पूर्णतया खरे नाही. आज 'विच्छा 'चे बहुतेक सर्व कलाकार (स्त्रिया सोडून) फक्त पैशाच्याच चणचणीत आहेत. बहुतेकांची परिस्थिती दारुण आहे. किंबहुना 'विच्छा 'तील पहिल्या कलाकारांनी पहिले ५० प्रयोग बिदागी न घेता केले होते. (फक्त नाचणारी बाई सोडून) त्यातील काही कलाकार पुढे बदलले, पण काही शेवटपर्यंत कायम राहिले. 'विच्छा' चालू असताना थोड्या फार वेळा कलाकारांची बिदागी वाढविण्यात आली. 'विच्छा 'ला तुफान उत्पन्न होत असताना दिवाळीच्या आसपासच्या प्रयोगाच्या वेळी कलाकारांना दिवाळी भेट म्हणून काही रक्कम देण्याची प्रथा मी सुरू केली होती, पण तीही पुढे बंद करण्यात आली. 'विच्छा 'चा हजारावा प्रयोग थाटामाटाने साजरा करावा व त्यानिमित्ताने पूर्वीच्या सर्व विविध महोत्सवी अध्यक्षांना बोलावून त्यांचा सत्कार करावा आणि कलाकारांना प्रत्येकी १००० रु. सप्रेम भेट म्हणून द्यावेत अशीही योजना मी दादांना सांगितली होती. त्यांनी ती मान्यही केली होती. पुढे कुठे माशी शिकली हे मला माहीत नाही.' 'विच्छा 'तील कलाकारांना दादांनी आपल्या चित्रपटकंपनीत कायमचे सामावून घेतलेले नाही. पहिल्या एकदोन चित्रपटांत सर्वांना कामे देण्यात आली. नंतर फक्त काही जणांनाच कामे मिळाली. त्यांना चित्रपट कंपनीत सामावून घेतले असते तर त्यांचा उपजीविकेचा प्रश्न सुटला असता. काहींनी तर 'विच्छा 'साठी नोकऱ्या सोडल्या. त्यांची साहजिकच अपेक्षा होती की, दादांचा व्याप वाढतो आहे तेव्हा आपल्याला ते कुठेतरी सामावून घेतील. उघड्यावर टाकणार नाहीत, पण तसे झाले नाही. ज्यांच्या नोकऱ्या सुटल्या त्यांची परिस्थिती अधिकच बिकट आहे. 'विच्छा 'चे प्रयोग बंद झाल्यानंतर तर, बहुतेकजण वणवण फिरत आहेत. मिळेल ते, मिळेल तसले काम करीत आहेत.

दादांनी सांगली बँकेच्या दादर शाखेच्या उद्घाटनाच्या वेळी 'माझ्या सर्व कलाकारांना मी या बँकेत खाती उघडून देतो आणि दरमहा वाढीव बिदागी म्हणून पाच रुपये मी त्यांच्या नावे जमा करीन' असे सांगून समारंभात जोरदार टाळ्या घेतल्या होत्या. त्याला तीन-चार वर्षे होऊन गेली. अजून एकाही कलाकाराचे खाते उघडले गेलेले नाही. तसेच 'विच्छा 'तल्या प्रत्येक कलाकाराला घर बांधून देण्याचेही गाजर त्यांनी बरेच दिवस त्यांच्यापुढे धरलेले होते. 'विच्छा 'तल्या कलाकारांच्या बाबतीत इतक्या विस्ताराने लिहिण्याचे कारण गेल्या दहा वर्षांत अनेक वेळा ते आपल्या तक्रारी, अडचणी, दुःखे घेऊन माझ्याकडे आले आहेत. अजूनही अनेकजण मला भेटून त्यांची कर्मकहाणी सांगतात. नोकऱ्या सोडल्याबद्दल हळहळतात. दादांनी आपल्या आपल्या कलाकारांना वेळोवेळी पैसे दिल्याचे व ते परत न घेतल्याचे सांगितले आहे. तसे असेलही. पण दिलेले पैसे मात्र फार नव्हते, एवढे मला माहीत आहे. कुणाला २-४ हजार उचलून दिल्याचे माहीत नाही.

'विच्छा माझी पुरी करा' ह्या वगाच्या संदर्भात या लेखाच्या शेवटी असे विधान करण्यात आले आहे की, दादानं सबनीससाहेबांना त्यांच्या ह्या वगाबद्दल गळ घातली तेव्हा तेही म्हणाले होते की, 'हा वग कुणी आधीच करून बघितलाय. तो चालेल असं वाटत नाही.' अशाच आशयाचे विधान पुन्हा एकदा पुढच्या एका लेखांकात करण्यात आले आहे. हे असत्य आहे.

याबाबतची खरी हकिगत अशी आहे. दादा कोंडके नायगावच्या जनता कलापथकात मीच लिहिलेला 'खणखणपूरचा राजा' हा वग करीत होते. तो वग चालू असतानाच दुसरा एखादा नवीन वग बसवावा म्हणून ते माझ्याकडे वगासाठी आले.त्यावेळी मी त्यांना 'तुम्ही माझं सावकार' आणि 'छपरी पलंगाचा वग' हे दोन्ही वग वाचायला दिले. परंतु जनता कलापथकाच्या सूत्रधारांना ते पसंत पडले नाहीत. दादा जनता

कला पथकातून बाहेर पडले आणि सरकारी कार्यक्रम मिळविण्याच्या खटपटीला लागले. त्यांच्यासाठी मी खटपट करूनसुद्धा त्यांना सरकारी कार्यक्रम मिळाले नाहीत. तेव्हा स्वतंत्रपणे काहीतरी करण्याची कल्पना श्री. तुकाराम शिंदे यांनी दादांच्या पुढे ठेवली आणि त्यात मदत करण्याची त्यांनी तयारी दाखविली. ही कल्पना घेऊन दादा वगासाठी माझ्याकडे आले. त्यावेळी मी त्यांना 'छपरी पलंगाचा वग' पुन्हा एकदा वाचून पहा म्हणून सांगितले. त्यांनी तो पुन्हा वाचल्यावर पसंत पडला व त्यांनी तो बसवायचे ठरविले. त्यानंतर त्यात खूप दुरुस्त्याही करण्यात आल्या. तत्पूर्वी ठाण्याच्या सेवादल कलापथकाने ह्या वगाचा एखाद-दुसरा प्रयोग केला होता. त्याचा रिपोर्टही वाईट नव्हता. तेव्हा, मी तो वग चालवणार नाही असे सांगितले असतानासुद्धा दादांनी 'क्वाएट कॉन्फिडन्स'ने तो केला म्हणून यशस्वी झाला हे मुळीच खरे नाही. ह्या वगाचे अगदी पहिले चार-पाच प्रयोग झाल्यानंतर दादांच्या 'क्वाएट कॉन्फिडन्स'ची काय अवस्था होती हे बघायला श्री. नंदू राजे त्यावेळी हजर नव्हते, पण मी होतो.

## लेखांक २

श्री. नंदू राजे यांना दादांची नीटशी माहिती नसल्यामुळे किंवा ती करून घेण्याचा त्यांनी प्रयत्न न केल्यामुळे त्यांनी अनेक ठिकाणी चुकीची माहिती दिली आहे.

'आणि चढत चढत शेवटी नायगावच्या सहकार भांडाराचे मॅनेजर झालो' असे वाक्य त्यांनी दादांच्या तोंडी घातले आहे. ते वाक्य दादांचे असेल असे मला वाटत नाही. श्री. राजे यांनीच हे दडपून दिले असावे. नायगावला 'सहकार भांडार' नाही. सहकार भांडार आहे ते फोर्टमध्ये. नायगावला आहे तो 'अपना बझार.' आणि 'अपना बझार' ही मुंबई कामगार ग्राहक सहकारी संघाची एक शाखा. दादांचा अपना बझारशी प्रत्यक्ष संबंध नव्हता. मुंबई कामगार ग्राहक सहकारी संघाच्या लव्हलेन शाखेचे ते काही काळ मॅनेजर होते. त्यावेळी श्री. राजे ज्याला 'सहकार भांडार' म्हणतात त्या 'अपना बझार'चे मॅनेजर श्री. बाबूराव गोड हे होते.

याच लेखात दिलेला आणखी एक चुकीचा तपशील म्हणजे, 'विच्छा'च्या पहिल्या प्रयोगाचा तपशील होय. 'विच्छा'च्या पहिल्या प्रयोगात गायला फैय्याज नव्हती. ती पुढे दोन वर्षांनी फक्त काही प्रयोगांसाठी आली आणि गेली. गीलांवरी होती पण ती भूमिका करीत नव्हती. ती गात होती. नायिकेची भूमिका सौ. पुष्पा म्हात्रे ही करीत होती. जवळजवळ १०० प्रयोग तिनेच केले. पहिल्या प्रयोगात दस्तुरखुद्द मीसुद्धा नव्हतो. सगळा तपशील चुकीचा आहे.

माझी लोकप्रियता कॅश करण्याच्या धूर्तपणाने किंवा मला जवळ ठेवण्याच्या दूरदृष्टीने माझी अभिनयाची कुवत बेताबाताची असतानाही दादांनी मला वगात घेतले अशा आशयाचे एक पोरकट विधानही या ठिकाणी श्री. राजे यांनी केले आहे. तेवढा धूर्तपणा किंवा तेवढी दूरदृष्टी त्यावेळी तरी दादांच्याजवळ नव्हती एवढे मी निश्चितपणे सांगू शकतो. माझ्या अभिनयाच्या बाबतीत माझ्या स्वतःच्या किंवा दादांच्या अवास्तव कल्पना नव्हत्या. केवळ खुषमस्करी म्हणून केलेली ही विधाने अगदीच निरर्थक आहेत. दादांनी मला वगात घेण्याचा प्रश्नच नव्हता. वगात काम करण्याची माझी कधीच महत्त्वाकांक्षा नव्हती.

वस्तुस्थिती अशी होती की, दादांनी 'विच्छा'चे चार महिन्यांत पाच-सहा प्रयोग केले. त्यावेळी बतावणी हा भाग त्यात नव्हता. या पाच-सहा प्रयोगांनंतर 'विच्छा' थंडावली. दादांनाही 'विच्छा'च्या भवितव्याबद्दल शंका वाटू लागली. कोरेगावला झालेल्या पाचव्या प्रयोगानंतर काय हाल झाले ते श्री. राजे यांनी दादांनाच विचारावे. सत्यनारायणाची पूजा किंवा गणपती उत्सव यातही प्रयोगाला मागणी आली नाही. मूळ कल्पना अशी होती की, सत्यनारायणाच्या पूजेचे, गणपतीचे प्रयोग मिळतील व त्यातून थोडासा पैसा हाती येईल आणि मग कलापथक उभे राहील. याच हिशोबाने दादांनी हा वग बसवला होता. त्यात धंद्याचे गणित नव्हते किंवा यशाची दूरदृष्टी नव्हती. पण प्रयोगाला मागणीच आली नाही. 'विच्छाचे पहिले २।३ प्रयोग मी पाहिले होते. काही साहित्यिक मित्रांनाही आवर्जून दाखविले होते. त्यांचे मत बरे पडले. हा प्रकार लोकांना आवडेल असे त्यांनी सांगितले. त्यावर विचार करून मी बतावणीची कल्पना काढली ती दादांना एकदम पसंत पडली. साहित्यिक पत्रकार, नाट्यक्षेत्रातील लोक यांना आमंत्रण देऊन बतावणीसहित प्रयोग केल्यास काहीतरी घडेल असे वाटल्यावरून मी बतावणीत उभा रहावे असे ठरले. तब्बल सहा महिन्यांनी पुन्हा विच्छा उभी राहिली. मात्र बतावणी फक्त चार प्रयोगांपुरतीच करावी असेही मी सांगितले होते व दादांनी ते कबूलही केले होते. यावरून लक्षात येईल की, मला नट म्हणून पुढे यायचे नव्हते किंवा अभिनयाच्या बाबतीतही माझा स्वतःबद्दल भ्रम नव्हता. परंतु बतावणी हे प्रकरण प्रयोगात इतके चपखल बसले की, बतावणी नसेल तर, प्रयोग (पुण्या–मुंबईत तरी) अपुरा वाटू लागला. केवळ बतावणी बघण्यासाठी येणारे असंख्य प्रेक्षक मला भेटले आहेत. त्यामुळे, मला त्रास होत असताना आणि बऱ्याच वेळा अडचण असतानासुद्धा मला बतावणी करावी लागली. श्री. नंदू राजे यांना माहीत नसेल की, 'विच्छा'चे १००० प्रयोग होईपर्यंत मी दादांकडून बतावणीच्या कामासाठी एकही पैसा घेतलेला नाही. केवळ दादांवरील प्रेमाखातर मी काम करीत होतो–अगदी अभिनय बेताबाताचा असूनसुद्धां! याला दादांचा धूर्तपणा म्हणणे हे केवळ अडाणीपणाचे आहे.

'विच्छा'चे पहिले १५–१६ प्रयोग मिळमिळीत गेले हे म्हणणे बरोबर नाही. पुण्यात 'विच्छा'च्या दुसऱ्या प्रयोगापासून 'हाउस फुल्ल'चा बोर्ड चढला तो शेवटपर्यंत कायम होता. परंतु मुंबईत जवळजवळ २०० प्रयोगांपर्यंत 'हाऊस फुल्ल'चा बोर्ड लागला नाही. विदर्भातील दोन दौरे तोटयात गेले. पश्चिम महाराष्ट्रातील एक दौरा नुकसानीचा गेला. मुंबईतील पहिले कितीतरी प्रयोग तोटयात गेले.

या लेखांकाच्या शेवटी, 'विच्छा माझ्याशिवाय चालणारच नाही. मी त्यात नसेन तर, तो वग मढयागत शून्य आहे.' असे श्री. नंदू राजे दादांचे अवतरण देऊन म्हणतात त्याप्रमाणे दादा म्हणाले असतील तर, दादांच्या पोरकट वृत्तीचा हा आणखी एक नमुना म्हणावा लागेल. होडी होडी खेळताना एखाद्या मलाला त्या होडीत घेतले

नाही तर, तो चिडून जसा 'मला घेत नाही ना–मग जा, तुमची होडी बुडूनच जाईल,' असा रुसवा शाप देतो तशी ही दादांची उक्ती आहे.

बालगंधर्व, केशवराव भोसले, चिंतामणराव कोल्हटकर, केशवराव दाते यांच्यासारख्या नटश्रेष्ठांनीही अमूक एक नाटक मी नसेन तर चालणार नाही, असे कधी म्हटल्याचे माझ्या ऐकिवात नाही; आणि हे नट दादांच्यापेक्षा किमान हजारपटीने श्रेष्ठ होते. ! अभिमान असावा पण दर्प नसावा !

केवळ वाचकांच्या माहितीसाठी मी येथे दोन तीन उदाहरणे देतो. त्यावरून त्यांनीच निष्कर्ष काढावा.

१) तासगाव येथील तरुण विकास मंडळ या संस्थेने संस्थेच्या मदतीसाठी स्थानिक कलाकार घेऊन 'विच्छा'चे ३–४ प्रयोग केले, त्यांना आणखी काही प्रयोगांची मागणी आली. प्रयोगात काही दम असल्याशिवाय प्रयोगाला मागणी येत नाही हे धंद्यातले सत्य आहे.

२) मुंबईतील आंबेवाडी गणेशोत्सव मंडळाने आपल्या कलाकारांना घेऊन गेल्या वर्षी (१९७५) गिरगावात ह्याच प्रयोग केला आणि तोही धमाल रंगला ही गोष्ट प्रत्यक्ष प्रयोग पाहिलेल्या किमान १५–२० लोकांनी तरी मला सांगितली.

३) पनवेलच्या रसायनीतील कर्मचाऱ्यांनी २३ मे रोजी 'विच्छा'चा प्रयोग केला. चार ते पाच हजार प्रेक्षक शेवटपर्यंत हसत होते. त्याचे फोटोही माझ्याकडे आहेत.

वरील तिन्ही संस्थांतील कलाकार नाटयक्षेत्राला अज्ञात असूनसुद्धा त्यांचे प्रयोग रंगले. कुठलाही प्रयोग मढयागत झाला नाही किंवा प्रेक्षकांना वाटला नाही. दादांच्या प्रयोगाइतकी रंगत एखादवेळ येत नसेल, पण तो प्रयोग मढयागत होईल असे म्हणणे हास्यास्पद आहे.

### लेखांक ३ :

'विच्छा माझी पुरी करा'च्या यशाच्या वाटयात माझी कामगिरी फारशी नाही असे श्री. नंदू राजे यांचे मत आहे. ती कामगिरी काय आहे हे नंदू राजेंना चालू जन्मात कळण्याची शक्यता नाही. कारण त्यांनी या गोष्टीकडे बघण्यासाठी लावलेला चष्मा चुकीच्या नंबराचा आहे. त्यांनी दादांकडून आग्रहाने अधिक माहिती घ्यावी. माझा काही वगनाटचे आपटल्याचा त्यांनी उल्लेख केला आहे. वगनाटचेच नव्हे तर, माझी काही नाटकेही आपटली आहेत हे तरी त्यांना माहीत असायला हवे होते. पण मला त्यात काही विशेष वाटत नाही. यश आणि अपयश ही दोन्ही स्वीकारण्याची तयारी ठेवूनच मी या क्षेत्रांत उतरलो आहे. सर्वांची सर्व नाटके किंवा चित्रपट कधीच यशस्वी होत नसतात. त्यात चढउतार हा असतोच. त्यासाठी दोष देऊन हिणवण्याचे कारण नाही. मीच लिहिलेला आणि दादांनी बसविलेला 'खणखणपूरचा राजा' हा वग –'विच्छा' पेक्षा अधिक रंगतदार असूनही थिएटरला एक दिवसही उभा राहू शकला नाही. तो थिएटरात कसा आणि किती उंचीवरून पडला हे त्यांनी दादांनाच विचारावे. वास्तविक त्या वगातील दादांचे काम आणि विच्छातील काम यात सूतभरही फरक नव्हता. 'खणखणपूरच्या राजातील' हवालदार दादांनी जसाच्या तसा 'विच्छा' मध्ये आणला. तरीसुद्धा 'खणखणपूरचा राजा' थिएटरात आडवा झाला. दादांचे इतर वगही थिएटरचे तोंड पाहू शकले नव्हते. दादांना अपयश सोसत नाही ते आता यश मिळाल्यानंतर ! त्यापूर्वी ते अपयशातच रंगत होते. आता मात्र त्यांना स्वतःचे अपयश सोसत नाही तसे दुसऱ्याचे यशही सोसत नाही ही अवस्था प्रत्येक यशस्वी माणसाची होते. दादा त्याला अपवाद नाहीत.

नंदू राजे यांना बेधडक अविचारी निष्कर्ष काढण्याची खोड असावी. 'विच्छा'च्या बाबतीत जसे ते लिहून गेले तसें 'ह्या नाऱ्या झिंदाबाद' या चित्रपटासंबंधीसुद्धा लिहून गेले आहेत. हा चित्रपट साफ कोसळला असे धाडसी विधान त्यांनी केले आहे. चित्रपट कोसळला हे ठरवायचे कुणी आणि कशावरून ? नंदू राजे म्हणतात म्हणून ? त्यांनी त्या चित्रपटाच्या उत्पन्नाचे आकडे तरी तपासून पहायचे. 'ट्रेड गाइड' नावाचे एक नियतकालिक निघते त्यात प्रत्येक चित्रपटाचे दर आठवडयाचे उत्पन्नाचे आकडे दिलेले असतात. अजूनही त्यांनी थोडे कष्ट घेऊन १९७२ च्या नोव्हेंबर नंतरच्या काळातील या चित्रपटाच्या उत्पन्नाचे आकडे पाहावेत. त्यांना दिसेल की, या चित्रपटाने तुफान धंदा केला नसला तरी, तो अजिबात तोटयात नाही. किंबहुना १९७२ सालात उत्पन्नाच्या दृष्टीने क्रमांक लावले तर, पहिला 'पिंजरा', दुसरा 'एकटा जीव सदाशिव' व तिसरा 'ह्या नाऱ्या झिंदाबाद' असाच क्रम त्यांना दिसून येईल. 'सोंगाडया'. इतके उत्पन्न झाले नाही. म्हणजे 'ह्या नाऱ्या' चित्रपट कोसळला असे गणित त्यांच्या डोक्यात असेल तर दादांचे सध्याचे चित्रसुद्धा त्याच वर्गात घालावे लागेल. तेव्हा सवंगपणे काहीतरी खोटी विधाने करून दादांची मर्जी सांभाळण्याचा उपद्व्याप, दुसरा कुठलाही स्वतंत्र बुद्धीचा समीक्षक करणार नाही.

राजकारणाचा बाज बाजूला ठेवून साधंच लोकनाटच म्हणून आपण 'विच्छा' करू या, असे मी दादांना सांगितले असाही उल्लेख करण्यात आला आहे, हेही खरे नाही. तसं पाहिलं तर, 'विच्छा'मध्ये दादा राजकारणांवरील विनोद, म्हणून जे विनोद करीत असत ते मोठे तत्त्वनिष्ठेतून आलेले वगैरे असं काहीही नव्हतं. त्या त्या वेळी लोकमताचा वारा जसा असेल, तसे विनोद करून ते बाजी मारीत असत. मुंबईच्या प्रयोगात पुण्यातील नेत्यांचा उल्लेख, पुण्याच्या प्रयोगात मुंबईच्या नेत्यांची टिंगल, सांगलीच्या प्रयोगात कोल्हापुरच्या नेत्यांवर विनोद, तर कोल्हापुरच्या प्रयोगात सांगली-कराडच्या नेत्यांवर कॉमेंट ! ज्या गावी ज्या पक्षाचा जोर असेल, त्या गावी त्या पक्षाच्या टाळया मिळविणे हाच धंद्याचा हिशोब होता. ह्यात पक्षनिष्ठा वा तत्त्वनिष्ठा अशी कोठेही नव्हती. ज्या लोकांची पूर्वीच्या प्रयोगातून टिंगल केलेली होती त्यांच्यापैकी पुढे ज्यांच्याशी व्यक्तिगत संबंध आले त्यांची नंतरच्या प्रयोगातून प्रशंसा सुरू झाली. समोरचा प्रेक्षक बघून राजकारणावर विनोद करणे हेच दादांचे सूत्र होते. म्हणूनच कोल्हापुरातील एका प्रयोगाच्या वेळी काही प्रेक्षकांनी नेत्यांची नावे घेतल्यास परिणाम वाईट होतील, असा दम दिल्याबरोबर दादांनी नावे टाळली. इतकेच काय, पण आपल्या चित्रपटाचाही काही भाग कोल्हापूरसाठी कापला. सांगायचा मुद्दा एवढाच की, दादा राजकारणाचा जेवढा बाऊ करतात तसे तत्त्वनिष्ठेचे राजकारण काहीही नव्हते. त्यामुळे त्यांना बदलत्या परिस्थितीनुसार विनोद बदलणे मुळीच अवघड नव्हते. किंबहुना कोणत्या ठिकाणी काय बदल करावयाचा हे मी तुम्हाला दाखवून देतो असेही मी त्यांना सांगितले होते. त्यांना ते पटलेही होते, पण यासंबंधी चर्चा करायला तेच आले नाहीत. मी फोनवरसुद्धा सापडलो नाही वगैरे चूक आहे. मी निश्चितपणे रोज १० ते ५ पर्यंत सचिवालयात असतो हे काय दादांना माहीत नव्हते ? शिवाय सबंध वगात तथाकथित राजकारणाच्या अशा फक्त ५–६ जागा आहेत.

सबंध वग राजकारणावरचा नाही. दादांना प्रयोग करण्याची गरज नव्हती म्हणून त्यांनी प्रयोग बंद केले. राजकारण ही सांगायला सबब !

'विच्छाच्या संदर्भात सांगताना मी प्रयोगाचे हक्क काढून घेतल्याचे दादांनी सांगितले आहे. ते खरे आहे. पण त्या आधीचा इतिहास दादांनी सांगितला नाही. मार्च १९७५ मध्ये 'विच्छा'चा शेवटचा प्रयोग नासिकच्या बाजूला झाला. त्यावेळी काही कलाकार गैरशिस्तीने वागले म्हणून दादांनी प्रयोग बंद ठेवले. मला येऊन तसे त्यांनी सांगितले. 'मी चार महिने प्रयोग बंद ठेवतो. नंतर संच बदलतो' असे दादा म्हणाले. मीही त्यास मान्यता दिली. पुढे चार महिने काही झाले नाही. 'पुन्हा पूर्वीचेच लोक घेऊन करतो' असेही म्हणू लागले. त्यालाही मी मान्यता दिली. तरीही काही घडले नाही. असे आठ महिने गेले. त्यानंतर त्यांना मी एक पत्र पाठविले आणि तुमचा काय विचार आहे ते पंधरा दिवसांत कळवा असे लिहिले. त्या पत्राचे उत्तर त्यांनी दिले नाही. पुन्हा सुमारे तीन-चार आठवड्यांनी रजिस्टर्ड पत्र पाठविले. त्यात एवढेच लिहिले होते की, तुम्ही प्रयोग करीत नाही, गेले आठ महिने केले नाहीत, तेव्हा यापुढेही करण्याचा तुमचा विचार दिसत नाही. तसे स्पष्ट कळवा. यात माझे आर्थिक नुकसान होत आहे. तुम्ही करीत नसाल तर, मी हे लोकनाट्य दुसऱ्याला देण्यास मोकळा आहे. तुम्हाला पुन्हा प्रयोग करावयाचे असतील तेव्हा पुन्हा परवानगी मागावी लागेल. हे लोकनाट्य एकमेव हक्काने दुसऱ्याला दिले नसेल, तर तुम्हाला परवानगी मिळू शकेल. एवढाच मजकूर होता. अमक्या तारखेच्या आत प्रयोग करा अशी अट घातली नव्हती. तसेच दादा म्हणतात त्याप्रमाणे त्या पत्रात दोनशे रुपयांच्या बाकीचाही उल्लेख नव्हता. दोनशे रुपयांसंबंधीचे विधान तर दादांच्या डोक्यावरील सध्याच्या केसांइतकं खोटं आहे. कारण दादांच्याकडे बाकी नसताना मला दोनशे रुपयांचा उल्लेख करण्याचं कारणच काय ? यातून केवळ २०० रुपयांसाठी मी 'विच्छा'चे हक्क काढून घेतले असे भासविण्याचा हा निंद्य प्रयत्न आहे.

आता सांगायला हरकत नाही की, दादांच्याकडे शंभर शंभर प्रयोगांच्या रॉयल्टीची बाकी होती, तरी मी त्यांना कधी पत्र लिहून आठवण दिली नव्हती. 'विच्छा'चा १००० प्रयोगापर्यंतचा प्रयोग ठरविण्याचा व पैशाचा व्यवहार मीच बघत असे. हजारो रुपये माझ्या हाती येत असत. तरीसुद्धा दादांनी दिल्याशिवाय रॉयल्टीचे पैसे मी काढून घेत नसे. कंपनीसाठी मला जो प्रवासखर्च वा अन्य खर्च करावा लागत असे. त्यांच्या हिशोबाच्या दरवर्षीच्या स्वतंत्र वह्या असत व त्या मी दादांच्याकडे देत असे. अशा परिस्थितीत दोनशे रुपयांसाठी मी हक्क काढून घेतले असे भासविणे कृतघ्नपणाचे आहे.

श्री. नंदू राजे यांच्या लेखमालेत 'सोंगाड्या'च्या पेटचा घेऊन दादा वणवण फिरल्याचा वारंवार उल्लेख आला आहे. हा काय विनोद आहे ते मला कळले नाही. 'सोंगाड्या'चा उल्लेख आला की, पेटचा घेऊन फिरण्याचे वर्णन आलेच ! खोटी गोष्ट पुन्हा पुन्हा सांगितल्याने, तिच्यावर खरेपणाचा मुलामा चढतो, अशी तर त्यांची कल्पना नाही ? किंवा सुरुवातीला आम्हाला फार हाल सोसावे लागले व त्यातून मोठ्या कष्टाने मार्ग काढीत आम्ही पुढे आलो असे भासविण्याचा तर हा खटाटोप नसेल ? 'विच्छा' प्रमाणेच 'सोंगाड्या'चा सुरुवातीचा कारभार माझ्याकडेच होता. जाहिरातीची डिझाइन्स बनविणे, राइटप तयार करणे, दिवाळी अंकासाठी जाहिराती देणे, अन्यप्रकारे प्रसिद्धी करणे ही कामे मीच करीत होतो. चित्रपट प्रदर्शित झाल्यावर श्री. नंदकुमार कलगुटकर व्यावसायिकदृष्ट्या त्यात आले. तरीही जाहिरातीच्या कॅचलाइन्स मीच देत होतो. बजेटही मीच पाहत होतो. सांगायचा मुद्दा एवढाच की, 'सोंगाड्या'च्या वेळीही मी दादांच्या व्यवहारात बराचसा गुंतलो होतो. तरीही दादा सोंगाड्याच्या पेटचा घेऊन कुठे गेल्याचे मला कधी दिसले नाही वा मी ऐकलेही नाही. निदान 'सोंगाड्या'च्या पेटचा तरी त्यांनी एकाही वितरकाला दाखविल्या नाहीत. दुसऱ्या कसल्या पेटचा दाखविल्या असल्या तर मला माहीत नाही. त्यामुळे वितरकांना पेटचा दाखविण्यापायी खर्च झाल्याचा दावाही खोटा आहे. कारण 'सोंगाड्या' काढण्याचे ठरले त्याच वेळी वितरण स्वतःच करावयाचे हेही ठरले होते. "सोंगाड्या'चे दिग्दर्शक श्री. गोविंदराव कुलकर्णी यांना वितरणाच्या धंद्याची खोलवर माहिती होती आणि त्यांनी वितरणव्यवस्थेची जबाबदारी स्वीकारली होती. इतर वितरकांनी मागणी केली आणि तीही कमी पैशात केली, हे खरे आहे, पण वितरणाच्या बाबतीत आधीच निर्णय घेतला असल्यामुळे वितरकांच्या मागणीला काहीच अर्थ नव्हता. किंबहुना 'सोंगाड्या'ची शेवटची शिफ्ट चालू होती त्यावेळी पुण्यातील 'भानुविलास' थिएटरची तारीख निश्चित करण्यात आली होती.

दादांनी स्वतःची वितरण संस्था काढली हे खरे, पण त्यासाठी रक्त आटवले श्री. गोविंदराव कुलकर्णी यांनी ! दादांना या धंद्याची काहीही माहिती नव्हती. आता त्यांना धंद्यातला धूर्तपणा, स्थलेसनेस वगैरे वगैरे आला असेल पण त्यावेळी दादा कोरे करकरीत होते. प्रिंट पब्लिसिटीसाठी श्री. गोविंदरावनी पंचगंगा सहकारी संस्थेकडून २२००० रु. आणि सांगलीच्या एका वितरकाकडून ५००० रु. आणले होते. वितरण व्यवस्थेसाठी एक माणूसही त्यांनी नेमला. पण तो तितकासा विश्वासू निघाला नाही ही गोष्ट वेगळी ! वितरणाची जबाबदारी गोविंदरावांवर आणि प्रसिद्धीची माझ्यावर अशी विभागणी होती. ही दोन्ही कामे आम्ही केवळ दादांवरील प्रेमापायी केली. पैशाची अपेक्षा धरलीही नाही आणि दादांनी दिलेही नाहीत. दादांचा पुतण्या श्री. विजय कोंडके याला याचवेळी ट्रेनिंगसाठी वितरणाच्या धंद्यात आणले. हा सगळा इतिहास श्री. नंदू राजे यांना कसा कळावा ? आणि दादांनी तरी तो का सांगावा ? तो सांगितला असता तर 'सोंगाड्या' पासून सर्व गोष्टींचे श्रेय स्वतःकडे घेण्याचा दादांचा धंद्यातील धूर्तपणा उघडा पडला असता.

## लेखांक : ४

या लेखांकांत 'एकटा जीव सदाशिव' या चित्रपटाचा शेवट करण्याच्या संबंधात श्री. नंदू राजे यांनी दादांची काही विधाने उद्धृत केली आहेत. पण 'एकटा जीव' हा विषय पुन्हा सातव्या लेखांकात अधिक खोडसाळपणे आलेला असल्यामुळे हा सबंध विषय मी सातव्या लेखांकाच्या संदर्भात सांगण्याचे ठरविले आहे.

श्री. नंदू राजे यांचे अज्ञान कसे झकास आहे आणि त्यांचे लिखाण कसे वरवरचे व भाटगिरीचे आहे याचे आतापर्यंत सर्वांना दर्शन झालेच असेल. या लेखांकात तर त्यांनी एक सिक्सरच मारली आहे. श्री. प्रभाकर पेंढारकर हे कै. बाबुराव पेंढारकरांचे सुपुत्र असल्याचे ठोकून दिले आहे. श्री. प्रभाकर पेंढारकर हे सुपुत्र आहेत हे मान्य आहे पण ते कै. बाबुरावजींचे नसून श्री. भालजी पेंढारकरांचे आहेत ! एकाचे श्रेय लेखणीच्या फटकाऱ्याने दुसऱ्याला देण्याइतके एकाचे पितृत्व दुसऱ्याला बहाल करणे सोपे नाही एवढे तरी श्री. राजे यांनी शिकावे. □

**[ उरलेल्या लेखांकांविषयीचा खुलासा पुढील अंकी. ]**